अकोला । शनिवार
दि. १९ जुलै २०२५
वर्ष : १९ अंक : १३९
पाने : ८ + ४

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये

चौथ्या कसोटी सामन्याबाबत प्रशिक्षकाचे संकेत (पान ७ वर)



## महत्त्वाचे

### मोदींच्या नेतृत्वाखेरीज भाजप दुर्बळ – दुबे



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाशिवाय भारतीय जनता पक्ष १५० जागाही जिंकू शकणार नाही, असा ठाम दावा झारखंडमधील गोड्डा लोकसभा मतदारसंघाचे भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी केला आहे. दुबे म्हणाले, पुढील १५-२० वर्षे मला फक्त मोदीजीच दिसतात. हे मी केवळ त्यांचं पंतप्रधान पद पाहून म्हणत नाही. त्यांच्या नेतृत्वात गरीबांचं, सर्वसामान्यांचं समर्थन भाजपकडे वळलं आहे. हे समर्थन पूर्वी कधीच पक्षाकडे नव्हतं. मोदीजींच्या नेतृत्वात गरीब, ग्रामीण आणि मागासवर्गीय मतदारांनी भाजपकडे पाठ फिरवली नाही, उलट त्यांच्यावर विश्वास ठेवला. यामुळे पक्षाला नवे मतदार मिळाले. ज्यांना हे पटत नसेल, त्यांनी वास्तवाकडे डोळसपणे पाहावं.

### अनिल परब यांचा कदम यांच्यावर आरोप



**मुंबई :** राज्याच्या गृहराज्यमंत्रीपदी असलेल्या योगेश कदम यांच्या आईच्या नावे मुंबईतील कांदिवली येथे 'सावली डान्सबार' चालवला जात असल्याचा गंभीर आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) आमदार अनिल परब यांनी शुक्रवारी विधीमंडळात केला. या बारवर पोलिसांनी केलेल्या कारवाईत २२ बारबाला आणि २२ ग्राहकांना ताब्यात घेतल्याची माहिती त्यांनी सभागृहात दिली. विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना परब यांनी स्फोटक आरोप करत सरकारवर जोरदार हल्ला चढवला. डान्सबारवर बंदी असताना 'सावली बार' कसा काय सुरु आहे? या बारचे परवाना गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्या आई ज्योती कदम यांच्या नावावर आहे. हा प्रकार अत्यंत लज्जास्पद असून गृहराज्यमंत्र्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

### पनवेलमध्ये सापडले ३५ कोटींचे ड्रग्ज!



**पनवेल :** नवी मुंबईतील पनवेल रेल्वे स्टेशनवर बेंगळुरुमधील नारकोटिक्स नियंत्रण विभागाने केलेल्या संयुक्त कारवाईत तब्बल ३५ कोटी रुपयांचे तब्बल साडेतीन किलो मेथ ड्रग्ज जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी एका नायजेरियन महिलेला अटक करण्यात आली असून, पुढील तपास रेल्वे पोलीस आणि नारकोटिक्स नियंत्रण विभाग एकत्रितपणे करत आहेत. ही कारवाई विशेषतः रेल्वे मार्गांचा गैरवापर करून ड्रग्ज वाहतूक करणाऱ्या टोळ्यांविरुद्ध एक मोठा झटका मानला जात आहे. नारकोटिक्स नियंत्रण विभाग व रेल्वे पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करत असून, या नायजेरियन महिलेमार्फत कोणत्या टोळीशी संपर्क आहे, ही ड्रग्ज कुठून आणली गेली आणि कुठे पोहोचवायची होती, याचा शोध घेतला जात आहे.

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी हरित वीज क्रांती : मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा

## १० हजार कोटींची बचत होणार!

मुंबई, दि. १७ वृत्तसंस्था

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेतील अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना एक महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. लवकरच महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरेल, जे शेतकऱ्यांना हरित (ग्रीन) वीज पुरवेल. या निर्णयामुळे राज्याच्या शाश्वत विकासाला गती मिळेल आणि वीज खरेदीत १० हजार कोटी रुपयांची बचत होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.**



फडणवीस म्हणाले की, राज्याच्या शाश्वत विकासासाठी एक सविस्तर ब्लू प्रिंट तयार करण्यात आली आहे. सध्या राज्याची ५० टक्के वीज हरित ऊर्जा स्रोतांच्या माध्यमातून तयार केली जात आहे. पुढील पाच वर्षांत विजेचे दर कमी होतील, असे आश्वासनही त्यांनी दिले. यापूर्वी दरवर्षी ९.२० टक्क्यांनी विजेचे दर वाढत होते, परंतु आता दरवर्षी ते कमी होतील असे मुख्यमंत्री म्हणाले. या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत, राज्यातील सुमारे ३० लाख कुटुंबांना विजेचे बिल येणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. घरगुती वीज वापरणाऱ्या ग्राहकांना सौर मुक्ती दिली जाईल. तसेच, शेतकऱ्यांसाठी साडेसात अश्वशक्ती (७.५) ऊर्जा वापरण्याचा निर्णय कायम ठेवला असून, यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात वीज उपलब्ध होईल.

### शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक दोघांनाही मोठा दिलासा

» या घोषणांमुळे राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक दोघांनाही मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. हरित ऊर्जेच्या वापरामुळे पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होईल, तर वीज दरात कपात आणि मोफत वीज योजनेमुळे आर्थिक भार हलका होईल.



# ना हनी ना ट्रॅप; पेन ड्राईव्ह बॉम्ब आमच्यापर्यंत आलाच नाही - फडणवीस

## पावसाळी अधिवेशनाचे सूप वाजले; ८ डिसेंबरपासून हिवाळी अधिवेशन

मुंबई, दि. १८ वृत्तसंस्था

विधीमंडळ पावसाळी अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस होता. अधिवेशनाचेआज सूप वाजले; ८ डिसेंबरपासून हिवाळी अधिवेशन होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विरोधकांच्या सर्व प्रश्नांना उत्तर दिलं. गेल्या दोन दिवसांपासून एका हनीट्रॅपच्या प्रकरणाची चर्चा आहे. काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी तर विधानसभेच्या सभागृहात थेट पेनड्राईव्ह दाखवला होता. त्यामुळे एकच खळबळ उडाली होती. या आरोपांवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका मांडली. हनीट्रॅप प्रकरणाची कोणतीही तक्रार आलेली नाही, असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. मुख्यमंत्र्यांनी हनीट्रॅपच्या सर्व आरोपांचं खंडन केलं आहे. ना हनी आहे, ना ट्रॅप आहे, असं देवेंद्र फडणवीस सभागृहात म्हणाले आहेत. सध्या सभागृहात हनी ट्रॅपी प्रकरणाची चर्चा होतेय. पण ना हनी आहे ना ट्रॅप. नाना पटोलेंनी सभागृहात पेन ड्राईव्ह दाखवत बॉम्ब आणला होता असं समजतंय. पण नानाभाऊंचा बॉम्ब आमच्यापर्यंत आलाच नाही, असा टोला लगावतानाच कोणत्याही आजी-माजी मंत्र्याची हनी ट्रॅपची तक्रार नाही असे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिले.



राज्यात गेल्या आठवडाभरापासून हनी ट्रॅप प्रकरणाची चर्चा होत आहे. ७२ आजी- माजी अधिकारी आणि काही बडे नेते हनी ट्रॅपमध्ये अडकले असून, या हनी ट्रॅपचा सूत्रधार नाशिकचा (पान २ वर)

### राज्यात गुन्हेगारी कमी

» विरोधकांनी राज्यात गुन्हेगारी वाढल्याचा आरोप केला. यावर फडणवीस म्हणाले, २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये गुन्हे ११,६५६ ने कमी आहे. म्हणजे ६.७५ टक्क्यांनी गुन्हे कमी झाले आहेत. यात हत्या, दरोडा, हत्येचा प्रयत्न अशा सर्वच स्वरुपाचे गुन्हे कमी झाले आहेत. सायबर गुन्हे उघडकीस येण्याचे प्रमाण २०२२ मध्ये १६.४५ टक्के होते ते आता १९ टक्क्यांवर गेलं आहे. सायबर गुन्ह्यात फसवणूक झालेल्यांपैकी जी काही रक्कम ताब्यात येणाऱ्या रकमेचं प्रमाण २०२१ मध्ये २.७५ टक्क्यांवरून २०२४ मध्ये १६ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. नागपूरमध्येही गुन्हे कमी झाले आहेत. राज्यात गुन्हे कमी होण्याचे प्रमाण ६.५ टक्के आहे तर नागपूरमध्ये हेच प्रमाण ११ टक्के आहे. नागपूरमध्ये प्रतिबंधात्मक कारवाईमध्ये १२ टक्क्यांची वाढ होतेय. महिला अत्याचाराच्या प्रकरणात गुन्हे उकल होण्याचे प्रमाण ९१ टक्के आहे. बलात्काराच्या प्रकरणात ९८ टक्के केसेसमध्ये आरोपींना अटक झालीये. दुर्दैवाची बाब म्हणजे बलात्काराच्या प्रकरणांमध्ये ९९.५२ टक्के आरोपी हे पीडितेच्या ओळखीचे किंवा नातेवाईक आहेत.

## जितेंद्र आव्हाडांवर गुन्हा दाखल

मुंबई, दि. १८ वृत्तसंस्था

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विधानभवनात घडलेल्या हाणामारीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली आहे. जितेंद्र आव्हाड आणि भारतीय जनता पक्षाचे आमदार गोपीचंद पडळकर यांचे समर्थक एकमेकांना भिडले होते. या घटनेने राजकीय वर्तुळात खळबळ माजवली असून, आव्हाड यांच्यावरील गुन्ह्यामुळे प्रकरणाने गंभीर वळण घेतले आहे. या हाणामारीनंतर पोलिसांनी दोन्ही गटांतील काही कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. यामध्ये नितीन देशमुख यांचाही समावेश होता. दरम्यान, नितीन देशमुख यांना पोलिसांनी विधानभवनातून बाहेर घेऊन जात असताना जितेंद्र आव्हाड यांनी पोलिसांची गाडी अडवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांच्या अटकेविरुद्ध तीव्र आक्षेप घेत पोलिस गाडीसमोर ठिय्या आंदोलन केले.

## मसूद अझर पाकव्याप्त काश्मिरमध्ये पाकिस्तानचा खोटारडेपणा पुन्हा उघड

नवी दिल्ली, दि. १८ वृत्तसंस्था

भारतातील अनेक दहशतवादी हल्ल्यांचा मास्टरमाईंड असलेला जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मसूद अझर पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. भारताच्या गुप्तचर यंत्रणांनी मिळवलेल्या ताज्या माहितीप्रमाणे, अझर सध्या पाक व्याप्त काश्मीरमधील गिलगिट-बाल्टिस्तानमधील स्कर्दू शहरात लपून बसला आहे. हे ठिकाण त्याच्या पारंपरिक बहावलपूरमधील अड्ड्यापासून तब्बल १००० किलोमीटर अंतरावर आहे. या माहितीमुळे पाकिस्तानचा दहशतवादाला पाठबळ देणारा चेहरा पुन्हा उघड झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मसूद अझर स्कर्दूतील सादपारा रोड परिसरात काही मदरसे आणि मशिदींमध्ये दिसला आहे. याच भागात काही खासगी आणि सरकारी गेस्ट हाऊसही आहेत. पर्यटकांमध्ये लोकप्रिय असलेल्या स्कर्दूमध्ये जैशचा प्रमुख इतक्या शांत ठिकाणी लपल्याने सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या आहेत.



भारतीय गुप्तचर संस्थांनी अझरच्या हालचालींवर बारीक नजर ठेवली आहे. दरम्यान, जैशच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरून अझरच्या जुन्या भाषणांचे ऑडिओ क्लिप्स पुन्हा प्रसारित करून तो अजुनही बहावलपूरमध्येच असल्याचा खोटा प्रचार केला जात आहे. मसूद अझरचे दोन प्रमुख अड्डे बहावलपूरमध्ये होते. जामिया सुब्हान अल्लाह (जिथे भारताने ऑपरेशन सिंदूर दरम्यान हल्ला केला होता) आणि जामिया उस्मान ओ अली, जी त्याच्या जुन्या घराजवळील एक मशिद आहे. ऑपरेशन सिंदूरमधील भारताच्या हल्ल्यात अझरच्या कुटुंबातील १० सदस्यांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. पाकिस्तानचे माजी परराष्ट्रमंत्री बिलावल भुट्टो यांनी अलीकडेच अझर (पान २ वर)

## लालूप्रसाद यादव यांना सर्वोच्च न्यायालयाचा धक्का!

नवी दिल्ली, दि. १८ वृत्तसंस्था

नोकरीसाठी जमीन घोटाळा प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालूप्रसाद यादव यांना मोठा धक्का दिला आहे. लालू प्रसाद यादव यांच्याविरुद्ध कनिष्ठ न्यायालयाच्या खटला चालू ठेवण्याच्या आदेशाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. तसेच, दिल्ली उच्च न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी जलद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाच्या कार्यवाहीत उपस्थित राहण्याची सूट लालूप्रसाद यादव यांना दिली आहे.



आरजेडी सुप्रीमो या प्रकरणात दिलासा मिळविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. तत्पूर्वी, दिल्ली उच्च न्यायालयाने लालू यादव यांची ही मागणी फेटाळून लावली होती. दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले होते की, आदेशाला स्थगिती देण्याचे कोणतेही ठोस कारण नाही. उच्च न्यायालयाने सीबीआयला नोटीस बजावली होती आणि सुनावणी १२ ऑगस्टपर्यंत तहकूब केली होती. लालू प्रसाद यादव यांनी त्यांच्या याचिकेत २०२२, २०२३ आणि २०२४ मध्ये दाखल केलेल्या सीबीआय एफआयआर आणि तीन आरोपपत्रे आणि संज्ञानात्मक आदेश रद्द करण्याची मागणी केली होती. त्यांनी म्हटले होते की, हा अहवाल १४ वर्षांच्या विलंबाने २०२२ मध्ये दाखल करण्यात आला होता. तर सक्षम न्यायालयात क्लोजर रिपोर्ट दाखल केल्यानंतर सीबीआयने केलेली प्राथमिक चौकशी आणि तपास बंद करण्यात आला होता. मागील तपास आणि त्याचा क्लोजर रिपोर्ट लपवून नवीन तपास सुरू करणे हे कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर आहे. त्यामुळे बेकायदेशीर तपासामुळे यादव त्रस्त आहेत. नि:पक्ष चौकशीच्या त्यांच्या मूलभूत अधिकाराचे हे उल्लंघन आहे. सध्याची चौकशी बेकायदेशीर आहे. कारण दोन्ही अनिवार्य मंजुरीशिवाय सुरू करण्यात आली आहेत. अशा मंजुरीशिवाय केलेली कोणतीही चौकशी सुरुवातीपासूनच अवैध असेल. (पान २ वर)

## एकाच रात्रीत पाडले ६ पाकिस्तानी नार्को ड्रोन!

**अमृतसर :** सीमा सुरक्षा दल सतर्क जवानांनी गुरुवारी रात्री एक उल्लेखनीय कामगिरी केली. अमृतसरच्या सीमावर्ती भागात अनेक घटनांमध्ये ६ पाकिस्तानी नार्को ड्रोन त्यांनी पाडले. यावेळी शेतात पडलेले हेरॉइनची चार पॅकेटसदेखील जप्त करण्यात आली आहेत.

बीएसएफच्या मते, १७ जुलैच्या रात्री, कर्तव्यावर तैनात असलेल्या सतर्क जवानांनी अमृतसर सीमेवर सतत ड्रोन घुसखोरी रोखली. जवानांनी त्वरित प्रतिसाद दिला आणि सीमेवर तैनात केलेल्या तांत्रिक प्रतिउत्तरात्मक उपाययोजना सक्रिय केल्या. त्यांच्या मदतीने, पाकिस्तानकडून येणारा प्रत्येक नार्को ड्रोन निष्क्रिय करण्यात आला. त्यानंतर, बीएसएफने केलेल्या शोध मोहिमेत, पुलमोरन गावाजवळील शेतातून ४ (पान २ वर)

## एनआयए प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी विशेष न्यायालये आवश्यक : सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली, दि. १८ वृत्तसंस्था

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, एनआयए (राष्ट्रीय तपास संस्था) प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी विशेष न्यायालये आणि स्वतंत्र पायाभूत सुविधा आवश्यक आहेत, जर त्या लवकर निर्माण केल्या नाहीत तर न्यायालयांना आरोपींना जामीन देणे भाग पडेल.

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने शुक्रवारी सांगितले की, जर केंद्र आणि राज्य सरकारने वेळेवर सुनावणीसाठी विशेष न्यायालये निर्माण केली नाहीत, तर न्यायालयांना अंडरट्रायल आरोपींना जामीन देण्याशिवाय पर्याय राहणार नाही. न्यायालयात एका खटल्याची



सुनावणी सुरू झाली नसतानाही, आरोपी वर्षानुवर्षे तुरुंगात होता. यूएपीए आणि मकोका सारख्या गंभीर प्रकरणांमध्ये जलद सुनावणीसाठी स्वतंत्र विशेष न्यायालये आवश्यक असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. एनआयए सचिवांच्या प्रतिज्ञापत्रावरही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आणि म्हटले आहे की सरकारने खटला जलद गतीने चालविण्यासाठी कोणती ठोस पावले उचलली याचा कुठेही उल्लेख नाही. विशेष प्रकरणांमध्ये होणाऱ्या संथगतीने होणाऱ्या खटल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही चिंता व्यक्त केली होती. न्यायालयाने म्हटले आहे की, जेव्हा एखादी व्यक्ती वर्षानुवर्षे तुरुंगात असते आणि खटला सुरूही झालेला नसतो, तेव्हा जामीन देणे किंवा न देणे हे संविधानाच्या कलम २१ (वैयक्तिक स्वातंत्र्य) चे थेट उल्लंघन होते. यापूर्वी १६ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयाने देशातील न्यायालयांमधील शौचालयांसारख्या मूलभूत सुविधांच्या स्थितीवर कठोर भूमिका घेतली होती. न्यायालयाने नाराजी व्यक्त करत म्हटले होते की, देशातील २५ पैकी २० उच्च न्यायालयांनी शौचालय सुविधा सुधारण्यासाठी कोणती पावले उचलली आहेत (पान २ वर)

# 'आमदार माजलेत' अशा प्रकारच्या प्रतिक्रिया येत आहेत - फडणवीस

## अधिवेशन काळात विधानभवनात आमदारांचा पीए आणि शासकीय अधिकाऱ्यांनाच प्रवेश

मुंबई, दि. १८ वृत्तसंस्था

भारतीय जनता पार्टीचे आमदार गोपीचंद पडळकर आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांनी गुरुवारी विधानभवनात हाणामारी केली. या घटनेची विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी गंभीर दखल घेतली. अधिवेशन काळात विधिमंडळाच्या सदस्यांसोबत विधानभवनात त्यांच्या पीए आणि शासकीय अधिकाऱ्यांनाच प्रवेश देण्यात येईल. अन्य कोणालाही विधानभवनात प्रवेश दिला जाणार नाही, अशी घोषणा विधानसभाध्यक्षांनी केली.

विधानभवनात काल घडलेला प्रकार अतिशय वाईट होता. याआधी विधानभवनात असा प्रकार कधीही घडलेला नव्हता. विधानभवनाची

### विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली घोषणा



प्रतिष्ठा राखण्याची जबाबदारी सगळ्या सदस्यांची आहे, असे विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सर्व आमदारांना सुनावले. पुढे आमदारांसह केवळ त्यांचे पीए आणि शासकीय अधिकाऱ्यांनाच विधानभवनात प्रवेश असेल, असंही नार्वेकर म्हणाले. त्यांनी आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांना दिलगिरी व्यक्त करण्याच्या सूचना दिल्या. यानंतर दोन्ही आमदारांनी घडलेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केली.

**आमदारांवर कडाडले मुख्यमंत्री :** यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही संताप व्यक्त केला. नार्वेकर यांनी आव्हाड यांना दिलगिरी व्यक्त करण्यास सांगितल्यावर आव्हाड यांनी मी काल एकटाच आलो होतो. माझ्यासोबत कोणीही आलेलं नव्हतं. त्यामुळे सदनाच्या रेकॉर्डवर चुकीची माहिती येऊ नये, असं म्हणत बाजू मांडली. त्यावर तुम्ही (पान २ वर)

### ...हे योग्य नाही

» विधानभवनात गुरुवारी जी मारामारी झाली ती दुर्दैवी आहे. हे विधानभवनाला शोभणारे नाही. ते होणे योग्य नाही. हे टाळण्यासाठी सभागृहाच्या सदस्यांसोबत विधानभवनात कोण येते - जाते यावर नियंत्रण हवे. काहींनी चूक केली म्हणून सर्वांना शिक्षा नको. सर्जेराव टकलेवर सहा आणि नितीन देशमुखवर आठ गुन्ह्यांची नोंद आहे. ही अशी माणसं विधानभवनात येऊन मारामारी करतात, हे योग्य नाही. अध्यक्षांनी पासबाबत घेतलेला निर्णय योग्य आहे. योग्य सुरक्षा व्यवस्था आवश्यक आहे. कुठलाही अभ्यागत येऊ द्या, बिल्ल्याशिवाय तो दिसता कामा नये. एखाद्याने येऊन अतिरेकी कृत्य केले तर जबाबदार कोण ? आमदार बिल्ला लावून येतात पण गळ्यात किमान एक ओळखपत्र असावे. जर हे होत नसेल तर सुरक्षा रक्षकांनी त्यास बाहेर काढावे; असेही मुख्यमंत्री म्हणाले.

## इंडिया आघाडीतून 'आम आदमी पक्ष' बाहेर!

नवी दिल्ली, दि. १८ वृत्तसंस्था

आम आदमी पक्षाने (आप) विरोधी पक्षांच्या आघाडी इंडिया ब्लॉकच्या पुढील महत्त्वाच्या बैठकीपासून स्वतःला दूर ठेवले आहे. पक्षाने या बैठकीत सहभागी होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. पक्षाने इंडिया अलायन्सपासून स्वतःला दूर केले आहे. आम आदमी पक्षाचे (आप) खासदार संजय सिंह यांनी स्पष्ट केले आहे की त्यांचा पक्ष इंडिया ब्लॉकमधून बाहेर पडला आहे.

एका हिंदी वृत्तवाहिनीशी बोलताना संजय सिंह यांनी, इंडिया ब्लॉक लोकसभा निवडणुकीसाठी होता. लोकसभा निवडणुकीनंतर आम्ही हरियाणा आणि दिल्ली विधानसभा निवडणुका एकट्याने लढवल्या. याशिवाय, आम्ही पंजाब आणि गुजरातमधील पोटनिवडणुकाही एकट्याने लढवल्या. 'आप' आता



इंडिया ब्लॉकचा भाग नाही. आमचा पक्ष आणि अरविंद केजरीवाल यांनी स्पष्ट केले आहे की आम्ही इंडिया ब्लॉकमधून बाहेर आहोत, असे म्हणत आघाडीतून त्यांचा पक्ष बाहेर पडला असल्याची घोषणा केली. संसदेतील रणनीतीबद्दल बोलताना संजय सिंह यांनी, संसदीय मुद्द्यांवर आम्ही तृणमूल काँग्रेस, द्रमुक सारख्या विरोधी पक्षांचा पाठिंबा घेतो आणि ते आमचाही पाठिंबा घेतात, (पान २ वर)

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
शनिवार, दि. १९ जुलै २०२५

डॉ. पांडेस् मेड. रेमेडीज (OPC) प्रा.ली.
डॉ. रविराज पांडे (एम.डी.)
वात, दमा, अस्थमा, वजन वाढविणे, कमी करणे, त्वचा रोग, वंधत्व, लैंगिक समस्या, स्त्री रोग, सर्व प्रकारच्या व इतर रोगांवर उपचार व मार्गदर्शन केल्या जाईल.
व्यंकटेश कॉलनी, शंकरनगर जवळ, अमरावती. ( दर सोमवारी )
C/o राईकवार हॉस्पिटल जयस्तंभ चौक परतवाहा ( दर महिन्याचा 3 रा. शनिवार )
C/o महाराष्ट्र मेडिकल बनोसा रोड, दर्यापूर ( दर महिन्याचा 2 रा. गुरुवार )
वेळ : दुपारी 2 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत
मो. 9890043911, 9372151186

## थोडक्यात

### जागेच्या वादातून काठीने मारहाण

**ब्राम्हणवाडा थडी :** जागेच्या वादातून एकाला शिवीगाळ करून काठीने मारहाण करण्यात आली. बारीपुरा, घाटलाडकी येथे ही घटना १५ जुलै रोजी घडली. याप्रकरणी एकाला अटक करून न्यायालयासमोर हजर केल्यानंतर त्याची तुरूंगात रवानगी करण्यात आली. घटनेच्या दिवशी नंदकिशोर अशोक बिरे हे मित्रासह चुलतभावासोबत गप्पा मारीत असताना बाळू अशोक बिरे याने जागेच्या वादातून त्यांना मारहाण करून गंभीर जखमी केले. याप्रकरणी ब्राम्हणवाडा पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली होती.

### क्षुल्लक कारणावरून युवकाला मारहाण

**चांदूररेल्वे :** लाकूडफाटा नेण्यावरून वाद होवून यात युवकाला तिघांनी संगनमत करून लाथाबुक्यांनी मारहाण केली. तालुक्यातील सोनगाव येथे ही घटना १६ जुलै रोजी घडली. अमित रमेश फत्तपुरे वय २९ असे जखमीचे नाव आहे. याप्रकरणी चांदूररेल्वे पोलीस ठाण्यात तक्रारीवरून साहेब राऊत, वैभव राऊत व प्रमोद राऊत सर्व रा. सोनगाव यांच्याविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

### १२ लाखांसाठी छळ

**चांदूरबाजार :** माहेरहून १२ लाख रूपये आणण्यासाठी तगादा लावून मानसिक व शारीरिक छळ करून जीवे मारण्याची धमकी दिली तसेच घरातून हाकलून दिले. याप्रकरणी पीडित महिलेने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी सदर प्रकरण महिला समुदेशन केंद्राकडे पाठविले होते. या अहवालावरून सम्राट मोहन कविशकर वय ३६, रा. झिंगाबाई टाकळी, नागपूर याच्याविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला.

### परतवाड्यातून दोन मोटारसायकली लंपास

**परतवाडा :** अंजनगाव ते परतवाडा मार्गावरील गोदामासमोर उभी करून ठेवलेली मुर्तीकाराची एमएच २७ ऐटी १७८५ क्रमांकाची मोटारसायकल किंमत अंदाजे ३० हजार अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची १४ जुलै रोजी घडली. याप्रकरणी अक्षय गजानन डोईफोडे यांनी परतवाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली तर दुसरी घटना अग्रवाल ट्रेडर्स, मिश्रा, लाईन, परतवाडा येथे दुकानासमोर उभी करून ठेवलेली एमएच २७ बिसी ८९४५ क्रमांकाची दुचाकी किंमत अंदाज ४० हजार अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना 16 जुलै रोजी घडली. याप्रकरणी राजेश ठोकणे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आली.

### घरात शिरून महिलेची छेडखानी

**बरूड :** जबरीने घरात शिरून एका ३४ वर्षीय युवकाने महिलेची छेड काढली. वरूड पोलीस ठाणे हद्दीत ही घटना 16 जुलै रोजी घडली. पीडित ४२ वर्षीय महिलेच्या तक्रारीवरून अनिकेत अरूण काळमेघ रा. वरूड याच्याविरूध्द वरूड पोलीस ठाण्यात विनयभंग कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

### चारित्र्यावर संशय घेवून मारहाण

**तिवसा :** तुझे इतर कोणासोबत प्रेमसंबध आहेत या संशय घेत दारूच्या नशेत शिवीगाळ व मारहाण करीत असल्याची तक्रार पीडित महिलेने तिवसा पोलीस ठाण्यात केली. त्या आधारे देवानंद विष्णूपंत भुरे रा. मोझरी याच्याविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

# शिक्षणाचा व्यापार होणार बंद!

## इंटिग्रेटेड क्लासेस व बोगस महाविद्यालयांवर शिक्षणमंत्र्यांचा चाप | शिक्षणमंत्री भुसे यांची घोषणा, अजिंक्य भारतच्या वृत्ताची दखल

अजिंक्य भारत | संजय देशमुख

***अमरावती :** वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांसाठी 'इंटिग्रेटेड क्लास' च्या नावाखाली अमरावतीत शिक्षणाचे बाजारीकरण उघडपणे सुरू झाले आहे. यामध्ये ना कोणती अधिकृत मान्यता, ना कोणते नियमपालन. शिक्षणविभागाच्या दुर्लक्षामुळे आणि पालकांच्या अनभिज्ञतेमुळे हजारो विद्यार्थी चुकीच्या मार्गावर भरकटत असल्याचा गंभीर प्रकार 'दै.अजिंक्य भारत' ने उघडकीस आणला होता. यासंदर्भात १० जुलैरोजी 'इंटिग्रेटेड क्लासच्या आडून शिक्षणाचा व्यापार' या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताची गंभीर दखल राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी घेतली असून अशा क्लासेस व त्यांना साथ देणाऱ्या महाविद्यालयांवर कडक कारवाई करण्याचे संकेत दिले आहे.*




**शिक्षण व्यवस्थेतील गैरप्रकार रोखण्यासाठी कायदा बनणार**

**विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या इंटिग्रेटेड क्लासेसवर कडक कारवाईची तयारी- खाजगी शिकवणीसाठी नवा कायदा लवकरच**

वैद्यकीय, अभियांत्रिकी अशा अभ्यासक्रमाचे उज्वल स्वप्न साकारू पाहणाऱ्या विद्यार्थी व पालकांकडून अकरावीतच लाखोंची 'फि' भरून इंटिग्रेटेड क्लासला प्रवेश घेतला जात होता, तर दुसरीकडे बोर्डाची परीक्षा देण्याकरिता या क्लासेसशी टायप असलेल्या एखाद्या बोगस महाविद्यालयात नाममात्र प्रवेश घेतला जात होता. निव्वळ विद्यार्थ्यांचे बोर्डाच्या परीक्षेला पात्र होण्यासाठी रेकॉर्ड तयार करून त्या बदल्यात 'फी' च्या रुपाने लाखो रुपये गोळा करणाऱ्या या महाविद्यालयात तसेच क्लासेसमध्ये प्रात्यक्षिक वर्गासाठी आवश्यक असणारी लॅब, साधनसामग्री नसल्याने विद्यार्थ्यांना निव्वळ पुस्तकी ज्ञान देण्यात येत आहे. परीक्षेच्यावेळी प्रात्यक्षिक परीक्षा मॅनेज करून विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक गुण बोर्डाकडे पाठविण्यात येते. सायन्स विषयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जीवशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र या विषयांमध्ये प्रयोगशाळांचा अनुभव अनिवार्य असताना या विद्यार्थ्यांनी प्रयोगशाळा पाहिलेलीच नाही. शिक्षणाच्या या अर्धवट आणि कुचकामी पद्धती मुळे गुणवत्ते ऐवजी केवळ मार्कावर भर राहत होता. गंभीर प्रकाराकडे शिक्षण विभाग तसेच स्थानिक प्रशासनाचे लक्ष वेधण्याकरिता 'दै.अजिंक्य भारत' ने दहा व १० व १४ जुलैरोजी यासंदर्भात वृत्त प्रकाशित करून पडद्याआड चालणारा हा सर्व प्रकार चव्हाट्यावर आणला होता. या वृत्ताची गंभीर दखल घेत राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी इंटिग्रेटेड क्लास व त्याला साथ देणाऱ्या क्लास व महाविद्यालयांवर नियंत्रण आणण्याची घोषणा १६ जुलैरोजी विधानसभेत केली. ज्या महाविद्यालयांनी अशा इंटिग्रेटेड शिकवणी वर्गाशी करार करून शिक्षण व्यवस्थेचा गैरवापर चालविला आहे, अशा प्रकारांना आळा घालण्याकरिता कायदा तयार करण्याची घोषणा शिक्षणमंत्री भुसे यांनी केली असून या निर्णयाचे सर्वत्र स्वागत केल्या जात आहे.

> राज्यातील काही महाविद्यालय थेट खाजगी शिकवणी वर्गाशी करार करून शिक्षण व्यवस्थेचा गैरवापर करीत आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी खाजगी शिकवणी अधिनियम तयार करण्यात येणार आहे. या अधिनियमानाचा मसुदा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असून संबंधित नियमावलीची आखणी देखील सुरू आहे. या अधिनियमनाच्या मसुद्याबाबत सदस्यांकडून सकारात्मक सूचना आल्यास त्याचाही विचार केला जाईल.
>
> **दादा भुसे**
> **शालेय शिक्षणमंत्री म.रा.**
>
> विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी कोणताही संबंध नसलेल्या निव्वळ पैसा कमविण्यासाठी उघडण्यात आलेली म्हविद्यालयरुपी दुकानांना टाळे लावणे आवश्यक झाले आहे. इंटिग्रेटेड क्लाससी टायप करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा खेळ मांडणाऱ्या या संस्था देशाची एक सशक्त पिढी घडविण्यात एकप्रकारे खोडा घालण्याचे काम करीत आहे. ज्ञानार्जनाचे आभासी चित्र उभे करून त्यामागून विद्यार्थी व पालकांना लुटणाऱ्या शिक्षणसम्राटांचा बंदोबस्त शिक्षणमंर्त्याच्या या कारवाईने होणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# अमरावतीत पहिल्यांदाच 'कंटिन्युअस ॲक्युपंक्चर एज्युकेशनवर' कार्यशाळा

### अनुभवी व तज्ञ डॉक्टर मार्गदर्शन करणार

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. १८ :** कौन्सिल फॉर मेडिकल अँड पॅरामेडिकल सायन्सतर्फे अमरावतीत पहिल्यांदाच कंटिन्युअस ॲक्युपंक्चर एज्युकेशन (सीएई) कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम रविवार, २० जुलै २०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हॉटेल रामगिरी इंटरनॅशनल, एस. टी. रोड, रेल्वे स्टेशन जवळ, अमरावती येथे पार पडणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन सकाळी 9 वाजता मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात येणार आहे.अशी माहिती कौन्सिल फॉर मेडिकल अँड पॅरामेडिकल सायन्सचे चेअरमन डॉ. रविराज पांडे यांनी पत्रकार परिषदेत सांगितली. यावेळी डॉ. रविराज पांडे, डॉ. रत्नाकर बनसोड, ॲड. रत्नपाल लांजेवार, डॉ. प्रवीण सावळे, रंजित बसनाथे, दिपक करवा, प्रथमेश देशमुख, नदीम अहमद उपस्थित होते. या संदर्भात अधिक माहिती देतांना डॉ. पांडे म्हणाले कौन्सिल फॉर मेडिकल अँड पॅरामेडिकल सायन्सतर्फे आयोजित कार्यशाळेला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार रवी राणा,माजी खासदार नवनीत राणा,विलास मारसाले उपविभागीय आयुक्त महिला व बालविकास, अमरावती विभाग तर विशेष पाहुणे म्हणून नवनाथ घनोडे बालविकास प्रकल्प अधिकारी,शिवाजी कुचे डॉ. त्रिदीप गुहा आयुष्मान ॲक्युपंक्चर कॉलेज, नागपूर, डॉ. सतीश कराळे एआयएमए अध्यक्ष,डॉ. नितीन पाटील एआयएमए उपाध्यक्ष डॉ. अभिजीत कवठकर, प्रविण सवाले, ब्रजेश पांडे एएसएम ईमामी लि.उपस्थित राहणार आहेत.

> महाराष्ट्र कौन्सिल ऑफ अॅक्युपंक्चरचे स्पीकर्स श्रीपाद चोडणकर, संजीवनी चोडणकर, डॉ. नेहा पाटणकर विशेष सत्रात डॉ. रुमी एफ. बेरामजी (व्हिडिओ कॉलद्वारे सकाळी १० वा.) एम. सी.ए. एज्युकेशन कमिटीचे चेअरमन डॉ. मयंक शाह ४३ वर्षांचा अनुभव हे व्हिडिओ कॉलद्वारे सकाळी १०.१५ वा. वाजता कार्यशाळेतील उपस्थितांना कार्यशाळेत मार्गदर्शन करतील. डॉ. रविराज पांडे डॉ. पांडे कौन्सिल फॉर मेडिकल अँड पॅरामेडिकल सायन्स चे डॉ. रविराज पांडे यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमात अॅक्युपंक्चर क्षेत्रातील नवनवीन संशोधन, उपचार पद्धती आणि शैक्षणिक घडामोडींवर सविस्तर चर्चा होणार आहे. शहरातील वैद्यकीय व्यावसायिक, तज्ज्ञ आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन कौन्सिल फॉर मेडिकल अँड पॅरामेडिकल सायन्सचे डॉ. रविराज पांडे यांनी केले आहे.

# न.पं. च्या विकासकामात भाजप पदाधिकाऱ्यांची लुडबूड

## आमदारांची बघ्याची भूमिका; कान भरणारा 'तो' कार्यकर्ता कोण ?

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर, दि. १८ :** नांदगाव खंडेश्वर शहरातील विविध विकास कामांचे नुकतेच नगर पंचायतीच्या वतीने भूमिपूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन स्थानिक आमदारांच्या हस्ते करण्यात आले असले तरी या कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाच्या काही पदाधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात लुडबुड करत ही कामे केवळ त्यांच्या अथक प्रयत्नांतून मंजूर झाल्याचा खोटा देखावा उभा केला. प्रत्यक्षात ही सर्व कामे नगर पंचायतीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे आणि नियोजनाचे फलित होते हे मात्र भाजप पदाधिकाऱ्यांनी जाणीव पूर्वक दुर्लक्षित केले.




या भूमिपूजन कार्यक्रमात भाजप पदाधिकाऱ्यांनी काही निवडक पत्रकारांनाच आमंत्रित केले. विशेष म्हणजे हे पत्रकार कायम त्यांच्या पाठीमागे फिरत असलेले आणि नको तेथे अनुकूल वृत्तांकन करणारे आहेत. इतर स्थानिक पत्रकारांना या कार्यक्रमाबाबत कोणतीही माहिती देण्यात आली नाही. या प्रकारातून पक्षाच्या एका विशिष्ट गटाचे हितसंबंध जपले जात असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. यामागे भाजपचाच एक कुटनितिक कार्यकर्ता असून तो आमदाराचे फक्त कान भरण्याचे काम करीत असल्याची चर्चा शहरात आहे. या साऱ्या प्रकाराबाबत आमदारांनी मात्र कोणतीही स्पष्ट भूमिका घेतली नाही. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घेतलेल्या या अहंकारी भूमिकेवर त्यांनी मौन बाळगले असल्याचे दिसून येते. त्यामुळे राजकीय वर्तुळात आमदारांची भूमिका केवळ बघ्याची असल्याची चर्चा दिसून येते. या कार्यक्रमात पक्षाच्या जुन्या जाणत्या कार्यकर्त्यांना पण दूर ठेवण्यात आल्याची चर्चा दबक्या आवाजात आहे. यामुळे पक्षातील गटबाजीला अप्रत्यक्ष पाठिंबा मिळतोय का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. नांदगाव खंडेश्वर शहरात भाजपची स्थिती अशी झाली आहे की, आमदारांपेक्षा पक्षाचे काही कार्यकर्तेच स्वत:ला सर्व शक्तिमान समजून घेत आहेत. सामान्य कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक यांच्या अपेक्षा, प्रश्न आणि सहभागाला दुय्यम स्थान दिले जात आहे. त्यामुळे भाजपाच्या जुन्या कार्यकर्त्यांमध्ये असंतोषाची भावना वाढीस लागली असल्याचे दिसून येते, आगामी काळात या रोषाचे पर्यवसन पक्षविरोधी वातावरणात होण्याची चिन्हे दिसून येत आहेत. आगामी काही महिन्यात नगर पंचायतीच्या निवडणुका होणार असून यामध्ये काही असंतुष्ट कार्यकर्ते पक्ष्याला या काडीबाज कार्यकर्त्यांच्या स्वभावामुळे इंगा दाखविणार असल्याचे बोलले जात आहे.

नगर पंचायतीच्या विकास कामांमध्ये पारदर्शकता आणि सर्व समावेशक सहभाग आवश्यक असताना सध्याची कार्यपद्धती ही पक्षाच्या संकुचित हितसंबंधांपुरती मर्यादित राहिली आहे, याची खंत जनतेतून व्यक्त केली जात असून आमदारांनी मात्र कान भरणाऱ्या कार्यकर्त्यां पासून वेळीच सावध होण्याची वेळ आली आहे अन्यथा पक्ष्याची वाट लागायला वेळ लागणार नाही हे मात्र तेवढेच खरे.!

# उड्डाणपूल सुनावणीत बांधकाम सचिवांना दंड

## न्यायालयाने १ लाख रूपयांचा ठोठावला दंड | ३१ डिसेंबरपर्यंत काम पूर्ण न झाल्यास कारवाईचे निर्देश

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि १८ :** इतवारा बाजार उड्डाणपुलाच्या रखडलेल्या बांधकामाबाबत अमरावतीचे माजी पालकमंत्री मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणीच्या आज दुसऱ्या दिवशी गुरूवारी न्यायालयाने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सर्व कागदपत्रांसह न्यायालयात उपस्थित राहण्याचे निर्देश दिले होते. त्याचप्रमाणे प्रधान सचिवांनी न्यायालया समक्ष प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास सांगितले होते. परंतु पावसाळी अधिवेशन सुरू असल्याचे कारण देत प्रधान सचिवांद्वारे न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले नव्हते. त्यांच्या वतीने ज्येष्ठ सरकारी अधिवक्ता देवेन चव्हाण यांनी उपस्थित राहून प्रधान सचिव अधिवेशनात व्यस्त असल्याकारणाने त्यांनी अतिरिक्त सचिवांना सविस्तर प्रतिज्ञापत्र दाखल करण्याबाबत कळवले असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. यावर न्यायालयाने अत्यंत कठोर भूमिका घेत मग या न्यायालयांमध्ये आम्ही कशाकरिता बसलेलो आहोत असा मौखिक संताप व्यक्त करीत प्रधान सचिव या जनहित याचिकेमध्ये प्रतिवादी असून त्यांना जनहित याचिकेची कॉपी सुद्धा यापूर्वीच दिलेली आहे आणि तशी नोटीस सुद्धा त्यांना बजावलेली होती. असे असतानाही अधिवेशनाचे कारण सांगून प्रतिज्ञापत्र दाखल न केल्याबाबत न्यायालयाने प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना एक लक्ष रुपयाचा दंड ठोठावला असून हा दंड त्यांनी स्वत:च्या पगारातून भरण्याचे निर्देश सुद्धा दिले आहेत. या जनहित याचिकेमध्ये याचिकाकर्ता डॉ. सुनील देशमुख यांचे वतीने अमरावती शहरातील उच्च न्यायालयाचे प्रतिष्ठीत वकील एड. शाहू चिखले यांनी याचिका कर्त्यांतर्फे अत्यंत प्रभावीपणे युक्तिवाद केला आहे.



तत्पूर्वी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती शुक्रवारी न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे न्यायालयात उपस्थित राहून न्यायालयाला फेब्रुवारी २०२६ पर्यंत या उड्डाणपुलाचे कार्य आम्ही पूर्ण करतो असे नमूद केले. विभागाने आणि कंत्राटदाराने आधीच इतका उशीर करूनही अजून तुम्हाला अजूनही, वेळ हवाच आहे काय? या शब्दात नाराजी व्यक्त करून तीन महिन्यात कोणत्याही परिस्थितीत या उड्डाणपुलाचे कार्य पूर्ण झाले पाहिजे असे स्पष्ट बजावले. यावर मुख्य अभियंत्यांनी सध्या सुरू असलेला पावसाळा येणाऱ्या काळातील गणपती, दिवाळी, रमजान इत्यादी सण व याच्या पार्श्वभूमीवर पूर्णतः रस्ता बंद करून काम करणे शक्य होणार नसल्याचे न्यायालयाचे निदर्शनास आणून दिले. त्यावर न्यायमूर्ती यांनी त्यांचे म्हणणे अंशत: ग्राह्य धरून जास्तीत जास्त ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी या उड्डाणपुलाचे कार्य पूर्णत्वास गेलेच पाहिजे. अन्यथा कंत्राटदारासह संबंधितांवर उच्च न्यायालयाचा अवमान केल्या प्रकरणी कारवाई करणार असल्याचे निक्षून सांगितले.

हे कार्य पूर्ण करत असताना जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, आयुक्त महानगरपालिका यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला तातडीने सहकार्य करण्याच्या सूचना देखील यावेळी उच्च न्यायालयाने केल्या आहेत. तब्बल सात ते आठ वर्षांपासून रखडलेले अमरावती शहरातील पायाभूत सुविधांचे हे अत्यंत महत्तवपूर्ण काम न्यायालयाच्या दंडुक्यानंतर आता निश्चित मार्गी लागणार आहे.

याप्रकरणी उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश व ३१ डिसेंबर पूर्वी कोणत्याही परिस्थितीत काम पूर्ण करण्याचा सुस्पष्ट आदेशाबद्दल माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी समाधान व्यक्त करून अमरावती शहराच्या विकासाच्या कोणत्याही कामात आपण यापूर्वीही कटिबद्ध होतो व पुढेही राहू व उपलब्ध आयुधांचा वापर करू असा सार्थ विश्वास व्यक्त करीत उच्च न्यायालयाचे त्यांचे वतीने उच्च न्यायालयात यशस्वी पद्धतीने खिंड लढवली ते ॲड. शाहू चिखले यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त केले आहे. यापूर्वी तब्बल १४ वर्षांपासून रखडलेले अमरावती विमानतळाचे कार्य सुद्धा डॉ. सुनील देशमुख यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष जनहित याचिकेच्या रेट्यामुळेच मार्गी लागले होते हे विशेष.

अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा

बुलडाणा,शनिवार १९ जुलै २०२५ www.ajinkyabharat.com



# जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पीकविम्याकडे फिरविली पाठ!

## मागील वर्षीच्या तुलनेत अत्यल्प प्रतिसाद, सुधारित निकषाचा असाही परिणाम....

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१८ :** वर्षभर मेहनत करून पिकवलेले धनधान्य मातीमोल होत असेल तर शेतकरी कर्जबाजारी होतो. अशावेळी त्याला मदतीचा हात म्हणून पिक विमा दिल्या जातो. हे संरक्षण असताना सुद्धा शासनाने नव्याने आणलेले निकष व विमा कंपन्यांची मनमानी पाहता शेतकऱ्यांनी यंदा पीक विम्याकडेच पाठ फिरवल्याचे चित्र आहे. मागील वर्षी जवळपास पाच लाखाच्या आसपास जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पीक विमा उतरवला होता. यंदा हाच आकडा अवघ्या ९७ हजारावर येऊन थांबला आहे.तुलनात्मक दृष्ट्या जर पाहिले तर पाचपट पिक विमा कमी उतरवल्या गेल्याचे जिल्ह्यातील चित्र आहे.

शेतकरी दरवर्षी पिक विमा काढतात. त्यासाठी निर्धारित केलेले रक्कम भरतात.




परंतु बऱ्याचदा विमा कंपन्या शेतकऱ्यांना नागवण्याचे काम करतात. काही वेळेला रीतसर असताना सुद्धा त्याला नुकसान भरपाई दिली जात नाही. शासन दरबारी वारंवार चकरा करून पीक विमा पदरात पाडून घेणे याला आता शेतकरी कंटाळले आहेत. पूर्वीच्या सरकारमध्ये कमी पैशांमध्ये पिक विमा काढण्याची तरतूद होती. यंदा मात्र पीक विम्याचे दरही शासनाने वाढविले आहे. सोयाबीन साठी हेक्टरी ११६० रुपये शेतकऱ्यांना आता मोजावे लागतात.मागील वर्षी ४७२,५८४ शेतकऱ्यांनी विविध पिकांचा विमा उतरला होता. यासाठी ६३५.७४ कोटी रुपये मंजूर झाले पैकी दोन लाख २२ हजार शेतकऱ्यांना ३१६ कोटीचे वाटप झाल्याची सूत्रांची माहिती आहे.

कशी आहे हेक्टरी पिक विमा रक्कम..

पिक विमा काढण्यासाठी पीकनिहाय रक्कम निर्धारित करण्यात आली आहे. यामध्ये ज्वारी एक हेक्टर साठी ८२ रुपये पीक विमा काढावा लागतो. त्याचप्रमाणे सोयाबीन हेक्टरी ११६० रुपये, मुग हेक्टरी ७० रुपये ,कपाशी हेक्टरी ९०० रुपये, उडीद ६२ रुपये, तूर ४७०, मका ९० रुपये अशा पद्धतीने पीक विम्याची रक्कम भरावी लागते.

यंदा निकषांमध्ये बदल

साधारणता पाच निकषांवर आधारित पीक विमा दिला जायचा. यामध्ये पेरणी उशिरा झाली असेल तर, २५ टक्क्यांपेक्षा कमी पेरणी झाली असेल तर, मध्यावधी नुकसान.. जसे नैसर्गिक आपत्ती किंवा पावसाचा खंड पडला आणि पीक वाया गेले, व काढणी पश्चात असे निकष लावले जायचे.यावर्षी मात्र या निकषांमध्ये बदल करून फक्त पीक काढणी हाच निकष लावलेला आहे. म्हणजे उत्पन्नाच्या आधारे आता पिक विमा मिळणार आहे.

शासनाकडून विमा कंपनीला रक्कम देण्याची घोषणा झाली आहे. पुढील पंधरा दिवसांमध्ये विम्याची रक्कम शेतकऱ्यांना मिळण्याची शक्यता आहे. ३१९ कोटी रुपये शेतकऱ्यांना मिळणे बाकी आहे.

मनोज कुमार ढगे,
जिल्हा कृषी अधिकारी बुलढाणा

# हुमणी अळीमुळे शेतकरी हवालदिल

## नुकसान भरपाईसह दुबार पेरणीसाठी मदत करण्याची मनसेची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१८ :** जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या कृषी विभाग आणि कृषी विज्ञान केंद्राच्या संयुक्त सर्वेक्षणात सोयाबीन पीकावर हुमणी अळीचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. जिल्ह्यात सोयाबीन हे शेतकऱ्याचे प्रमुख पीक असल्यामुळे लाखो हेक्टरवर पेरा झाला आहे. उगवून आलेले सोयाबीन पीक संकटात सापडले असून अनेकांवर दुबार पेरणीची वेळ आली आहे. सरकारने नुकसानीचे तात्काळ पंचनाने करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाईसह दुबार पेरणीसाठी मदत करावी, अशी मागणी बुलढाणा मनसे तालुकाध्यक्ष अमोल रिंढे पाटील यांनी कृषिमंत्र्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. कृषिमंत्री यांना दिलेल्या निवेदनात नमूद आहे की,



हुमणी कीड ही बहुभक्षी असून तिच्या प्रादुर्भावामुळे झाडांची पाने पिवळी पडत आहे. तर काही शेतात मोठ्या प्रमाणात झाडे सुकतांना दिसत आहे. झाडे उपटून तपासल्यास त्यांची मुळे कुरतडलेली दिसतात. तसेच झाडांच्या मुळांजवळ २-३ इंच खोलीवर अळ्या आढळून येत आहे. प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर असल्याने शेतकरी आर्थीक संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांचे हुमणी अळीच्या प्रादुर्भावामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. तरी सरकारने या शेतकऱ्यांना तात्काळ मदत करुन न्याय द्यावा, अशी मागणी बुलढाणा मनसे तालुकाध्यक्ष अमोल रिंढे पाटील यांनी केली आहे.

# मेहकर तालुक्यातील बोगस एजंटचा पर्दाफाश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**दे.माळी दि.१८ :** मेहकर तालुक्यात फ्रॉड एजंटचा सुळसुळाट सुटलेला आहे. असे असताना सुद्धा खोटे बोलून, देवाच्या लेकरा बाळाच्या शपथा घेऊन हे एजंट नागरिकांना फसवताना दिसत आहे. असाच प्रकार मेहकर तालुक्यातील देऊळगाव माळी येथे उघडकीस आला.

यामध्ये केंद्र सरकारच्या योजनेअंतर्गत शेळीपालन, मेंढी पालन, कुक्कुटपालन, म्हैस पालन, व गोठ्यासाठी अनुदान, यासाठी सर्व अनुदान मिळण्यापासून ते पैसे काढून



देईपर्यंत आम्ही हे काम करून देतो. असे अमिश दाखवून या दलालाने जवळपास अडीच लाखावरून अधिकची फसवणूक केली आहे. काही सतर्क नागरिकांच्या मुळे हा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर नागरिकांनी दि. १८ जुलै रोजी मेहकर पोलीस स्टेशन गाठून दलाल आशिष प्रभाकर मेतकर रा.जानेफळ ता. मेहकर याला नेऊन त्याच्याकडून सर्व पैशाची कबुली करून घेतली. यावेळी मेहकर पोलीस स्टेशनचे ठाणेदार आलेवार यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार कोरडे, रामेश्वर रिंढे, व मेहकर पोलिसांनी मध्यस्थी करून जवळपास सव्वादोन लाख रुपयांपैकी ७० हजार रुपये आशिष मेतकर यांनी परत दिले. आणि राहिलेली रक्कम पंधरा दिवसात परत देतो असे पोलीस स्टेशन येथे कबूल केले. व मोटरसायकल नागरिकांनी ठेवून घेतली.

या घटनेमध्ये पोलिसांनी व राजेश मगर माजी तंटामुक्ती अध्यक्ष, रवींद्र सुरूशे, केशव मगर तंटामुक्ती अध्यक्ष, पोलीस पाटील गजानन चाळगे, यांनी मध्यस्थी केल्यामुळे हे प्रकरण तात्पुरत्या स्वरूपात मिटले.

सदरील फोटोमधील व्यक्तीसोबत कोणीही आर्थिक व्यवहार करू नये. नागरिकांनी सतर्क रहावे. कोणतीही फसवणूक होणार नाही याची दक्षता घ्यावी अशा प्रकारचे आवाहन मेहकर पोलीस स्टेशनचे ठाणेदार आलेवार यांनी केले आहे.

# पांगरी येथे युरिया खताची जादा दराने विक्री

## मनसे पदाधिकाऱ्यांनी स्वतः ग्राहक होऊन केली शहानिशा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.१८ :** खरीप हंगामात शेतकऱ्यांची युरिया खताला मागणी वाढत असल्याने रायपूर, पांगरी परिसरातील कृषी सेवा केंद्र चालकांकडून जादा दराने खत विक्री होत असल्याची तक्रार अनेक शेतकऱ्यांनी मनसे पदाधिकाऱ्यांकडे केली त्यामुळे रायपूर येथील मनसेचे उप तालुकाध्यक्ष अविनाश सुरडकर यांसह अन्य पदाधिकारी आकाश जैन यांनी स्वतः ग्राहक बनून प्रत्यक्ष शहानिशा केली असता, पांगरी येथील शैलेश उबरहंडे यांच्या साई कृषी सेवा केंद्र या ठिकाणी कंपनीची युरिया खताची बॅग विकत घेतली तर त्यांना एका बॅग ची किंमत ४०० रुपये प्रमाणे २ बॅगचे एकूण ८०० रुपये किंमत सांगून केवळ २६६ रु प्रति बॅग प्रमाणे एकूण २ बॅग चे ५५२ रुपयांचे रीतसर बिल सुद्धा देण्यात आले. मात्र किंमत कमी आहे व पैसे जास्त का लागत आहे याबाबत त्यांना विचारणा केली असता सध्या खताचा तुटवडा होत असल्याचे कारण सांगून भाववाढ झाली असल्याचे सांगतले. सदरची रक्कम ८०० रुपये दुकानदाराने ऑनलाईन फोन पे द्वारा स्वीकारली असुन सदर बाब पदाधिकाऱ्यांनी तात्काळ मनसे जिल्हाध्यक्ष गणेश बरबडे यांच्या कानावर घातली. त्यामुळे जिल्हाध्यक्ष बरबडे यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांसमवेत बुलढाणा जिल्हा कृषी अधिकारी यांची भेट घेऊन घडलेला सर्व प्रकार त्यांचे निदर्शनास आणून दिला. त्यावर जिल्हा कृषी अधिकारी यांनी सुद्धा संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले. यावेळी जिल्हाध्यक्ष गणेश बरबडे, उपजिल्हाध्यक्ष राजेश परिहार, मनसे शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रदीप भवर, बुलढाणा तालुकाध्यक्ष अमोल रिंढे, चिखली शहराध्यक्ष नारायण बापू देशमुख, उपतालका अध्यक्ष अविनाश सुरडकर, गणेश इंगळे, सागर इंगळे, अंकुश बरंडवाल, पवन शेंडे, शुभम जाधव, आदित्या नाटेकर, आकाश जैन , प्रेम काळे, सागर नेवरे, गोपाल दांडगे यांसह अन्य मनसे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



# न.प.ने भुसावळ चौकातील अतिक्रमण हटविले

## रस्त्याला अडथळा ठरणारे बालाजी बिकानेर व निलकमल हॉटेल जमीनदोस्त

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.१८ :** काही काळ विश्रांतीनंतर आज पुन्हा नगरपालिका प्रशासन अतिक्रमन हटाव संदर्भात ॲक्शन मोडवर दिसून आली. शहरातील भुसावळ चौक भागातील बालाजी बिकानेर व निलकमल हॉटेल चे अतिक्रमन हटविण्यात आले.

स्थानिक भुसावल चौकात ॲड.डी.टी. नागराणी यांच्या कुटुंबियांचे निलकमल हॉटेल आहे. त्यांच्या पुर्वजांनी न.प. कडुन लिजवर जागा घेऊन सन १९५० पासुन याठिकाणी हॉटेलचा व्यवसाय सुरू केला होता, तो आजतागायत सुरू आहे अशी माहिती मिळाली आहे. दरम्यान शहरात अतिक्रमण हटाव मोहिम राबविण्यापुर्वी न.प.ने अतिक्रमण धारकांना नोटीस बजावल्या होत्या. त्यामध्ये निलकमल हॉटेलचे संचालक सुगनामल तोलाराम नागराणी यांना सुध्दा नोटीस बजावण्यात आली होती. यानंतर सुगनामल नागराणी व इतर दोन यांनी सिव्हिल जज ज्युनिअर डीव्हिजन खामगाव यांच्या न्यायालयात १७ जुलै २५ रोजी रे.दि.मु.क्र. ५००/२०२५ नुसार नगर परिषद खामगाव विरूध्द दावा दाखल करून निलकमल हॉटेल पाडू नये असा मनाई हुकूम मिळणेबाबत अर्ज केला. वि.न्यायालयाने १७जुलै २५ रोजीच स्टेटस कोचा आदेश पारीत करून नगर परिषदेला निलकमल हॉटेल पाडण्यापासून मनाई केली. ताबडतोब सदर आदेशाची सूचना सर्व कागदपत्रांसह मुख्याधिकारी शेळके यांना व्हॉटसॲप द्वारे देण्यात आली जी त्यांना १७जुलै २५ रोजी सायंकाळी ७.१९ वाजता मिळाली. असे असतांना मुख्याधिकारी शेळके यांनी कोर्टाच्या आदेशाला कचऱ्याची टोपली दाखवून आज १८ जुलै २५ रोजी सकाळी निलकमल हॉटेलवर जेसीबी चालवून हॉटेल पाडले.



# नवीन ग्रा.पं.अधिकारी यांनी अतिक्रमण सात दिवसांत काढावे

## शैलेश सावजी यांचे सिईओ यांना पत्र

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**डोणगाव दि.१८ :** डोणगाव ग्रामपंचायत सध्या विविध कारणांनी गाजत असतांना असताना डोणगाव येथील ग्रामविकास अधिकारी दीपक तांबारे यांना झालेल्या विविध तक्रारी मुळे व खासकरून डोणगाव येथील अतिक्रमणाच्या मुद्द्यांवरून निलंबित करण्यात आले व त्यांच्या जागी नवीन ग्रामविकास अधिकारी विजय दांडगे यांची नेमणूक करण्यात आली परंतु दि. १७ जुलै ला काँग्रेस चे जिल्हा उपाध्यक्ष शैलेश सावजी यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांना एक पत्र दिले. त्यामध्ये त्यांनी ज्या कारणास्तव ग्रामविकास अधिकारी दीपक तांबारे यांना निलंबित केले आणी नविन ग्रामविकास अधिकारी डोणगाव ला दिला त्याा ग्रामविकास अधिकारी यांच्या कडून तांबारे यांनी न काढलेल्या अतिक्रमण काढण्याची कारवाई सात दिवसांत करुन घ्यावे व ज्या कारणासाठी तांबारे निलंबित करण्यात आले त्याा कारणास्तव नवीन ग्रामविकास अधिकारी यांना निलंबित करण्याचे काम पडू नये असे नमूद आहे.



# आगामी निवडणुकांसाठी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी बळकट नियोजन करावे

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे आवाहन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि.१८ :** पक्ष संघटन, पक्षशिस्त, पदाधिकारी कार्यकर्त्यांमधील समन्वय हा महत्वाचा असून आगामी काळातील स्वायत्त संस्था निवडणुकीत इच्छित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या पातळीवर बळकट नियोजन करावे, असे आवाहन केंद्रीय आयुष ,आरोग्य ,कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

प्रतापराव जाधव शेतकरी भवनात आज आयोजित करण्यात आलेल्या मेहकर, लोणार, सिंदखेडराजा, देऊळगावराजा , चिखली तालुक्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात त्यांनी मार्गदर्शन करतांना हे आवाहन केले. माजी आमदार संजय रायमुलकर, शशिकांत खेडेकर, जिल्हाप्रमुख बळीराम मापारी, ओमसिंग राजपूत ,युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव ,महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख मायाताई म्हस्के प्रामुख्याने उपस्थित होते.प्रारंभी शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.शिवसेना तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, भगवानराव सुलताने यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

आपल्या प्रदीर्घ मार्गदर्शनपर भाषणात प्रतापराव जाधव यांनी शिवसेनेचा संपूर्ण इतिहास कथन करत सांगितले की, सर्वसामान्यांच्या हितासाठी सातत्याने संघर्ष करणारी शिवसेना एकमेव पक्ष आहे. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेल्या अमोल विचारावर पक्षाचे मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात बळकटपणे पक्ष कार्यरत आहे. पक्षाची संघटनात्मक शक्ती वाढवण्यासाठी शिवसेना पक्षाची सदस्य नोंदणी मोठ्या प्रमाणात करण्याचे पदाधिकाऱ्यांना त्यांनी आवाहन केले.

आपल्या भाषणात माजी आमदार संजय रायमुलकर म्हणाले की, समाजकारणावर अधिक भर देणारा आपला पक्ष आहे. कार्यकर्त्यांचे कर्तुत्व आणि त्यांची बळकट एकनिष्ठता हीच पक्षाची ताकद आहे, बलस्थान आहे. पदाधिकाऱ्यांनी आगामी निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांना मोठ्या संख्येने सोबत घेऊन सज्ज रहावे. ऋषिकेश जाधव यांनी आपल्या भाषणातून युवा सेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागण्याचे आवाहन केले. यावेळी माजी आमदार शशिकांत खेडेकर , बळीराम मापारी यांनी जिल्हा, तालुका व शहर आणि ग्राम पातळीवरील बूथ प्रमुख, शाखाप्रमुख यांनी सदस्य नोंदणीचे काम वेगाने करावे जनसंपर्क वाढवावा आणि आगामी जिल्हा परिषद पंचायत समित्याा नगरपालिका निवडणुकीच्या दृष्टीने आपली कार्यक्षमता वाढवावी, असे आवाहन केले. शहर प्रमुख जयचंद बाठीया यांनी सूत्रसंचालन केले तर युवासेनेचे नेते नीरज रायमुलकर यांनी आभार मानले.



## थोडक्यात

### सोमवारिला महिला लोकशाही दिन

**बुलडाणा** - दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येतो. त्यााअनुषंगाने जूलै महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, दि. २१ जूलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. तरी पिडीत महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे.

### आठवडी बाजारातून महिलेची पर्स लंपास

**खामगाव :** स्थानिक आठवडी बाजारात काल १७ जुलै २५ रोजी दुपारी ३ ते ४ वाजेदरम्यान गजानन बिसन सोनोने (वय ५८, रा. टेंभुर्णा) यांची पती बाजार करीत असतांना त्यांच्या जवळील पिशवीमध्ये ठेवलेली छोटी पर्स अज्ञात चोरट्याने लंपास केली. पर्समध्ये २ ग्रॅम सोन्याची पोथ (किं. १५ हजार रू.) होती. याप्रकरणी गजानन सोनोने यांनी शहर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये अज्ञात चोरट्याविरुध्द कलम ३०३(२) भान्यासं नुसार गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास पोहेकॉ. रामेश्वर फासे करीत आहेत.

### अवैध दारू जप्त

**शेगाव :** तालुक्यातील सांगवा फाटा येथे काल १७ जुलै २५ रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास नितेश महादेव सोनोने (वय ३२ रा. तिव्हाण बु, ता. शेगाव) हा दुचाकी क्र. एमएच २८-बीएक्स ९४२२ ने देशीदारूचे खोके विनापरवाना घेवून जाताना पोलिसांना मिळून आला. त्याच्या जवळून देशीदारूच्या ९० मिलीच्या २०० नग शिश्यांचे दोन खोके (किं. १० हजार) व दुचाकी (किं. ७० हजार) असा एकूण ८० हजाराचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पीएसआय गजानन शिंदे यांनी शेगाव ग्रामीण पोस्टेला फियांद दिली फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

### विवाहिता बेपत्ता

**खामगाव :** खामगाव स्थानिक माखरिया मैदान भागातील रहिवासी सौ. दुर्गा रितेश गायकवाड (२२) ही विवाहिता १६ जुलै २५ रोजी सकाळी ९ वाजताच्या पुर्वी कोणाला काही न सांगता घरून निघुन गेली. मात्र घरी परतली नाही. तिचा सर्वत्र शोध घेतला असता मिळून आली नाही. यप्रकरणी रितेश प्रभाकर गायकवाड यांनी शहर पोस्टेला दिलेल्या फिर्यादीवरून बेपत्ताची नोंद घेण्यात आली आहे. पुढील तपास पोहेकॉ. संतोष गव्हाळे करीत आहेत.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १६११ - २२५० |
| गहू | २४०० - २५२५ |
| तुर | ४३०० - ६६६० |
| हरभरा | ४५०० - ६०७५ |
| सोयाबीन | ३७०० - ४४०० |
| भुईमुग | ४७२५ - ५७०० |
| बाजरी | १९२५ - १९२५ |
| मोहरी | ५७५० - ५७५० |
| मलाई चना | ७१५०-७१५० |
| मक्का | २०२५ - २०२५ |

अजिंक्य भारत
आपलं अकोला
अकोला, शनिवार, दि. १९ जुलै २०२५

## थोडक्यात

### वर्ग मित्राच्या वडिलानेच केला 'बॅड टच'; गुन्हा दाखल

**अकोला:** अकोला शहरातल्या जुने शहर पोलीस स्टेशन हद्दीत एक धक्कादायक प्रकार समोर आला. एका जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वर्ग चौथ्या वर्गात शिकणारी विद्यार्थिनीचा तिच्याच वर्ग मित्राच्या वडिलाने विनयभंग केला. या प्रकरणात जुने शहर पोलिसांनी बाल संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हे दाखल करून विनयभंग करणाऱ्या आरोपीला गजाआड केले. सत्यपाल भीमराव सावध असे विद्यार्थिनीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. वर्ग मित्राच्या वडिलाने वाईट पद्धतीने स्पर्श केला असल्याची तक्रार वर्ग शिक्षिकाकडे विद्यार्थिनीने केली होती, त्यानंतर या संपूर्ण घटनेला वाचा फुटली. जुने शहर पोलीस स्टेशनपासून ४ किमी अंतरावर असलेल्या जिल्हा परिषद शाळेमधील एका विद्यार्थीनीसोबत घडलेल्या प्रकारानंतर जिल्ह्यात संतापाची लाट आहे. पीडित अल्पवयीन मुलीच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सकाळी कामाला गेलो असता पावणे दहा वाजताच्या सुमारास मुलीच्या वर्ग शिक्षिकेचा फोन आला, आणि मुलीची तब्येत बरी नाही, आपण लवकर शाळेत यावं, असा निरोप मिळाला. त्यानंतर पीडित मुलीचे नातेवाईक शाळेत हजर झाले. त्यानंतर महिला शिक्षिकेने घडलेला संपूर्ण प्रकार मुलीच्या नातेवाईकांना सांगितला. लागलीच नातेवाईकांनी जुने शहर पोलीस स्टेशन गाठले. मुलीला वाईट पद्धतीने स्पर्श करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलम ७४,७५ , / ८,९ ,१० बाल संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

### चोरीला गेलेली दुचाकी हिंगोलीतून जप्त

**अकोला :** अकोल्याच्या एमआयडीसी परिसरातून काही दिवसांपूर्वी चोरीला गेलेली मोटरसायकल अखेर पोलिसांनी शोधून काढली असून, या प्रकरणातील एक आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी हिंगोली जिल्ह्यात छापा टाकत तब्बल ६० हजार रुपये किंमतीची दुचाकी जप्त केली असून, विशाल संतोषराव काकडे (वय २१, रा. हिंगोली) या संशयितास ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे अकोल्यात मोटरसायकल चोरीसंदर्भात असलेल्या घटनांना लगाम बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### दिव्यांग मानधनवाढीचा जल्लोष

**अकोला :** राज्यातील दिव्यांगांना मिळणाऱ्या मानधनात भरीव वाढ करण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतला असून, आता दिव्यांगांना दरमहा १५०० ऐवजी २५०० रुपये मानधन मिळणार आहे. या निर्णयाचा जल्लोष अकोल्यात प्रहार दिव्यांग सेलच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी ८ जूनपासून तिवसा तालुक्यातील मोझरी येथे अन्नत्याग आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनात शेतकऱ्यांची कर्जमाफी, दिव्यांगांना आर्थिक सहाय्य, बेरोजगारांना रोजगार आदी १७ मागण्यांचा समावेश होता. या आंदोलनाची दखल घेत राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी १३ जून रोजी मोझरी येथे जाऊन बच्चू कडू यांची भेट घेतली. त्यानंतर शासनाने बच्चू कडू यांना लेखी आश्वासन दिले आणि दिव्यांग मानधन वाढीची घोषणा पुरवणी अर्थसंकल्पात करण्याचे ठरवले. या निर्णयाची अधिकृत अंमलबजावणी झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रहार दिव्यांग सेलचे जिल्हाध्यक्ष मोईन अली यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी ढोल-ताशांच्या गजरात, फटाके फोडून व नृत्य करत मोतीचुर लाडू वाटप करत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

# क्रूरतेचा कळस: तरुणाचा अल्पवयीन बालकावर अनैसर्गिक अत्याचार

## निंबी येथील घटना, आरोपीस अटक



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १८ :** जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातून एक खळबळजनक आणि क्रूरतेचा कळस गाठणारी घटना समोर आली आहे. एका २७ वर्षीय तरुणाने अल्पवयीन मुलावर अर्थातच बालकावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली. या घटनेमुळे संपूर्ण बाळापूर तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. सर्व स्थरातून या घटनेचा रोष व्यक्त केला जातो आहे. दरम्यान, शुभम ऊर्फ बंटी उत्तम वानखडे (वय २७, राहणार निंबी, तालुका बाळापूर, जिल्हा अकोला.) असे अल्पवयीन मुलावर अत्याचार करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध उरळ पोलीस स्टेशन या ठिकाणी बाल संरक्षण कायदे अंतर्गत अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

या संपूर्ण घटनेनंतर पीडित मुलाने आई-वडिलांना घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर लागलीच कुटुंबियांनी उरळ पोलीस स्टेशन गाठले. घटनेचे गांभीर्य पाहता पोलिसांनी तातडीने शुभम वानखडे याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहे. दाखल गुन्ह्यात कलम ३,४,५,६,९ आणि बाल संरक्षण कायदा अंतर्गत गुन्ह्यांचा समावेश आहे. आरोपी शुभम ऊर्फ बंटी उत्तम वानखडे याला आज पोलिसांनी अटक करून त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीला पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलीस कर्मचारी अशोक पटोकार यांनी आज दुपारी तीन वाजताच्या सुमारास हा गुन्हा दाखल केला असून, याप्रकरणी पुढील तपास पीएसआय अरुण मुंढे करीत आहे.

### काय आहे प्रकरण?

अकोला जिल्ह्यातील उरळ पोलीस स्टेशन हद्दीतील निंबी गावात काल १७ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास आरोपी शुभम वानखडे यांच्या निवासस्थान परिसरात पीडित अल्पवयीन मुलाचे नातेवाईक बांधकामाच्या कामानिमित्त गेले होते. त्यांच्यासोबत त्यांचा मुलगा देखील होता. थोड्यावेळाने लांब असलेल्या वाडग्यात दोन लहान भावंड खेळायला गेले. येथे वाडग्यात पीडित बालक व त्याचा भाऊ असे दोघेजण खेळणी खेळत होते. आरोपीने शुभमने पीडित बालकाच्या भावाला पिण्याचे पाणी आणण्यासाठी घरी पाठवले. त्यानंतर यातील पीडित बालक हा एकटा होता, याचीच संधी साधून त्याने त्याच्यावर अनैसर्गिकपणे लैंगिक अत्याचार केले.

## जिल्हा परिषदेत प्रतिनियुक्तीचा घोळ

### शासन निर्णय बसविला धाब्यावर

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अकोला, दि. १८ :** जिल्हा परिषदेच्या अनेक विभागात गेल्या दहा ते बारा वर्षांपासून तात्पुरत्या प्रतिनियुक्त्यांच्या आदेशाच्या नावाखाली ठाण मांडून बसलेल्या व विभागीय आयुक्तांची परवानगी न घेता प्रतिनियुक्त्या करण्याचा प्रताप अधिकाऱ्यांनी केला आहे.

जिल्हा परिषदेच्या अनेक विभागात वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांच्या तात्पुरत्या प्रतीनियुक्तीच्या नावाखाली अनेक कर्मचारी बऱ्याच वर्षांपासून ठाण मारून बसले आहेत. अधिकाऱ्यांची मर्जी सांभाळणाऱ्या या कर्मचाऱ्यांना नियम धाब्यावर बसवून प्रतिनियुक्त्या देण्यात आल्या आहेत. वास्तविक पाहता राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने २७ जुन २००६ च्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय दृष्टीने प्रतिनियुक्त्या करावयाच्या असतील तर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्तांच्या पूर्व परवानगीनेच प्रतिनियुक्त्या करण्यात याव्यात, असे स्पष्ट आदेश आहेत. मात्र, या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याची तक्रार सामाजीक कार्यकर्ते आकाश कोकाटे यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह ग्रामविकास मंत्री, पालकमंत्री, विभागीय आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केली आहे. जिल्हा परिषदेत काही अधिकाऱ्यांनी केलेल्या ह्या प्रतिनियुक्त्यांची सखोल चौकशी करून त्या प्रतिनयुक्त्या रद्द कराव्यात अन्यथा १५ दिवसात प्रतिनियुक्त्या रद्द न झाल्यास लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्याचा इशारा आकाश कोकाटे यांनी दिला आहे.

## अपघात टाळण्यासाठी वाहतुकीत शिस्त आणा

### जिल्हाधिकारी अजित कुंभार यांचे निर्देश

**अकोला, दि. १८ :** अपघातप्रवण स्थळांची संख्या शून्यावर आणण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याबरोबरच वाहतुकीत शिस्त आणावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.



जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नूतन इमारतीत तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात श्री. कुंभार यांच्या अध्यक्षतेत झाली, त्यावेळी ते बोलत होते. प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार, सार्वजनिक बांधकाम कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील यांच्यासह अनेक यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, जिल्ह्यात ४८ अपघातप्रवण स्थळे आहेत. ही संख्या शून्यावर आणण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवा. त्याचप्रमाणे, वाहतुकीला शिस्त आणणे अत्यावश्यक आहे. अपघातप्रवण स्थळांच्या ठिकाणी वाहनांचा वेग मर्यादित राहावा. अनेक नागरिक उड्डाणपुलावर विरूद्ध दिशेने येतात. त्यामुळे अपघात संभवतात. अशा ठिकाणी बॅरियर किंवा योग्य उपाय राबवा. शहरातील ट्रॅफिक सिग्नलच्या ठिकाणी टायमर बसवा.

लक्झरी बस अनेकदा नियोजित ठिकाणी न थांबता शहरात कुठेही रस्त्यावर उभ्या दिसतात. अवैध पार्कींग, नियोजित पार्कींग स्थानाव्यतिरिक्त केलेले पार्कींग यामुळे रहदारीला अडथळे निर्माण होत असतात. अशी कुठेही बस पार्क होऊ नये बसमालकांची बैठक घेऊन याविषयी सूचना द्यावी. शहरातील अंडरपासमध्ये पाणी तुंबू नये म्हणून महामार्ग प्राधिकरणाने तातडीने व्यवस्था करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

## कृषी नगरातील राडा : दोन्ही गटांकडून परस्परांविरुद्ध तक्रारी

### २२ जणांविरुद्ध गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल; ७ आरोपींना अटक

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १८ :** कृषी नगर परिसरातील पंचशील नगर येथे दोन गटांमध्ये जोरदार वादातून हाणामारी झाल्याची घटना गुरुवारी (ता.१७) रात्री घडली आहे. या प्रकरणात दोन्ही गटांनी एकमेकांविरुद्ध गंभीर स्वरूपाचे आरोप करीत सिव्हिल लाइन पोलीस ठाण्यात परस्परांविरोधी फिर्यादी दिल्या आहेत. या प्रकरणात गावठी कट्टा, तलवारी, लोखंडी रॉड व कुऱ्हाड यांचा वापर झाल्याचे निष्पन्न झाले आहे. सध्या एकूण २२ जणांविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले असून काही आरोपी फरार आहेत. या प्रकरणात ७ आरोपींना अटक करण्यात आली असून २२ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

आकाश गवई यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार १७ जुलै रोजी सायंकाळी सुमारे ६.१५ वाजता पंचशील नगरात कावड यात्रेची मिरवणूक काढण्याच्या हालचाली सुरू केल्याने संतप्त झालेल्या सतीश वानखडे व त्याच्या समर्थकांनी आकाश सुनील गवई याच्यावर तलवार, लोखंडी रॉड, राफ्टर, गावठी कट्टा व लाथाबुक्क्यांनी प्राणघातक हल्ला करण्यात आला. या हल्ल्यामागे सतीश वानखडे व त्याचे साथीदार असल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. याप्रकरणी खालील आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये सतीश रघुनाथ वानखडे (३५), वनमाला वानखडे, सजाता सरकटे, अंकुश क्षीरसागर, धर्मरक्षक वानखडे यांचा समावेश आहे. फरार आरोपींमध्ये जितेश सरकटे, अर्जुन पाटील, हितेश वानखडे, आदित्य चोरपगार, प्रेम वानखडे, कुलदीप पहुरकर, अमर वानखडे, अजय तायडे असून, याप्रकरणी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या गटातर्फे सतीश वानखडे याच्यावर गोळीबार व कुऱ्हाडीने हल्ला करण्यात आला आहे. या संदर्भात फिर्यादी सतीश वानखडे (३४) यांनी आकाश गवई व त्याच्या गटावर गंभीर आरोप करीत तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीनुसार दि. १७ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता त्याच्या गटावर लोखंडी पाईप, फरशी, कुराड, तलवारी व बंदुकीच्या गोळ्यांनी हल्ला केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात १० जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे त्यामध्ये आकाश गवई, शुभम हिवाळे, निखिल चराटे, स्वप्नील बागडे, धम्मा तायडे, चिंटू सावळे, शंतनू तायडे, पृथ्वी गवई, मल्हार गवई, दादू खडसे तसेच चार अनोळखी आरोपींचाही समावेश या प्रकरणी अपराध क्र. २४९/२५ अन्वये त्याच बीएनएस कलमांनुसार गुन्हा दाखल आहे.

## शेतीच्या मशागतीला आला वेग...



जिल्ह्यात यावर्षी कपाशीचा पेरा वाढला आहे. पावसाने अचानक दडी मारल्याने शेतीच्या मशागतीला वेग आला असून, जिल्ह्यातील पळसो बढे शेतशिवारात एक शेतकरी कपाशीच्या पिकाला वखराचा पहिला फेर मारताना दिसत आहे. (छाया. संजय ताथुरकर)

## विकसित महाराष्ट्र २०४७ सर्वेक्षणात सहभागी व्हा – आयुक्त लहाने

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १८ :** विकसित भारत २०४७'' या केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी उपक्रमाचा भाग म्हणून महाराष्ट्र शासनाने विकसित महाराष्ट्र २०४७ हा स्वतंत्र आराखडा तयार करण्यास सुरुवात केली आहे. या उपक्रमात सामान्य नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांनी सांगितले आहे. यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता, नाविन्यता, आरोग्य, शिक्षण, महिला व युवक सक्षमीकरण, नागरी सुविधा समावेश असलेले नागरिक सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. हे सर्वेक्षण १८ जून २०२५ पासून सुरू झाले असून, ते २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत चालणार आहे. या १५० दिवसांच्या अभियानात 'विकसित महाराष्ट्र २०४७' साठी व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यात येणार असून, त्यासाठी नागरिकांच्या सूचना व अपेक्षा जाणून घेणे गरजेचे आहे. अकोल्यातील सर्व नागरिकांनी या अभियानात https://wa.link/o93s9m या लिंकवर जाऊन आपले अमूल्य अभिप्राय नोंदवावेत, असे आवाहन आयुक्त डॉ. लहाने यांनी केले आहे. सर्वेक्षणाच्या माध्यमातून शासनाला नागरिकांच्या गरजा व अपेक्षांची समज मिळणार असून, त्यानुसार भविष्यातील विकास आराखडा अधिक प्रभावीपणे आखता येणार आहे.




सस्नेह निमंत्रण!

अ.भा.कुणबी समाज बहुउद्देशीय मंडळ अकोला तर्फे
कुणबी समाजातील गुणवंत विद्यार्थी कौतुक सोहळा व समाज मेळावा.

अ.भा.कुणबी समाज बहू.मंडळ अकोलाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा अकोला जिल्ह्यातील कुणबी समाजातील गुणवंत विद्यार्थी यांचा कौतुक सोहळा व समाज मेळावा आयोजित करण्याचे ठरविले आहे. कुणबी समाजातील१० वी,१२ वी तसेच JEE, NEET, MHT,CET,मध्ये विशेष प्राविण्य प्राप्त,विद्यापीठ,राज्यस्तरीय विविध परीक्षेत विशेष प्राविण्य प्राप्त,कला,क्रिडा-साहित्य संगीत इ.क्षेत्रात प्राविण्य प्राप्त,NMMS-NTS,वर्ग ५ व ८ शिष्यवृत्ती परीक्षा मध्ये मेरिट आलेले विद्यार्थी,MPSC,UPSC,MBBS,MD संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे या कर्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

रविवार, दि.२० जुलै २०२५ वेळ सकाळी १०.३० वा.
स्थळ: कर्मचारी भवन सिव्हिल लाईन चौक अकोला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष
- मा.श्री.अनिलभाऊ गावंडे, अध्यक्ष अ.भा.कुणबी समाज बहुउद्देशीय मंडळ अकोला

उदघाटक
- मा.श्री.शिवदासजी महाराज गाडेकर (राष्ट्रीय युवा कीर्तनकार)

प्रमुख अतिथी
- मा.श्री.वामनरावजी मानकर (माजी अध्यक्ष)
- मा.श्री.महादेरावजी कौसल (माजी अध्यक्ष)

मुख्य मार्गदर्शक
- मा.श्री.प्रफुलजी चौधरी तथा सत्कार मूर्ती (उप जिल्हाधिकारी)
- मा.श्री.प्रा.मोहनरावजी खडसे तथा सत्कार मूर्ती

आयोजक
पदाधिकारी,संचालक मंडळ व सदस्य गण
अ.भा.कुणबी समाज बहुउद्देशीय मंडळ अकोला

सत्कार मूर्ती
- मा.श्री.आकाशदादा फुंडकर (कामगार मंत्री तथा पालक मंत्री अकोला)
- सौ.संध्याताई वाघोडे (सचिव महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)
- मा.श्री.नारायणरावजी गव्हाणकर (जिल्हा प्रमुख शिवसेना शिंदे गट)
- मा.श्री.संतोषभाऊ शिवरकार (जिल्हा अध्यक्ष भा.ज.पा.)
- मा.श्री.चंद्रशेखरजी पांडे गुरुजी (जिल्हा प्रमुख शिवसेना शिंदे गट)
- मा.श्री.गोपालभाऊ दातकर (जिल्हा प्रमुख शिवसेना उ.बा.ठा.गट)
- मा.श्री.संदीपभाऊ गावंडे (अध्यक्ष अकोला पूर्व मंडळ भा.ज.पा.)
- मा.श्री.संजयजी रोहणकार (जिल्हा प्रमुख कामगार सेना, शिवसेना शिंदे गट)
- मा.श्री.गजाननभाऊ नळकांडे (राज्य परिषद सदस्य भा.ज.पा.)
- मा.श्री.भिकाभाऊ धोत्रे (राज्य परिषद सदस्य भा.ज.पा.)

अल्पोपहाराची व्यवस्था राहील

## अनुसूचित जाती-जमातींच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा- धर्मपाल मेश्राम




**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १८ :** अनुसूचित जाती, जमातीसाठीच्या कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी आवश्यक आहे. योजनांचे उद्दिष्ट लक्षात घेऊन सर्व विभागांनी त्यानुसार काम करावे, असे निर्देश अनुसूचित जाती, जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य धर्मपाल मेश्राम यांनी दिले.

श्री. मेश्राम हे शुक्रवार (ता.१८) जिल्हा दौऱ्यावर आले असता त्यांनी जिल्हा परिषदेत विविध योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. आयोगाचे उपाध्यक्ष श्री. मेश्राम यांनी प्रथम बैठकीद्वारे सहाय्यक आयुक्त समाजकल्याण व जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडून अनुसूचित जातीच्या संपूर्ण योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. त्यानंतर महिला व बालकल्याण, क्रीडा विभाग व कृषी अधिकारी यांच्यासोबत आढावा बैठक घेऊन विविध कामांची सविस्तर पाहणी केली. यावेळी त्यांनी जिल्हा परिषद अंतर्गत जलजीवन मिशन योजनेचा आढावा, च्याचप्रमाणे, दलित वस्ती, रमाई घरकुल वस्ती योजनेचा आढावा घेत त्यांनी कामे जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

## दुसऱ्या दिवशीही परिचारिकांचे कामबंद आंदोलन सुरूच

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. १८ :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी) व जिल्हा स्त्री रुग्णालयातील परिचारिकांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी पुकारलेले कामबंद आंदोलन गुरुवारी दुसऱ्या दिवशीही तीव्रतेने सुरूच ठेवले. सरकारकडून सातत्याने होणाऱ्या दुर्लक्षामुळे संतप्त झालेल्या परिचारिकांनी आता आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

गुरुवारी सरकारच्या प्रतिनिधींसोबत संघटनेची बैठक होणार असल्याची अपेक्षा होती. मात्र, ही बैठक ऐनवेळी स्थगित करण्यात आली. त्यामुळे आंदोलनकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. आता शुक्रवारी सायंकाळी बैठक होण्याची शक्यता असून, त्यात समाधानकारक निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र होईल, असा इशारा देण्यात आला आहे. विश्वसनीय सूत्रांच्या म्हणण्यानुसार, या आंदोलनामुळे जीएमसी व जिल्हा रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभाग, प्रसूती कक्ष आणि इतर अत्यावश्यक सेवा मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाल्या आहेत. अनेक रुग्ण आणि नातेवाईकांना उपचारासाठी ताटकळत राहावे लागत आहे. संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या असून, नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. संघटनांनी प्रशासनावर वेळकाढूपणाचा आरोप करत, मागण्या मान्य होईपर्यंत काम सुरू करणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. दरम्यान रुग्णसेवा खंडित होऊ नये म्हणून प्रशासनाने पर्यायी परिचारिकांचे नियोजन करण्यात आले.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

शनिवार, दि. १९ जुलै २०२५



## थोडक्यात

### पवनगरातून लाखोचा ऐवज लंपास

**अमरावती :** शहरात चोरीचे सत्र थांबता थांबेनासे झाले आहे. राजापेठ पोलीस ठाणे हद्दीत पुन्हा चोरी झाल्याची घटना उघडकीस आली. पवननगर नं. २, गोपाल नगरात कुटुंबीय लग्ना निमित्त बाहेर गावी गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने दाराचे कुलूप तोडून सोन्या चांदीच्या दागिन्यासह रोख असा १.१० लाखांच्या ऐवजावर हात साफ केला. २ ते १६ जुलैदरम्यान ही घटना घडली. पवननगरातील रहिवाशी महिला तिच्या भावासोबत नणंद हिच्या लग्नाकरीता बाहेरगावी गेली होती. ही संधी साधून अज्ञात चोरट्यांनी कपाटातून अंदाजे ७० हजारांची सोन्या चांदीचे दागिन्यासह ४० हजार रूपये रोख असा १.१० लाखांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी महिलेने राजापेठ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरूध्द विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला.

### क्षुल्लक कारणावरून व्यक्तीला मारहाण

**अमरावती :** बारीपुरा, बडनेरा येथे मित्रासोबत गप्पा मारत असलेल्या व्यक्तीला येथे का बसला असे महिलेने म्हटले तर दोघांनी शिवीगाळ करून बुक्यांनी मारहाण केल्याची घटना १४ जुलै रोजी घडली. याप्रकरणी प्रमोद रामभाऊ लांडोरे वय ५०, रा. जुनीवस्ती बारीपुरा बडनेरा यांच्या तक्रारीवरून महिलेसह महेंद्र माहोरे व रवी माहोरे यांच्याविरूध्द बडनेरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### उसणवारीवरून फसगत, गुन्हा दाखल

**अमरावती :** उसणवारी वरून एका इसमाची फसगत केल्याप्रकरणी दाखल तक्रारीरून सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. संतोष वामनराव हातागडे वय 38, रा. तवरे नगर याच्या मित्र आकाश राऊत याने तुला उसणवारीवर व्याजाने पैसे हवे असल्या वस्तुच्या बदल्यात पैसे देतो असे सांगितले. त्यास त्यांनी होकार दिल्याने राम बहाडे रा. कठोरा याने त्यांना दुचाकीच्या बदल्यात १० हजार रूपये दिले. त्यानंतर संतोष हातागडे यांनी व्याजासह पैसे परत करतो दुचाकी परत दे असे राम बहाडे याला म्हटल्यानंतर तो उडवाउडवीचे उत्तरे देत असून दुचाकी विक्री केल्याचा संशय आहे. याप्रकरणी सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात राम बहाडे याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला.

### पैशाच्या वादातून मित्राला मारहाण

**अमरावती :** ऑनलाईन खेळावर पैशाच्या वादातून मित्राने मित्राला शिवीगाळ करून टेबलवरील बॉटल्स चेहऱ्यावर मारली. ज्योती कॉलनीत ही घटना १६ जुलै रोजी घडली. याप्रकरणी यश अरविंद चव्हाण वय २३, रा. अंबाविहार यांच्या तक्रारीवरून ऋषीकेश सुनील राऊत वय २७, रा. अंबाविहार याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

### बडनेऱ्यातून मोटर सायकल लंपास

**अमरावती :** बडनेरा रेल्वे वसाहत परिसरात पार्क करून ठेवलेली एमएच २७ बिजी ०२८४ क्रमाकांची मोटार सायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १५ जुलै रोजी घडली. याप्रकरणी रामकृष्ण वासुदेव पिंपळकर वय ६०, रा. पार्वतीनगर यांच्या तक्रारीवरून बडेनरा पोलीसांनी चोरट्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

# रिच गार्डन बारमध्ये पकडली बनावट दारु

## एक्साईज विभागाची थातूरमातूर कारवाई

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. १८ :** शहरातील अधिकृत दारूच्या बारमध्ये मध्यप्रदेशातील हलक्या प्रतीची दारू महाराष्ट्रात विकल्या जाणा-या उच्च प्रतीच्या ब्रॅण्डच्या नावे पॅकिंग केलेली बनावट विदेशी दारू राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती द्वारे जप्त केली आहे. दोन दिवसांपूर्वी शहर पोलिसांनी ३ लाखांची बनावट विदेशी दारू पकडल्यावर एक्साईज विभागाने लगेच १५ तारखेला मुख्य आरोपीच्या रिच गार्डन या बारवर बनावट विदेशी दारू जप्त केली आहे. एक्साईज विभागाने रिच गार्डन बारवर केलेल्या कारवाईच्या टायमिंगवर मात्र प्रश्नचिन्ह उभे झाले आहे.

महाराष्ट्र सरकारला विदेशी दारू विक्रीतून मोठ्या प्रमाणावर महसूल प्राप्त होतो. विदेशी आणि देशी दारूच्या विक्री, लायसनिंग व नियोजनाकरिता शासनाचा राज्य उत्पादन शुल्क विभाग प्रत्येक जिल्ह्यात कार्यरत आहे. या विभागाने आपापल्या कार्यक्षेत्रात शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी प्रामाणिक करणे अपेक्षित आहे. कारण दारू विक्री हा जनतेच्या आरोग्याशी निगडित विषय सुध्दा आहे. दोन दिवसांपूर्वी अमरावती शहरातील वसंत टाकीजवळ राज साहू नामक व्यक्तीच्या गोडाऊन मधून मध्यप्रदेशातील हलक्या प्रतीची दारू महाराष्ट्रात विकल्या जाणा-या उच्च प्रतीच्या ब्रॅण्डच्या नावे पॅकिंग केलेली बनावट विदेशी दारू शहर गुन्हे शाखा २ पोलिसांनी जप्त केली होती. सदर कारवाईत रूपये ३,१४,४२५ चा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला होता. या प्रकरणात पोलिसांनी मुख्य आरोपी राज साहू यांस अटक केली.

शहर पोलिसांनी बनावट विदेशी दारू पकडल्यावर राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती



खडबडून जागा झाला आणि त्यांनी दि. १५ जुलैच्या रात्री ९.३० वाजता राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावतीचे अधिक्षक गर्जे यांच्या नेतृत्वाखालील टीमने राज साहू यांच्या रिच गार्डन नामक बारमध्ये धाड टाकली. सदर धाडीमध्ये १,१६,८९० रूपयांचे मध्य प्रदेशात विक्री करण्याची परवानगी असलेल्या हलक्या प्रतीची विदेशी दारू, शिशीचे बूच, काचेच्या शिशी असा माल एक्साईज विभागाने ताब्यात घेऊन जप्तीची कारवाई केली.

रिच गार्डन या बारवर कारवाई करिता राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती येथील अधिक्षक गर्जे, निरीक्षक खरे, दुय्यम निरीक्षक प्रशांत वानखडे, कष्टे, काळे, वाकोडे, जाधव यांच्यासह संपूर्ण टीम याप्रसंगी सहभागी होती. राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती द्वारे या बनावट विदेशी दारू प्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी कायदाच्या कलम ६५,७९,८१,८३ नुसार रिच गार्डन येथे कार्यरत मॅनेजर निखील अनिल साहू यांचेवर गुन्हा नोंदविला अशी माहिती तपास अधिकारी प्रशांत वानखडे यांनी दिली. याप्रसंगी प्रस्तुत प्रतिनिधीने तपास अधिकारी वानखडे यांना अधिक माहिती विचारण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी माहिती लपविण्याचा प्रयत्न केला. या संपूर्ण प्रकरणात राज साहू नामक आरोपी मध्य प्रदेशात विक्रीची परवानगी असलेली दारू अमरावती आणून बनावट विदेशी दारू बनवितो याची कल्पना असतांनाही राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती आतापर्यंत झोपेत कां होता ? हा प्रश्न निर्माण होतो. अधिक्षक गर्जे यांना याप्रकरणी रिच गार्डन सारख्या बारवर बंदी येऊन लायसन्स रद्द होईल कां? असा प्रश्न केला असता, हा विषय जिल्हाधिकारी अमरावती यांच्या अधिकारात आहे असे सांगितले. मात्र या सर्व घटनांमुळे उच्च प्रतीच्या विदेशी दारू पिण्याच्या नावाखाली नागरिकांना या स्लो पॉयझन दिल्या तर दिल्या जात नाही? असा प्रश्न निर्माण होतो. राज्य उत्पादन शुल्क विभागातील काही भ्रष्ट अधिकारी वा कर्मचारी अशा घटना घडू देतात असे दिसून येते. राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती रिच गार्डनच्या मुख्य मालकाला आरोपी करतात की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> मध्यप्रदेश विक्रीची परवानगी असलेली हलक्या प्रतीची दारू आणून अमरावती मध्ये नामांकित कंपन्यांच्या नावे बनावट विदेशी दारू तयार करण्याप्रकरणी रिच गार्डनचा मालक राज साहु यांचे नाव प्रामुख्याने आले आहे. या राज साहू यांच्यावर चारपाच वर्षांपूर्वी एक्साईज विभागाने चांदूरबाजार रोडवरील नांदुरा चौकात महिंद्रा कंपनीच्या वाहनातून 76 पेट्या मध्यप्रदेशात विक्रीची परवानगी असलेली दारू पकडली होती. तेव्हा मात्र कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने आरोपीची आणि वाहनाची न्यायालयातून सूटका झाली. त्यावेळी एक्साईज विभागाने आरोपीच्या रिच गार्डन या बारवर कोणतीही कारवाई केली नसल्याचे समजते. आता शहर पोलिसांनी कारवाई केल्यामुळे एक्साईज विभागाला नाईलाजाने रिच गार्डन या बारवर कारवाई करावी तर लागली नाही ना? अशी चर्चा आहे.

## डॉ. चरण सोनारे यांचा हृदय रोगावरील शोध पेपर गुगल सर्च वर प्रथम दर्शनी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**वरूड, दि. १८ :** वरुड शहरातील डॉ चरण सोनारे हे गत 25 वर्षापासून आयुर्वेद चिकित्सक म्हणून प्रसिद्ध आहेत सुरुवातीपासूनच आयुर्वेद क्षेत्रामध्ये नाविन्यपूर्ण विविध आयुर्वेदिक वनस्पती द्वारे संशोधनात्मक कार्य करीत जीर्ण व असाध्य रोगावर संशोधनात्मक कार्य केलेले आहे किडनी फिलीवर लिव्हर फेलीवर यासोबत हृदयरोगामधील लो इलेक्शन फ्रॅक्शन हा हृदयाशी निगडित आजार आहे यामध्ये शरीराला पाहिजे त्या प्रमाणात रक्तपुरवठा होत नसल्याने श्वास भरून येतो व गंभीर लक्षणे उत्पन्न होतात अशाच प्रकारे डॉ सोनारे यांच्याकडे २७ वर्षीय एक महिला या आजारासाठी आलेली असताना व इंजेक्शन फॅक्शन फक्त १५ टक्के असताना डॉक्टर सोनारे यांनी आयुर्वेदातील औषधी व पंचकर्म यांच्या साह्याने या रुग्णाला जीवदान मिळाले अशाच प्रकारे अनेक केस वर ते कार्य करीत आहेत आयुर्वेद फक्त जो स्लो समजला जात होता किंवा फक्त वातासाठी समजलं जात होता त्या आयुर्वेदाची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे हे यावरून सिद्ध होते डॉ सोनारे यांनी प्रसिद्ध केलेला Treatment of heart failure with low ejection fraction हा शोध पेपर राष्ट्रीय वैद्यकीय जर्नल मध्ये प्रसिद्ध झाला व त्या पेपरला पूर्ण भारतातून प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याने तो गुगल सर्च वर प्रथम



दर्शनी दिसत आहे ही बाब व वरूड च्या वैद्यकीय क्षेत्रासाठी मानाचा तुरा ठरलेली आहे डॉ सोनारे यांच्या म्हणण्यानुसार आयुर्वेद ही फक्त चिकित्सा चिकित्सा नसून ती जीवन जगण्याची कला आहे या गुगल सर्च मुळे त्यांच्याकडे भारतातून विविध राज्यातून रुग्ण प्रत्यक्ष व ऑनलाईन कन्सल्टेशन घेऊन उपचार घेत आहेत त्याकरता वरुड मेडिकल असोसिएशन व आयुर्वेद फोरम महाराष्ट्र गो विज्ञान अनुसंधान केंद्राचे सचिव श्री गुप्ता यांनी डॉ चरण सोनारे यांचे अभिनंदन केले आहे

## दोन वर्षांत आढळली ७१ शाळाबाह्य मुले

### जिल्हा परिषदेत शाळेत प्रवेशित

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. १८ :** जिल्ह्यात शाळाबाह्य बालकांच्या सर्वेक्षणात वर्ष २०२३-२४ आणि २०२४-२५ अशा दोन वर्षात ७१ मुले शाळाबाह्य आढळून आली आहेत. त्यांना शोधून जिल्हा परिषदेच्या शाळेत दाखल करण्यात आले आहेत. भटकंती करणारी मुले, कचरा गोळा करणारी मुले ही शाळाबाह्य होती; परंतु शिक्षण विभागाने त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिल्याने ही मुले शिक्षणाच्या प्रवाहात आली आहेत. परिणामी ही मुले आता शाळेत नियमित येऊ लागली आहेत.

शाळाबाह्य बालकांचे सर्वेक्षण करण्यात आले. स्थलांतरित होऊन इतर जिल्ह्यात गेलेली मुले परतली आहेत. एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून शाळाबाह्य मुलांची शोधमोहीम राबविली जाते. अनियमित व स्थलांतरित मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करण्यासाठी विशेष शोधमोहीम राबविण्यात आली. ६ ते १८ वयोगटातील अनेक बालके शाळाबाह्य झाल्याचे दिसून येतात. अशा बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दाखल करण्यासाठी शासनाकडून ही मोहीम जुलै महिन्यात राबविण्यात येते. सध्या ही मोहीम जिल्हाभरात राबविली जात आहे. शाळाबाह्य मुलांसाठी ही योजना राबविण्यात येते. इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दोन गणवेश दिले जातात. यात स्काऊट-गाइडचा गणवेश असतो. बूट, सॉक्स आणि मोफत पाठ्यपुस्तके दिली जातात. शाळेत शालेय पोषण आहार दिला जातो. गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन स्तरावरून योजना राबविण्यात येते. जिल्ह्यात गत दोन वर्षात राबविलेल्या शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणात शोधपथकाला वर्ष २०२३-२४ मध्ये २९ आणि २०२४-२५ मध्ये ४२ अशाप्रकारे दोन वर्षात ७१ मुले शिक्षणाच्या प्रवाहात पुन्हा दाखल झाली आहेत.



### विद्यार्थी का शाळाबाह्य होतात ?

ग्रामीण भागातील पालक कामाच्या शोधात गाव सोडून परजिल्ह्यात स्थलांतरित होतात. मुलांना कुणाच्या भरवशावर सोडायचे म्हणून त्यांनाही सोबत नेले जाते. स्थलांतरित मुलाला पालक शाळेत टाकण्यासाठी गांभीर्य दाखवत नाही.

## उद्योगासाठी योग्य धोरण ठरविण्याची गरज- आ. संजय खोडके

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. १८ :** अमरावतीच्या औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योग उभारण्याच्या दृष्टीने लागणाऱ्या सर्व नैसर्गिक व भौतिक संसाधने उपलब्ध आहेत , पाण्याची भरमार असून वीज, वाहतूकसेवा , दळणवळणाच्या सोयी व मनुष्यबळ तसेच गुंतवणूकदार सुद्धा उपलब्ध आहे. म्हणजेच औद्योगिकी करणाला चालना देण्यासाठी पोषकस्थिती अमरावतीमध्ये असून सुद्धा अमरावती जिल्हाच नव्हे तर पूर्ण विभागाचं उद्योगांमध्ये मागासलेला आहे. केंद्र शासनाच्या स्टार्टअप इंडियाच्या माध्यमातून देशात तसेच महाराष्ट्र राज्यात लघु-सूक्ष्म व मध्यम उद्योगांना भरभराटी मिळत असतांना अमरावतीच्या बाबतीत मात्र दुर्लक्ष होत असल्याने अमरावती ची औद्योगिक क्षेत्रात मोठी पीछेहाट झाल्याने आज अमरावतीचे दरडोई उत्पन्न हे महाराष्ट्रात सर्वात कमी आहे.

अमरावती जिल्ह्यातील उद्योगांची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. शासनाने अमरावती मध्ये उद्योगांच्या बाबतीत ज्याकाही यंत्रणा उभ्या केल्यात आहेत, त्या पुढे जाण्यासाठी आज शासनाने एक सुयोग्य धोरण ठरविणायची नितांत गरज असल्याचे अभ्यासपूर्ण विवेचन आ.संजय खोडके यांनी राज्यविधिमंडलात मांडले.

आमदार संजय खोडके



यांनी अधिवेशनात बोलतांना सांगितले कि, महाराष्टाची अर्थव्यवस्था चांगली असल्याने राज्यात परकीय थेट गुंतवणूक वाढत आहे. साधारणत: 1,64,875 कोटींची गुंतवणूक महाराष्टात झाली आहे. भारत सरकारच्या स्टार्ट-अप अंतर्गत फंड ऑफ फंड्स च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात सेबीने चांगले काम केले आहे. स्टार्टअप अंतर्गत नवीन उद्योगांना सेबीच्या लोन व गुंतवणुकीला चालना देण्यात आली आहे. यातून राज्यात मुंबई , पुणे औरंगाबादमध्ये मोठ्या प्रमाणात उद्योगांची निर्मिती झाली.

हे होत असतांना मात्र अमरावती येथे उद्योग निर्मितीबाबतची पीछेहाट हि चिंता व्यक्त करणारी आहे. अमरावती मध्ये स्टार्टअपच्या माध्यमातून नवीन व्यवसायांना चालना देण्याची नितांत गरज आहे. अमरावतीच्या बाबतीत योग्य धोरण ठरविण्यात न आल्याने अमरावती मध्ये उद्योगांचा व परिणामी रोजगाराचा मोठा अनुशेष निर्माण झाला असल्याची बाब आ. संजय खोडके यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.

## बडनेरा रेल्वेमार्गे होते दारूची तस्करी

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बडनेरा, दि. १८ :** गेल्या अनेक दिवसापासून बडनेरा शहरातून रेल्वे मार्गाने लांब पल्ल्यांच्या गाड्यांमधून कॉलेज बॅग मध्ये दारूच्या बॉटल्स दारू बंदी असलेल्या जिल्ह्यात सर्रास घेऊन जात आहे या गंभीर बाबीकडे रेल्वे सुरक्षा बल तसेच लोहमार्ग पोलिसांचे दुर्लक्ष का असा सवाल उपस्थित झाला आहे.

महिला पुरुष तसेच २० ते २५ वयोगटातील तरुण दारूच्या बॉटल्स कॉलेज बॅग मध्ये भरून बडनेरा शहरातून रेल्वे मार्गे दुसऱ्या जिल्ह्यात घेऊन जात आहे दारूची बडनेरा शहरातून रेल्वे मार्गे मोठ्या प्रमाणात तस्करीत होत आहे तस्करी होत आहे. यासाठी लांब पल्ल्यांच्या गाड्या दारूची तस्करी करणारे निवडत आहे यापूर्वी अकोला मुर्तीजापुर रेल्वे स्थानकावर कारवाई केल्या गाडीमध्ये अशाच प्रकारे दारूची तस्करी करणाऱ्या विरुद्ध कारवाई झाली आहे बडनेरात मात्र अशा प्रकारे कारवाई होत नसल्याने दारूची तस्करी करणाऱ्यांना चांगलेच फावते आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाला याची दखल घ्यावी लागेल त्याचप्रमाणे रेल्वे सुरक्षा बल रेल्वे प्रशासन लोहमार्ग पोलीस या सर्वांना याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे अन्यथा हा अवैध व्यवसाय रेल्वे मार्गाने वाढतच जाईल.

एमआयडीसी परिसरातून नकली दारू बनवण्याचा कारखाना पोलिसांनी उघडकीस आणला होता राजरोसपणे बनावट दारूची विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे. रेल्वे मार्गाने जाणारी दारू वाईन शॉप मधून जात आहे का हे पोलिसांनी तसेच उत्पादन शुल्क विभागाने शोधले पाहिजे तसेच होत तस्करीला आळा बसावा यासाठी रेल्वे पोलिसांनी तसेच रेल्वे सुरक्षा दल यानी यावर ठोस कारवाई केली पाहिजे असे प्रवासी वर्गासह शहरवासीयांमध्ये बोलल्या जात आहे.

### पाचबंगला येथून दारू विक्रेता ताब्यात

**अमरावती :** जुनी वस्ती, बडनेरा येथील पाचबंगला परिसरात दारूची अवैध विक्री होत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी धाड घालून कैलास हिवराळे याला रंगेहात ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यातून १० नग देशी दारू बॉटल्स किंमत अंदाजे ८०० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करून गुन्हा नोंदविला. या घटनेचा पुढील तपास बडनेरा पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली बडनेरा पोलीस करीत आहे.

# जिल्ह्यात ५ वर्षात विजेचे ३९ बळी

## शेकडो जनावरेही मृत्यूमुखी; नैसर्गिक आपत्तीमुळे अनेकांचे संसार उघड्यावर

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. १८ :** अमरावती जिल्ह्यात गेल्या 5 वर्षात वीज कोसळणे आणि पुरामुळे एकूण 105 जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. यात 39 जणांचा वीज पडून, तर 66 जणांचा पुरामुळे मृत्यू झाला आहे. याशिवाय शेकडो नागरिक आणि हजारो जनावरे जखमी झाली आहेत.

नुकत्याच मोर्शी तालुक्यातील घटनेत भिंत कोसळून तीन वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला असून, त्याची याची आजी गंभीर जखमी झाली. ही घटना देखील पावसाळ्यात आलेल्या अतीवृष्टी आणि नैसर्गिक आपत्तीचेच एक



उदाहरण आहे. वीज कोसळून मृत्यू झालेल्या प्रत्येक नागरिकाच्या कुटुंबाला शासनाकडून प्रत्येकी 4 लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. मात्र, अनेकवेळा ही मदत उशिरा पोहोचत असल्याने पीडित कुटुंबांवर दुहेरी संकट येते. परंतु जिल्हा प्रशासनाने नैसर्गिक आपत्तीत ठरलेल्या बळींच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतीसाठी सातत्याने प्रयत्न केले आहे. शासनाकडून 4 लाख रुपयांची मदत देण्यात आली.

उशिरा पोहोचत असल्याने पीडित कुटुंबांवर दुहेरी संकट येते. परंतु जिल्हा प्रशासनाने नैसर्गिक आपत्तीत ठरलेल्या बळींच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतीसाठी सातत्याने प्रयत्न केले आहे. शासनाकडून ४ लाख रुपयांची मदत देण्यात आली.

> “आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४×७ कार्यरत असून नागरिकांना वेळोवेळी हवामान, पूर, वीज याबाबत सतर्कतेच्या सूचना दिल्या जातात. गावागावात जाऊन लोकप्रतिनिधी, शिक्षक व स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने नागरिकांना मार्गदर्शन केले जाते. कुठल्याही नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी तत्काळ मदत पोहोचवण्याची तयारी पूर्ण आहे. या वाढत्या नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि ग्रामपंचायतींनी आपत्ती व्यवस्थापनाची पूर्वतयारी करणे अत्यावश्यक आहे.
>
> **सुरेंद्र रामेकर,**
> **जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी**

### ४ महिन्यांत ६० जनावरांचा मृत्यू

एप्रिल ते जुलै- २०२५ या चार महिन्यांत अवकाळी पावसामुळे जिल्ह्यात ६० जनावरांचा मृत्यू झाला आहे. वीज कोसळणे, भूस्खलन, पाण्याचा साठा यामुळे पशुधनाचेही मोठे नुकसान झाले आहे. या घटनेनंतर प्रशासनामार्फत तत्काळ दखल घेत संबंधित पशूपालकांची भेट घेऊन पुढील मदतीची कार्यवाही करण्यात आली.

### वीज आणि पुरापासून बचावासाठी नागरिकांनी घ्यावयाची काळजी

वीज चमकताना झाडांच्या खाली किंवा उघड्यावर थांबू नका. मोबाइल, इअरफोनचा वापर वीजेच्या गडगडाटात टाळावा. घरात वीज खांब, वायर तुटलेली दिसल्यास त्वरित महावितरण कार्यालयात कळवा. पुराचा संभाव्य धोका असल्यास उंच ठिकाणी स्थलांतर करा. वाहत्या नाल्यात, पुलावरून पाणी वाहत असताना जाणे टाळा. मुलांना पाण्यात खेळू देऊ नका. महत्त्वाची कागदपत्रे, औषधे आणि टॉर्च नेहमी सोबत ठेवा. शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायतमार्फत लोकजागृती आवश्यक.

## थोडक्यात

### जि.प.मराठी शाळेत विद्यार्थ्यांचा वाढदिवस आनंदात साजरा



**शेंदुर्जन :** येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत विद्यार्थ्यांचे वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरे करण्याची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे, जी आजही कायम आहे. या परंपरेनुसार, आज १८ जुलै रोजी प्रसाद शिंगणे या विद्यार्थ्याचा वाढदिवस शाळेत साजरा करण्यात आला. गुरु-शिष्याचे नाते अधिक दृढ व्हावे आणि विद्यार्थ्यांमध्ये परस्परांविषयी प्रेम व सहानुभूती वाढीस लागावी या हेतूने, शाळेतील शिक्षक वर्ग प्रत्येक विद्यार्थ्याच्या वाढदिवशी त्याला नवीन नोटबुक, पेन्सिल, खोडरबर आणि पुष्पगुच्छ देऊन आनंदोत्सव साजरा करतात. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ मैत्रीच घट्ट होत नाही, तर एकमेकांबद्दल आपुलकीची भावनाही निर्माण होते. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक पत्रे सर, तसेच मेरत सर आणि सिंगणे सर ,कोलते सर, यांच्यासह शाळेतील सर्व चिमुकले विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमामुळे शाळेतील वातावरण नेहमीच उत्साही आणि सकारात्मक राहते, असे मत शिक्षकांनी व्यक्त केले.

### खुटपुरी व घाटपुरी शिवारातील पाच शेतांमधून साहित्य लंपास

**खामगाव:** तालुक्यातील खुटपुरी शिवारात राजेश रामचंद्र चौधरी (वय ६६, रा.शिवाजी वेस) यांचे शेत आहे. १६ जुलै २५ रोजी सकाळी १० वा. च्या सुमारास राजेश चौधरी शेतामध्ये फवारणी करण्यासाठी गेले असता त्याांना विहिरीवरील केबल वायर अंदाजे १५० फुल (किं. ६ हजार) अज्ञात चोरट्याने लंपास केल्याचे दिसून आले. तसेच धाटपुरी शिवारातील ज्ञानेश्वर अंबादास चोपडे यांचे शेतातून १०० फुट केबल वायर (कि.४ हजार रु.), प्रदिप शालीकराम भेरहे (रा. गोपाळ नगर) यांच्या शेतातून १४ स्पिंक्लर नोझल (किं. ३५०० रु.), शिवदास प्रकाश शेळके (रा.घाटपुरी) यांच्या खुटपुरी शिवारातील विहिरीवरील ६० फुट केबल वायर (कि. २४०० रु.) व नामदेव गोकुळ चोपडे यांच्या घाटपुरी शिवारातील शेतातून १०० फुट केबल वायर, झटका मशिन, सोलर चार्जर बैटरी, एअरगन (कि.१० हजार रु.) असा एकूण २५ हजार १०० रुपयाचे केबल वायर व शेती साहित्या लंपास केले. याप्रकरणी राजेश चौधरी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिवाजी नगर पोस्टेला अज्ञात चोरट्याविरूध्द केला दाखल केला आहे.

### टिप्पर अंगावर घालून महसूल पथकास जीवे मारण्याचा प्रयत्न

**खामगाव :** खामगाव तहसील कार्यालयाचे ग्राम महसूल अधिकारी राहुल अशोक चौधरी (४०), शैलेश सारंगधर बाठे, अंकुश अशोक अग्रवाल व संजय रामदास काळमेघ यांचे भरारी पथक तहसीलदार यांच्या आदेशाने काल १७ जुलै २५ रोजी सकाळी ५५.३० वाजताच्या सुमारास गौण खनिज वाहतुकीवर नियंत्रण ठेवणे व कारवाई करण्यासाठी सुटाळा बु व कोक्ता शिवारात खाजगी वाहनाने जात होते. दुपारी १ ते २ वा. दरम्यान त्याांना कोक्ता शिवारातील बायपासवर नांदुराकडे मुरूम घेवून जाणारे टिप्पर दिसून आले. यावेळी त्याांनी टिप्पर थांबवून चालक विशाल देशमुख व वाहन मालक गोविंदा फुंडकर (दोघे रा. पिंप्री देशमुख) यांना रॉयल्टी बाबत विचारणा केली. त्यांच्या जवळ रॉयल्टी नसल्यामुळे टिप्पर तहसील कार्यालयाला घेण्यास सांगितले असता चालक विशाल देशमुख याने त्याांच्या अंगावर टिप्पर घालून चौधांना जखमी केले. या प्रकरणी राहुल चौधरी यांनी जलंब पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टे मध्ये उपरोक्त दोघांविरूध्द गुन्हा दाखल केला.

### वरली मटका खेळविणाऱ्यांना पकडले

**लाखनवाडा :** खेळत व खेळविणाऱ्या तिघांना स्थानिक गुन्हा शाखेच्या पोलिसांनी पकडले आहे. त्यांच्याजवळून मुद्देमाल सुध्दा जप्त करण्यात आला आहे. ही घटना १७ जुलै रोजी संध्याकाळी लाखनवाडा बु. येथील राजश्री बँकेच्या मागे घडली. लाखनवाडा बु. येथील दत्तात्रय नामदेव बोदडे, प्रकाश विश्वनाथ वानखडे, त्र्यंबक सदाशीव वाकोडे हे तिघे वरली मटका खेळत व खेळवित आहेत अशी स्थानिक गुन्हा शाखेच्या पोलिसांना मिळताच त्याांनी लाखनवाडा बु. येथे दाखल होवून सदर वरली मटक्याच्या अड्ड्यावर छापा टाकला. यावेळी दत्तात्रय बोदडे, प्रकाश वानखडे व त्र्यंबक वाकोडे हे तिघे वरलीचे आकडे घेत असताना मिळून आले. त्यामुळे या तिघांनाही पोलिसांनी पकडले.

# स्थानिक स्वराज्य संस्थावर भगवा फडकविण्यासाठी सदस्य नोंदणी करा - केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगाव दि. १८ :** निक स्वराज्य संस्थेच्यावर भगवा फडकविण्यासाठी शिवसैनिकांनी संघटनात्मक शक्ती वाढवावी . शिवसेना सदस्य नोंदणी ही मोठ्या संख्येत करा असे आवाहन शिवसेनेचे नेते तथा केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज शेगाव येथे केले.बुलढाणा जिल्ह्यातील शेंगाव,खामगांव,जळगाव जामोद, मलकापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेना, युवासेना, महिला आघाडी आणि सर्व अंगीकृत संघटनांच्या आजी-माजी पदाधिकारी यांची बैठक आज १७ जुलै रोजी शेगाव येथील वर्धमान भवन येथे संपन्न झाली. त्यावेळी शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना शिवसेना नेते तथा केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव बोलत होते.

यावेळी शिवसेनेचे जिल्हा संघटक तथा आ. संजय गायकवाड, शिवसेना जिल्हाप्रमुख शांताराम दाणे, ओमसिंग राजपूत,युवासेना सहसचिव तथा जिल्हाप्रमुख ऋषी जाधव,महिला आघाडी जिल्हाप्रमुख सौ.शारदाताई पाटील व्यासपीठावर उपस्थित होत्या शिवसेना नेते प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे वर्चस्व निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून सर्व शिवसैनिकांनी कामाला लागा जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करा , सरकारच्या योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवा, शासकीय योजनेचा लाभ गरजू लाभार्थ्यांना देण्याचं काम ही शिवसैनिकांनी करावं अस आवाहन त्यांनी केले ''शिवसेना ही जनतेच्या हक्कासाठी लढणारी संघटना आहे. या संघटनेची ओळख कार्यकर्त्यांच्या कर्तुत्वावर आणि निष्ठेवर अवलंबून असल्याचेही शिवसेना नेते प्रतापराव जाधव यावेळी म्हणाले . जिल्हा संघटक तथा आमदार संजय गायकवाड यांनी गाव तिथे शिवसेनेची शाखा आणि घर तेथे शिवसैनिक असं जाळ संपूर्ण जिल्हाभर निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून संघटनात्मक बांधणी करण्याबाबत शिवसैनिकांना मार्गदर्शन केले यावेळी खामगांव, जळगाव जामोद, मलकापूर या विधानसभा मतदारसंघांचा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आढावा घेण्यात आला बैठकीत पक्षसंघटना,पक्षशिस्त,पदाधिकारी व कार्यकर्त्यांमधील समन्वय यावर भर देत आला या बैठकीत अनेकांनी मुक्तपणे आपले विचार मांडले आणि संघटनात्मक बळकटीसाठी आवश्यक अशा सूचना केल्यात या बैठकीला शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजू पाटील मिरगे, संजय आवताडे खामगाव, संतोष भाऊ डीवरे नांदुरा, राहुल मारोळे , अशोक टावरी, देविदास घोपे, शिवसेना नेते चेतन पाटील घिवे, रामा पाटील थारकर, विजयजी साठे, सुनील जुनारे, राजेंद्र बघे खामगाव, केशव ढोकणे, अजय पारसकर, संतोष लिप्ते, पवन बारिंगे , मयुरी पाटील, जयश्री देशमुख यांच्या सह शिवसेना- युवासेना महिला आघाडीचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आठवडी बाजारात घाणीचे साम्राज्य; आरोग्य धोक्यात



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**डोणगाव दि.१८ :** डोणगाव ग्रामपंचायत सध्या विविध कारणांनी गाजत असतांना असताना स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या समोर दर बुधवारी भरणारा आठवडी बाजार ग्रामपंचायत च्या दुर्लक्षित कारभारामुळे घाणीवर भरत असल्याचे चित्र आहे.

डोणगाव येथे दरबुधवारला आठवडी बाजार भरतो व येथे परीसरातील गावातील लोक त्याचबरोबर वाशीम जिल्ह्यातील लोक ही बाजारासाठी येत असतात पण सदर आठवडी बाजारात झालेल्या अतिक्रमणांमुळे सध्या आठवडी बाजारातील काही दुकाने हे राज्य महामार्गोलगत असणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या समोर बसत असून सदर दुकाने ही चक्क राज्य महामार्गोलगतच बसत असून या ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्याच घाणीवर दुकाने थाटल्या जात असल्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे ग्रामपंचायत सदर बाजाराची हर्राशी लाखो रुपये ला करते व सदर ठेकेदार अव्वाच्या सव्वा कोणतीही पावती न देता बेठक वसुल करतात याकडे ग्रामपंचायत केवळ बघ्याची भूमिका घेत असून संपुर्ण आठवडी बाजारात घाणीचे साम्राज्य पसरले आहे याकडे लक्ष देऊन त्वरीत घाण साफ करावी व आठवडी बाजार रस्त्यावर न भरवता दुसरीकडे जागा देऊन रस्ता मोकळा करावा अशी मागणी होत आहे.

## मराठा पाटील युवक समितीचा युवकांसाठी भव्य रोजगार मेळावा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.१८ :** मराठा पाटील युवक समिती कडून अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात, त्याचाच एक भाग दिनांक १९ जुलै २०२५ रोजी स्थानिक वर्धमान भवन शेगांव येथे मराठा पाटील युवक समिती शेगावच्या वतीने युवकांसाठी हा भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

मराठा पाटील युवक समिती वधुवर परिचय मेळावा , सोयरिक पुस्तिका , ना नफा ना तोटा तत्वावर ॲम्ब्युलन्स सेवा, रक्ताची मदत करत रक्तदान गुणवंत विद्यार्थ्यांचा गुण गौरव सोहळा आणि विविध सामाजिक उपक्रम असतात, सध्याच्या परिस्थितीचा विचार केला असता आज सामाजिक विषयात तरुणाई मध्ये असलेल्या बेरोजगारीचे प्रमाण लक्षात घेऊन आज समाजातील तरुणाई व्यवसाय नसल्याने काळजीत आहे त्याच सोबत देशाचे भविष्य म्हणजे आजची तरुण पिढी आहे, युवक समिती कायम सर्वच क्षेत्रासाठी काम करत असते आणि हाच विचार मनामध्ये घेऊन पहिल्यांदा आपल्या भागातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी एक प्रयत म्हणून मराठा पाटील युवक समिती शाखा शेगांव यांच्या वतीने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याला नाशिक छत्रपती संभाजी नगर पुणे येथील नामांकित कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. तसेच स्मॉल फायन्स विविध लहान मोठ्या बँक ,स्थानिक , आणि परिसरात असणाऱ्या रोजगाराच्या संधी निर्माण केल्या जातील असे नियोजन समिती कडून करण्यात आले आहे. प्रत्यक्ष काही युवक युवती यांची निवड याच कार्यक्रमात करून जोइनिंग लेटर दिले जाईल अशी माहिती आयोजन समिती कडून मिळाली आहे. सदर मेळाव्याला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

## विद्यार्थी घडविण्यासाठी गारोळे यांचे कार्य कौतुकास्पद: शिक्षणाधिकारी आकाळ यांचे प्रतिपादन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**साखरखेर्डा दि.१८ :** ग्रामीण भागातील शिक्षणाची गंगोत्री म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे पवित्र काम वरोडी येथील शाळेने केले आहे. तेथील विद्यार्थ्यांची उपस्थिती सर्व काही सांगून जाते. किशोर गारोळे हे दिव्यांग असताना त्यांनी कधीच शैक्षणिक कामात कुचराई केली नाही. आज साखरखेर्डा केंद्रात एक नावलौकिक मिळवत या शाळेने कौतुकास्पद कामगिरी केली आहे. गारोळे हे सेवानिवृत्त होत असताना त्यांचा कार्यपुर्ती सोहळा म्हणजे त्यांनी केलेल्या कार्याची पावती आहे . असे भावपूर्ण उद्गार शिक्षणाधिकारी अनिल आकाळ यांनी काढले. जि.प.उच्च प्राथमिक शाळा, वरोडी येथील कार्यरत मुख्याध्यापक किशोर गारोळे सर हे दि.३०जून रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवापूर्ती सोहळा नुकताच संपन्न झाला. शाळा परिवार वरोडी, शाळा व्यवस्थापन समिती यांच्या वतीने आणि ग्रामपंचायत सरपंच तसेच त्यांचे सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद बुलढणाचे माजी उपाध्यक्ष राम जाधव हे होते. तर जि.प.चे माजी कृषी सभापती दिनकरराव देशमुख तसेच माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अनिल आकाळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.आपल्या प्रास्ताविकात संतोष सरकटे सरांनी शाळेच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख उपस्थितांसमोर मांडला.

## लंपी रोगाचे थैमान; शेतकरी आर्थिक अडचणीत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**दे.साखरशा दि.१८ :** देऊळगाव साखरशा ता. मेहकर येथे सध्या लंपी त्वचारोगाचा प्रचंड प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांचे गुरे-ढोरे मोठ्या प्रमाणावर मरण पावत आहेत.

परिणामी, शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले असून संपूर्ण गावात चिंता व भीतीचे वातावरण पसरले आहे. गावामध्ये जरी पशुवैद्यकीय दवाखाना असला तरी पशुवैद्यकीय अधिकारी किंवा कर्मचारी कधीच हजर नसतात. त्यामुळे गुरांना लसीकरण करणे अथवा इतर आजारांवर वेळेवर उपचार करणे शक्य होत नाही. शेतकऱ्यांना त्यांच्या गुरांच्या उपचारासाठी कोणाकडे जावे, याबाबत संभ्रमाची स्थिती आहे. याशिवाय, मरण पावलेल्या जनावरांचे पंचनामे करण्याचे काम तलाठी यांच्याकडे असले तरी ते सुद्धा गावात क्वचितच येतात, अशी ग्रामस्थांची तक्रार आहे. त्याामुळे पंचनामे कोणाकडून करून घ्यायचे, तक्रार कोणाकडे करायची, याबाबत शेतकऱ्यांमध्ये संतापाचा सूर आहे. स्थानिक प्रशासनाने या गंभीर परिस्थितीकडे लक्ष देऊन, त्वरित पंचनामे करावेत व शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांतून होत आहे. अन्यथा शेतकरी आक्रोश करत आंदोलनाच्या मार्गावर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## खामगाव येथे रोजगार मेळावा आणि मार्गदर्शन सत्राचे आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१८ :** जिल्ह्यातील युवक-युवतींना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी मिळाव्यात आणि त्यांच्या करिअरला योग्य दिशा मिळावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत खामगाव आणि चिखली येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणि रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

हा रोजगार मेळावा दि. २२ जुलै २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता खामगाव येथील श्री सिध्दीविनायक टेक्निकल कॅम्पस, जिल्हा शेगाव रोड येथे पार पडणार आहे. या रोजगार मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून अनेक नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

तसेच याच दिवशी सकाळी १०.३० वाजता जि. एस. विज्ञान, कला आणि वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथे रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजना तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना याबाबत विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले आहे.

याशिवाय, दुपारी १.०० वाजता श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली येथे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची नोंदणी प्रक्रिया, स्वयंरोजगार संधी आणि प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात आले आहे. या ठिकाणी देखील नामांकित कंपन्यांकडून भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे.

या रोजगार मेळाव्यासाठी पात्र उमेदवारांनी आपले बायोडेटा, फोटो व शैक्षणिक कागदपत्रांसह वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## जिजाऊ जन्मोत्सवाची महापूजा मुख्यमंत्र्याच्या हस्ते सपत्नीक करावी

### आ.कायंदे यांनी विधानसभेमध्ये केली मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**मेहकर दि.१८ :** मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे १२ जानेवारी रोजी राजमाता माँ.जिजाऊ जन्मोत्सवाची शासकीय महापूजा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सपतीक करण्याची मागणी आमदार मनोज कायंदे यांनी विधानसभेमध्ये केली आहे.

ज्या पद्धतीने पंढरपूर येथे दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री सपतीक विठ्ठल रुक्माई च्या शासकीय महापूजेसाठी उपस्थित राहतात त्याच धर्तीवर मातृशक्तीचे प्रतीक असलेले माँ.जिजाऊ यांच्या जन्मोत्सवाला देखील तितकेच महत्व मिळावे यासाठी मुख्यमंत्र्यांनी सपतीक उपस्थित राहुन १२ जानेवारी रोजी जिजाऊ जन्मोत्सवाची शासकीय महापूजा करावी अशी मागणी अनेक वर्षापासून आहे. १२ जानेवारी रोजी दरवर्षी जिजाऊ जन्मोत्सव राज्यभरातील जनतेच्या उत्साहात आणि श्रद्धेने साजरा केला जातो,राज्यातून व देशातून लाखो जिजाऊ भक्त दरवर्षी शहरांत दाखल होत असतात. जिजाऊ जन्मोत्सवाला शासकीय स्वरूप दिल्यास महिलांचे सक्षमीकरण होईल प्रेरणादायी कार्याची जाणीव आणि राजमाता माँ.जिजाऊ साहेब यांच्या चारित्र्याचा व्यापक प्रचार होण्यास हातभार लागेल त्यामुळे महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरेला शासनाची मान्यता मिळेल यासाठी १२ जानेवारी रोजी ''शासकीय महोत्सव'' म्हणून मान्यता देण्यात यावी. विधान सभेमध्ये बोलताना माजी नगराध्यक्ष ॲड. नाझेर काझी यांचा उल्लेख आ.मनोज कायंदे यांनी विधानसभेच्या भाषणामध्ये केला त्यांनी म्हटले की, ॲड.नाझेर काझी हे शहरांतील प्रतिष्ठित मुस्लिम कुटूंब आहे. त्यांची सुद्धा मागील दहा वर्षापासून सतत मागणी आहे. त्यामुळे जिजाऊ जन्मोत्सवा दिवशीची शासकीय महापूजा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. त्यामुळे मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे मुख्यमंत्र्यांनी सहपत्नीक उपस्थित रहावे शासकीय महापुजा करावी अशी मागणी विधानसभेमध्ये आमदार मनोज कायंदे यांनी केली आहे.

## शिवसेना (उबाठा)मध्ये नेतृत्व बदलामुळे पक्षातील अंतर्गत कलह आणखी गडद होणार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लोणार दि.१८ :** तालुक्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) मध्ये अलीकडेच झालेल्या नेतृत्वाबदलामुळे पक्षातील अंतर्गत कलह आणखी गडद होत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. अँड. दीपक मापारी यांच्याजागी राजेश बुधवत यांची तालुका प्रमुखपदी अचानक झालेली नियुक्ती ही केवळ एक साधी संघटनात्मक फेरबदल नसून, पक्षातील अंतर्गत राजकीय संघर्षाचा परिपाक मानली जात आहे. महाविकास आघाडीच्या वतीने विधानसभेसाठी सिद्धार्थ खरात यांना उमेदवारी मिळाल्यानंतर, तालुक्यातील संघटनात्मक व्यवस्थापनात मोठी विस्कळीतता निर्माण झाली. अँड. दीपक मापारी हे त्यावेळी तालुका प्रमुखपदी कार्यरत असतानाही त्यांना पक्ष उमेदवाराने पुरेसा सन्मान दिला नाही, ही नाराजी त्यांच्या भूमिकेतून दिसून आली. परिणामी, शिवसेनेच्या (उबाठा) गोटात खरात समर्थक आणि मापारी समर्थक असे दोन गट स्पष्टपणे उभे राहिले. या दोन गटांतील संघर्ष विधानसभेच्या आधीपासूनच स्पष्ट होता. अँड. मापारी यांनी विरोधी गटाचे नेतृत्व करत, सिद्धार्थ खरात यांच्या विरोधात आवाज उठवला. त्यांच्या या भूमिकेमुळेच पुढे पक्षातील गटबाजी तीव्र झाली. खरात यांनी आपले राजकीय वजन वापरून मापारी यांना हटवण्यास यश मिळवले असले तरी त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, शिंदे गटाच्या उदयानंतर शिवसेनेच्या (उबाठा) तालुका संघटनेला पुन्हा उभारी देण्याचे श्रेय अँड. मापारी यांनाच जाते. त्यांनी नव्या तरुण कार्यकर्त्यांना सोबत घेत पक्षाची पुनर्बांधणी केली. लोकसभा निवडणुकीत त्यांनी सत्ताधाऱ्यांविरोधात जनमत निर्माण करण्यासाठी प्रयत केले होते. मात्र, विधानसभा निवडणुकीत त्यांचा स्वाभिमान दुखावला गेला आणि त्यांनी संघटनेपासून अलिप्तता पत्करली. आता त्यांच्याजागी राजेश बुधवत यांची नेमणूक करण्यात आली आहे. बुधवत यांना संघटनात्मक अनुभव असला तरी पक्षातील अंतर्गत नाराजीच्या पार्श्वभूमीवर त्यांना नेतृत्व स्वीकारताना अनेक अडचणींचा सामना करावा लागणार आहे. मापारी समर्थक कार्यकर्त्यांना विश्वासात घेणे आणि पक्षातील गटबाजी कमी करणे, हे त्यांच्यासमोरील मोठे आव्हान ठरणार आहे. आगामी नगरपालिका , जिल्हापरिष आणि पंचायत समित्यांच्या होऊ घातलेल्या निवडणुकाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या (उबाठा) गोटातील ही फूट पक्षासाठी घातक ठरू शकते. जर नेतृत्वाने योग्य वेळेत समेट साधला नाही, तर कार्यकर्त्यांचा पक्षांतराचा ओघ अधिक वाढू शकतो. त्याम





**पोलिसी हिसका:** अकोला:गुरुवारी अकोल्यातील कृषी नगरामध्ये पूर्ववैमनस्यातून गोळीबार करीत आणि तलवारी चालवीत कायदा आणि सुव्यवस्थेचा भंग करणाऱ्या गावगुंडांची शुक्रवारी रात्री पोलिसांनी कृषी नगरातून धिंड काढली.

## पान 1 वरून...

### ना हनी ना ट्रॅप; पेन ड्राईव्ह ...

असल्याची चर्चा आहे. या प्रकरणावर अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत उत्तर दिले. गृहखाते हे फडणवीसांच्या अंतर्गतच येत असल्याने त्यांच्या विधानाला महत्त्व प्राप्त झाले आहे. फडणवीस म्हणाले, सध्या असं वातावरण झालंय की आजी-माजी मंत्री एकमेकांकडे संशयाने बघत आहेत. कोण फसलंय असा प्रश्न सर्वांना पडू लागलाय. कोणत्याही आजी- मंत्र्यांची हनी ट्रॅपची तक्रार नाही अथवा पुरावेही नाही. अशा बाबतची एक तक्रार नाशिकमधून आली होती. एका महिलेने उपजिल्हाधिकाऱ्याच्या संदर्भात अशा प्रकारची तक्रार दिली होती. ही तक्रार महिलेने मागेही घेतली होती. नाशिकच्या ज्या हॉटेलचा उल्लेख होतोय त्या हॉटेलचा मालक काँग्रेसचा उमेदवार होता, असा दावा फडणवीसांनी केला. आरोप करावेत पण पुरावेही ठोस असले पाहिजे, असा टोला त्यांनी पटोलेंना लगावला.

### मसूद अझर पाकव्याप्त काश्मिरमध्ये

अफगाणिस्तानात असण्याची शक्यता व्यक्त करत, तो जर पाकिस्तानी भूमीवर आढळला तर आम्ही त्याला भारताच्या ताब्यात देऊ, असं वक्तव्य केलं होतं. मात्र, भारतीय गुप्तचर संस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, तो सध्या पाक व्याप्त काश्मीरमध्येच आहे. फक्त मसूद अझरच नव्हे, तर हिज्बुल मुजाहिद्दीनचा प्रमुख सय्यद सलाउद्दीनही इस्लामाबादमध्ये ऐषआरामात राहत असल्याचे पुरावे भारतीय गुप्तचर संस्थांकडे आहेत. तो बर्मा टाऊन परिसरात बंदूकधारींच्या संरक्षणाखाली वावरत असल्याचे निदर्शनास आले आहे. मसूद अझर एकेकाळी भारताच्या ताब्यात होता, पण १९९९ मध्ये इंडियन एअरलाईन्सचे विमान -८१४ दहशतवाद्यांनी हायजॅक केल्यानंतर प्रवाशांच्या सुखरूप सुटकेसाठी वाजपेयी सरकारने त्याचा सौदा केला. त्यावेळी त्याला सोडण्यात आले. त्यानंतर त्याने जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेची स्थापना केली. २००१मधील भारतीय संसदेवरील दहशतवादी हल्ला, २०१६ मधील पठाणकोट एअरबेसवरील हल्ला, २०१९ मध्ये पुलवामा येथे भारतीय जवानांवरही दहशतवादी हल्ला या हल्ल्यात अझरचा हात होता.

### लालूप्रसाद यादव यांना ..

**काय आहे नोकरीसाठी जमीन प्रकरण? :** नोकरीसाठी जमीन हे प्रकरण मध्य प्रदेशातील जबलपूर येथे असलेल्या भारतीय रेल्वेच्या पश्चिम मध्य झोनमधील गट-डी नियुक्त्यांशी संबंधित आहे. ही नियुक्ती २००४ ते २००९ दरम्यान लालूप्रसाद यादव रेल्वेमंत्री असताना करण्यात आली होती. या नियुक्त्यांच्या बदल्यात, लोकांनी राजद सुप्रीमोच्या कुटुंबाच्या किंवा सहकाऱ्यांच्या नावे जमिनीचे तुकडे भेट म्हणून दिले किंवा हस्तांतरित केले. १८ मे २०२२ रोजी, लालू आणि त्यांची पत्नी, दोन मुली, अज्ञात सरकारी अधिकारी आणि खासगी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. यापूर्वी, नोकरीसाठी जमीन घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात, ईडीने १४ मे रोजी दिल्लीच्या न्यायालयात सांगितले होते की, लालू प्रसाद यादव यांच्यावर खटला चालवण्याची परवानगी देण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ८ मे रोजी मनी लाँड्रिंग प्रकरणात सीआरपीसीच्या कलम १९७ (१) (भारतीय नागरी संरक्षण संहिता, २०२३ च्या कलम २१८) अंतर्गत लालूंवर खटला चालवण्याची परवानगी दिली होती.

### एकाच रात्रीत पाडले ६ ...

डीजेआय मॅविक ३ क्लासिक ड्रोन आणि ३ पॅकेट संशयित हेरॉइन (एकूण वजन- १.७४४ किलो) जप्त करण्यात आले. रात्री रोरानवाला खुर्द गावाजवळही हेरॉइनचे एक पॅकेट (एकूण वजन- ५९६ ग्रॅम) आणि डीजेआय मॅविक ३ क्लासिक ड्रोन जप्त केले. दहशतवादविरोधी उपाययोजनांमध्ये तांत्रिक हस्तक्षेप झाल्यामुळे हे ड्रोन क्रॅश झाले. शुक्रवारी सकाळी, धानोई कलान गावाच्या परिसरात तांत्रिक दहशतवादविरोधी उपाययोजना सक्रिय केल्यावर आणखी एक डीजेआय मॅविक ३ क्लासिक ड्रोन अडवण्यात आला. जवानांनी तोही पाडला. काही तासांच्या कालावधीत बीएसएफने केलेल्या कारवाईत, ६ डीजेआय मॅविक ३ क्लासिक ड्रोन आणि २.३४० किलो हेरॉइन जप्त करण्यात आले. यामुळे सीमेपलीकडे सक्रिय असलेल्या पाकिस्तानी नार्को-दहशतवाद सिंडिकेटला मोठा धक्का बसला आहे.

### एनआयए प्रकरणांच्या जलद ...

हे अद्याप सांगितलेले नाही. १५ जानेवारी २०२५ रोजी, सर्वोच्च न्यायालयाने सर्व उच्च न्यायालये , राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश दिले की प्रत्येक न्यायालयात पुरुष, महिला, दिव्यांग आणि ट्रान्सजेंडरसाठी स्वतंत्र शौचालये असावीत. संविधानाच्या कलम २१ अंतर्गत योग्य स्वच्छतागृहे मिळणे हा मूलभूत अधिकार आहे.

### 'आमदार माजलेत' अशा ...

दिलगिरीवर बोला, असं नार्वेकर म्हणाले. तेव्हा राष्ट्रवादी शपचे आमदार जयंत पाटील यांनी त्यांना त्यांची बाजू मांडू द्या, अशी विनंती केली. आव्हाडांसाठी जयंत पाटील उभे राहिलेले असताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी हस्तक्षेप केला. या प्रकरणावर राजकारण करणं योग्य नाही. आपण कधीतरी राजकारणाच्या पलीकडे जाऊन विचार करणार आहोत की नाही, असा सवाल फडणवीस यांनी विचारला. काल घडलेल्या प्रकारानंतर सगळ्यांवरच टीका होत आहे. केवळ पडळकर, आव्हाडांवर टीका होत नाही. सगळ्याच आमदारांवर टीका होत आहे. आमदार माजलेत अशा प्रकारच्या प्रतिक्रिया येत आहेत, असं फडणवीस म्हणाले. फडणवीस यांनी खडे बोल सुनावताच आव्हाडांनी दिलगिरी व्यक्त केली. नितीन देशमुख माझ्यासोबत आलेला नव्हता. मारहाण झाली तेव्हा मी तिथे नव्हतो. मी मरीन लाईन्सला होतो. पण जो प्रकार झाला, तो चुकीचा आहे. त्याबद्दल मला वाईट वाटतं, असं आव्हाड म्हणाले. यानंतर वादावर पडदा पडला.

### इंडिया आघाडीतून 'आम आदमी ...

असेही त्यांनी सांगितले. संजय सिंह यांनी आप नेत्यांविरुद्ध अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) चौकशीवर भाजपवर हल्लाबोल केला. याविषयी बोलताना, भाजप हा भित्र्या लोकांचा पक्ष आहे. ते फक्त आमच्याविरुद्ध एजन्सींचा वापर करू शकतात. आम्ही झुकणार नाही, असे त्यांनी म्हटले केले. त्यासोबतच रॉबर्ट वाड्रा यांच्या मुद्द्यावर संजय सिंह यांनी, गेल्या १० वर्षांपासून भाजप 'जिजाजी' असा जयघोष करत आहे. जर इतक्या वर्षात ते कोणत्याही निष्कर्षावर पोहोचले नसतील तर ते त्यांचे अपयश आहे, असे त्यांनी म्हटले.

# शासकीय मालमत्तांकडे अडीच कोटी कर थकित

## नोटीस बजावूनही कर भरण्यास उदासीनता

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. १८ :** मालमत्ता कर महापालिकेचा महत्त्वाचा आर्थिक स्त्रोत असून यामध्ये वाढ करण्यासाठी आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी वसुलीत फेल ठरलेल्या स्वाती इंडस्ट्रीजचा ठेका बंद करून प्रशासनाला काम सोपवले आहे मात्र, उत्पन्न कमी व खर्च अधिक अशी परिस्थिती महापालिकेची झाली आहे. महापालिका हद्दीतील सुमारे दीड हजार शासकीय मालमत्तांवर अडीच कोटी रुपयांवर कर थकीत आहे.
यापूर्वी स्वाती इंडस्ट्रिज कराची वसुली करायची. परंतु करात समाधानकारक वाढ होत नसल्याने, आयुक्त डॉ. लहाने यांनी, कंपनीसोबतचा करारनामा रद्द करून कर वसुलीसाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांवर विश्वास दाखवित, ८० कोटी रूपयांपर्यंत कर वसुली करण्यात यश मिळविले. दरम्यान वाढीव मालमत्ता कराबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. अद्याप कराच्या बाबतीत न्यायालयाने कोणताही निर्णय दिलेला नाही. त्यामुळे महापालिका प्रशासन निश्चित केलेल्यानुसार मालमत्ता कर वसूल करीत आहे, त्यातही मनपा आयुक्त डॉ. लहाने शास्ती अभय योजना सुरू करून मालमत्ताधारकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला होता. शास्ती योजना लागू करूनही महापालिकेच्या तिजोरीत समाधानकारक कर जमा झालेला नाही. सन २०२४-२०२५ या वर्षात मालमत्ताधारक, दुकानदार, आस्थापना यापैकी काहींनी कराची रक्कम भरली आहे. मात्र, शासकीय, प्रशासकीय इमारतींवर मालमत्ता कर थकीत असून, तो डोळे दीपवून टाकणारा आहे. चार झोननिहाय शासकीय इमारतींवर मालमत्ता कर थकीत असून, नोटीसदेखील बजावल्या आहेत. मात्र, शासकीय कार्यालयांकडून कराचा भरणा होत नसल्याचे चित्र आहे.

### यांनी थकविला कर

शहरातील ११९ शैक्षणिक संस्थांसह रेल्वे विभाग, राज्य परिवहन, स्त्री रूग्णालय, जिल्हा सामान्य रूग्णालय, वन विभाग, सुपर स्पेशालिटी, तहसील कार्यालय, आयटीआय, वाहतूक पोलिस कार्यालय, सार्वजनिक बांधकाम कार्यालय, सिंचन, भूमी अभिलेख, जिल्हा कोषागार, आरटीओ, विभागीय सहनिबंधक, वनाधिकाऱ्यांचे क्वॉटर्स, डाक विभाग, पोलिस अधिकाऱ्यांचे क्वॉटर्स आदी.

कर वसुली वाढावी यासाठी प्रशासन प्रयत्न करीत असून शासकीय मालमत्तांकडे असलेली थकीत अडीच कोटींवर पोहोचली आहे. शैक्षणिक संस्थांसोबतच शासकीय कार्यालयांना कराचा भरणा करण्याबाबत सांगण्यात आले आहे.
**- विजय पारतवार,**
कर अधीक्षक महापालिका

# विभाग उपायुक्त संगीता चव्हाण यांचे निलंबन;मराठा तरुणांना आदिवासी प्रमाणपत्र वाटप!

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मुंबई, दि. १८ :** पावसाळी अधिवेशनात अनेक आमदारांकडून प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा ढिगाळपणा आणि गलथानपणा समोर आणून त्यांच्यावर कारवाईची मागणी केली जात आहे. लक्षवेधीद्वारे सभागृहात हा भोंगळपणा समोर आणला जात आहे. गेल्या काही दिवसात अनेक अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात आले. त्यात आज पुन्हा एका बड्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात आली आहे. ते म्हणजे आदिवासी विभागातील उपायुक्त संगीता चव्हाण यांचे.
संगीता चव्हाण यांनी मराठा समाजातील तरुणांना आदिवासी प्रमाणपत्र दिले होते, त्यामुळे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली असून याबाबत अधिवेशनात घोषणा देखील करण्यात आली. अशोक उईके यांनी आदिवासी विभागातील उपायुक्तांवर निलंबनाची कारवाई करत प्रशासकीय अधिकाऱ्यांना एकप्रकारे इशाराच दिला आहे. दरम्यान, आपल्यावर निलंबनाची कारवाई झाली, याची अद्याप वरिष्ठांकडून माहिती नसल्याचं संगीता चव्हाण यांनी स्पष्ट केलं. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर सध्या अँक्शन मोडवर आहेत. काही दिवसांपूर्वी दिव्यांग आयुक्तांचे थेट विधानसभेतून निलंबन केले होते. आमदारांचा फोन न उचलणे, तसेच एका शिक्षण संस्थेबाबत सातत्याने तक्रारी असूनही कारवाई न केल्याने त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली होती.

# कृषी अधीक्षक कार्यालयासमोर घंटानाद आंदोलन

## शेतकरी समस्यांवरून काँग्रेस आक्रमक: नुकसान भरपाई, बोगस बियाणे, खत टंचाईवरून सरकारला धरले धारेवर

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**गडचिरोली, दि. १८ :** शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवरून आक्रमक झालेल्या गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीने, जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांच्या नेतृत्वात शुक्रवारी कृषी अधीक्षक कार्यालयासमोर 'घंटानाद' आंदोलन केले. यावेळी, शासनाच्या शेतकरीविरोधी धोरणांचा निषेध करत, विविध मागण्यांचे निवेदन जिल्हा कृषी अधीक्षकांना सादर करण्यात आले.
या आंदोलनात, पूरपरिस्थितीमुळे झालेले नुकसान, बोगस बियाणे आणि खत टंचाई यांसारख्या गंभीर समस्या मांडण्यात आल्या. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, दुबार पेरणीसाठी दर्जेदार बियाणे उपलब्ध करावे, बोगस बियाणे विकणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करावी आणि युरिया व डीएपी खतांचा मुबलक पुरवठा करावा, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या.




तसेच, खतांसोबत इतर उत्पादनांची सक्तीने विक्री (लिंकिंग) तात्काळ थांबवावी, अशी जोरदार मागणीही करण्यात आली. या आंदोलनात माजी जि. प. उपाध्यक्ष मनोहर पोरेटी, ॲड. कविता मोहरकर, सतीश विधाते, वसंत राऊत, मिलिंद खोब्रागडे, प्रशांत कोराम, प्रमोद भगत, वामन सावसाकडे, रजनीकांत मोटघरे, नितेश राठोड, प्रभाकर वासेकर, रमेश चौधरी, विनोद लेनगुरे, घनश्याम वाढई, प्रतीक बारसिंगे, पुष्पलता कुमरे, आशा मेश्राम, अपर्णा खेवले, सुनिता रायपुरे, शालिनी पेंदाम, कविता उराडे, मालता पुडो, पौर्णिमा भडके, उत्तम ठाकरे, सुभाष कोठारे, सुरेश भांडेकर, योगेंद्र झंजाळ, उमेश आखाडे, जितेंद्र मुनघाटे, मिलिळपव बारसागडे, जावेद खान, माजिद सय्यद, निखिल खोब्रागडे, श्रीनिवास ताटपल्लीवार, स्वप्निल बेहरे, सुधीर बांबोळे, गोपाल कविराज, चोकाजी बांबोळे, नृपेश नांदणकर, रमेश धकाते, प्रफुल अंबोरकर, जितेंद्र मुप्पीडवार, तोमदेव जुवारे, नीलकंठ गेडाम, गोपाल कोमलवार, जोगुजी तुंकलवार, नामदेव वासेकर, लहुजी भांडेकर, नामदेव फावणवाडे, रविंद्र मडावी, रोहिदास अलाम, तुळशीराम बोबाटे, जोगुजी भोयर, रमेश मुनरतीवार, देवराव मोहुर्ले, राजेंद्र कुकडकार, सुभाष धाईत, नामदेव अंडगलवार आणि जनार्धन तुंकलवार यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या सैन्य जवानाला अटक

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**चंदीगड, दि. १८ :** पाकिस्तानच्या इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजेन्स (आयएसआय) साठी हेरगिरी करणाऱ्या भारतीय सैन्यातील जवानाला अटक करण्यात आली आहे. आरोपी जवानाचे नाव देविंदर सिगं असून तो संगरूर जिल्ह्यातील निहालगडचा रहिवासी आहे. पंजाब पोलिसांच्या स्टेट स्पेशल ऑपरेशन सेलने त्याला जम्मू-काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यातील उरी येथून १४ जुलै रोजी अटक केली आहे.
यासंदर्भात पंजाब पोलिसांनी जारी केलेल्या निवेदनानुसार हेरगिरीच्या आरोपाखाली ताब्यात घेतलेल्या माजी सैनिक गुरप्रीत सिंग उर्फ गुरी याच्या अटकेनंतर देविंदरला अटक करण्यात आली आहे. गुरप्रीत सिंगच्या चौकशीत असे आढळले की देविंदर फिरोजपूर तुरुंगात असताना लष्कराचे संवेदनशील कागदपत्रे मिळवण्यात त्याचा सहभागी होता. यातील गोपनिय माहिती त्याने आयएसआयला दिल्याचा आरोप आहे. देविंदर सिंगच्या अटकेनंतर, अधिकाऱ्यांनी त्याला १५ जुलै रोजी मोहाली न्यायालयात हजर केले. न्यायालयाने आरोपीला अधिक चौकशीसाठी सहा दिवसांची पोलिस कोठडी दिली. सुरुवातीच्या तपासात असे दिसून आले आहे की देविंदर आणि गुरप्रीत यांची पहिली भेट २०१७ मध्ये पुण्यातील एका लष्करी छावणीत प्रशिक्षणादरम्यान झाली होती. त्यानंतर, दोघेही संपर्कात राहिले आणि नंतर त्यांना सिक्कीम आणि जम्मू आणि काश्मीरमध्ये तैनात करण्यात आले.

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे 'पालक' बनावे-प्राचार्य प्रशांत गावंडे

## 'सिखें' संस्थेतर्फे ४२५ शिक्षकांसाठी कार्यशाळा; गुणवत्तापूर्ण शिक्षणावर दिला भर

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.१८:** 'शिक्षकांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालकांची भूमिका बजवावी,' असे आवाहन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य प्रशांत गावंडे यांनी केले. 'सिखें' संस्थेतर्फे आयोजित चार दिवसीय शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. या शिबिरात, ४२५ शिक्षकांनी सहभागी होऊन, अध्यापनाच्या नवीन पद्धती आत्मसात केल्या.
'सिखें'संस्थेच्या वतीने, येथील दीनदयाळ प्रबोधिनीमध्ये, कळंब, बाभूळगाव आणि यवतमाळ पंचायत समिती अंतर्गत



येणाऱ्या ४२५ शिक्षकांसाठी, या चार दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात, विद्यार्थ्यांना वाचन आणि संख्याज्ञान यांसारखे मूलभूत विषय, अधिक प्रभावीपणे आणि समजपूर्वक कसे शिकवावेत, यावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत, कृतिप्रधान सत्रे आणि गटचर्चांच्या माध्यमातून, प्रशिक्षण अधिक परिणामकारक बनविण्यात आले. या कार्यक्रमाला, 'सिखें' संस्थेच्या राष्ट्रीय प्रमुख वर्षा परचुरे आणि राज्य प्रमुख शरदचंद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या अध्यक्षीय भाषणात, प्राचार्य प्रशांत गावंडे म्हणाले, 'जे शिक्षक आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी दक्ष असतात, त्यांनीच आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठीही आग्रही असले पाहिजे.' त्यांच्या या आवाहनाला उपस्थित शिक्षकांनी मोठा प्रतिसाद दिला.

### 'सिखें' संस्थेचा 'टीचर इनोव्हेटर'कार्यक्रम

'सिखें'संस्था गेल्या चार वर्षांपासून, यवतमाळ जिल्ह्यात 'टीचर इनोव्हेटर प्रोग्राम'राबवत आहे. याचा मुख्य उद्देश, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विविध नावीन्यपूर्ण अध्यापन पद्धती वापरून, दर्जेदार शिक्षण देणे हा आहे. या उपक्रमामुळे, शिक्षकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, ते आता अधिक आनंददायी पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकवीत आहेत, ज्यामुळे शिक्षणाचा पाया बळकट होत आहे.

### या तज्ज्ञांनी दिले प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन

या चार दिवसीय प्रशिक्षण शिबिरात, 'सिखें' संस्थेच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. यात, संस्थेच्या ॲकेडेमिक लीड अंजली रघुराम, विषयतज्ज्ञ आशीष केळसीकर, जिल्हा व्यवस्थापक संभाजी भिसे, सहायक जिल्हा व्यवस्थापक नितीन पखाले, तसेच विषयतज्ज्ञ अश्विनी भुणभुणे, अश्विनी शाह, मोहन चुक्काबोटलावर आणि सोनाली लोखंडे यांचा समावेश होता.

## थोडक्यात

### हवाई वाहतुकीत पुणे विमानतळाची झेप




**पुणे :** पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाने गेल्या आर्थिक वर्षात विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. प्रवासी विमानात आणि मालवाहतुकीत (कार्गो) मोठी वाढ झाली आहे, अशी माहिती भारतीय विमानतळ प्राधिकरणांतर्गत (एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया एएआय) पुणे विमानतळ प्रशासनाने गुरुवारी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. प्रसिद्धीपत्रकात नमूद केल्याप्रमाणे, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये १.०४५८ कोटी प्रवाशांनी विमानतळाचा वापर केला आहे. यात ९.८ टक्क्यांची वाढ झाली आहे. विमान वाहतुकीचे प्रमाण ७.५ टक्क्यांनी वाढून ६८,८३० वर पोहोचले असून, मालवाहतूक ११.८ टक्क्यांनी वाढून ४२,२९० टन झाली आहे. मे महिन्यात ९.३८ लाख प्रवाशांची हवाई वाहतूक करून पुणे विमानतळाने आतापर्यंतचा सर्वाधिक मासिक प्रवासी विक्रम नोंदवला. दरम्यान, मालवाहतुकीतही सातत्याने वाढ होत असून जून २०२३ मध्ये २,६५४ टन असलेली वाहतूक मे महिन्यात ४,२०० टनांवर गेली आहे.विमानतळ परिसरात हवाई प्रवाशांच्या सुकर प्रवासासाठी नव्याने टर्मिनलचा याचा मोठा फायदा झाला आहे. या टर्मिनलचे उद्घाटन १० मार्च २०२४ रोजी पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आले. सुमारे ५२ हजार चौरस मीटरच्या या टर्मिनलमध्ये दर वर्षी ९५ लाख प्रवाशांना सामावून घेण्याची क्षमता असून, तासाभरात २,३०० प्रवासी सुलभ प्रवास करत आहेत. या टर्मिनलमध्ये ३४ 'चेक-इन' यंत्रणा, १५ लिफ्ट, ८ सरकते जिने, १० वातानुकूलित हलते पूल, 'स्मार्ट डॉकिंग सिस्टिम', प्रवासी साहित्य-पिशव्या तपासणी आणि वाहून नेहणारी यंत्रणा आणि सुरक्षा तपासणीची यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असल्याचे नमूद करण्यात आले.

### मुंबईच्या वांद्रेत सिलिंडरचा भीषण स्फोट; स्फोटानंतर तीन मजली चाळच कोसळली

**मुंबई :** मुंबईतील वांद्रे येथे एका घरातील गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याची धक्कादायक घटना समोर आली. हा स्फोट इतका भीषण होता की, यामुळे तीन मजली चाळ पत्त्यासारखी कोसळली. यामध्ये मोठी वित्तहानी आणि जीवितहानी झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. ही चाळ कोसळल्याने या ढिगाऱ्याखाली १४-१५ जण अडकल्याची माहिती समोर आली आहे.चाळ क्रमांक ३७ शुक्रवारी (दि.१८) पहाटेच्या सुमारास कोसळली. अग्निशमन विभागाच्या एका, मुंबई पोलीस आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थानिक यंत्रणेसह आठ अग्निशमन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. सध्या मदत आणि बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. वांद्रे पूर्वेतील भारत नगर परिसरात चाळीचा काही भाग कोसळल्याने अनेक जण जखमी झाले असून, काही लोक ढिगाऱ्याखाली अडकल्याची शक्यता आहे, अशी माहिती वांद्रे पूर्वेतील भारत नगर परिसरातील अधिकाऱ्याने दिली.

### ८० वर्षांच्या वृद्धाला हातपाय बांधून भरउन्हात गाडीत केले बंद



**आगरा :** महाराष्ट्रातून आग्र्याला ताजमहल पाहण्यासाठी गेलेल्या पर्यटक कुटुंबाने वयोवृद्ध व्यक्तीला गाडीतच बांधून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आलाय. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या घटनेचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ताजमहाल पाहण्यासाठी गेलेल्या कुटुंबाने वृद्ध व्यक्तीला गाडीतच बांधून ठेवलं. कापडाने हात पाय बांधलेल्या अवस्थेत गाडीत त्यांना सोडलं होतं. भर उन्हात गाडी उभा केली असल्यानं वृद्धाला उष्णतेमुळं अस्वस्थ वाटायला लागलं. परिसरातील लोकांना जेव्हा गाडीत वृद्ध व्यक्ती असल्याचं दिसलं तेव्हा त्यांनी काच फोडून वृद्धाची सुटका केली.याबाबत मिळालेली माहिती अशी की, उत्तर भारतात उन्हाचा कडाका आहे. अशा उन्हात एका गाडीमध्ये ८० वर्षीय वृद्धाला लॉक करण्यात आलं होतं. गाडीतून आलेलं पर्यटक कुटुंब ताजमहल बघायला गेलं होतं. दरम्यान, उन्हामुळे वृद्धाची अवस्था गंभीर बनली होती. त्याला बोलताही येत नव्हतं. ताजमहलच्या पश्चिम गेट पार्किंगमधील गार्ड आणि कर्मचाऱ्यांना लॉक असलेल्या कारमध्ये वृद्ध व्यक्ती असल्याचं दिसलं. गार्डने कारच्या काचेतून नीट पाहिलं असता वृद्ध बेशुद्ध झाला

# दहशतवादी संघटनेविरोधात अमेरिकेची भारताला साथ

## 'टीआरएफ' दहशतवादी संघटना म्हणून घोषित

**वाशिंग्टन, दि.१८** वृत्तसंस्था



अमेरिकन सरकारने द रेजिस्टन्स फ्रंट (टीआरएप) या संघटनेला परदेशी दहशतवादी संघटना म्हणून घोषित केलं आहे. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांनी याबाबतची माहिती दिली आहे. २२ एप्रिल रोजी काश्मीर खोऱ्यातील पहलगाम येथील बैसरन येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी याच संघटनेने घेतली होती. या संघटनेच्या दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये पर्यटकांवर अंधाधुंद गोळीबार केला होता. या गोळीबारात २६ पर्यटक ठार झाले होते.
द रेजिस्टन्स फ्रंट ही पाकिस्तानमधील कुख्यात दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैय्यबाचीच एक शाखा असल्याचं अमेरिकेने म्हटलं आहे. ही संघटना सातत्याने काश्मीर खोऱ्यात कुरापती करत आहे. टीआरएफ लष्करचाच एक भाग असल्याच्या वृत्तांवर अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी शिक्कामोर्तब केलं आहे. संयुक्त राष्ट्राने देखील टीआरएफला दहशतवादी संघटना घोषित केलं आहे. या संघटनेचं मुख्यालय पाकिस्तानमध्ये आहे. रुबियो यांनी एक निवेदन जारी केलं आहे. या निवेदनात त्यांनी म्हटलं आहे की टीआरएफला दहशतवादी संघटना घोषित करण्याचा निर्णय आपल्या राष्ट्रीय संरक्षण हितांसाठी, दहशतवादाशी दोन हात करण्यासाठी महत्त्वाचा आहे. तसेच हा निर्णय पहलगाममधील हल्ल्यानंतर पीडितांच्या न्यायासाठी आपली वचनबद्धता दर्शवतो. टीआरएफने पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. लष्करने २००८ मध्ये मुंबईवर केलेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर सामान्य नागरिकांवर केलेला हा दुसरा सर्वात मोठा दहशतवादी हल्ला होता असंही अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.अमेरिकेने टीआरएफ ही संघटना फॉरेन टेरर ऑउटफिट असल्याची घोषणा केल्यानंतर आता या संघटनेची आर्थिक नाकेबंदी केली जाईल. या संघटनेवर आर्थिक व प्रवासी निर्बंध लागू केले जातील. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने म्हटलं आहे की यामुळे दहशतवादविरोधी प्रयत्नांमध्ये जागतिक भागीदारांबरोबर वॉशिंग्टनचे सहकार्य आणखी मजबूत होईल. टीआरएफचा भारतातील अनेक दहशतवादी हल्ल्यांशी संबंध आहे. तीन महिन्यांपूर्वी चार सशस्त्र दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये पर्यटकांवर अंधाधुंद गोळीबार केला होता.

# खोटे बोलण्यासाठी पंतप्रधान बिहारमध्ये येत आहेत

## लालू प्रसाद यादवांची खोचक टीका

**पाटणा, दि.१८** वृत्तसंस्था



'खोटं बोलण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी बिहारमध्ये येत आहेत', अशा शब्दांत राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांनी टीका केली. 'एक्स' अकाऊंटवर पोस्ट शेअर करत लालूप्रसाद यांनी खोचक शब्दात पंतप्रधानांवर टीका केली आहे. 'तुम्हाला खोटं ऐकायचं आहे का'? असा सवाल लालू यांनी मतदारांना केला आहे. 'गुरुत्वाकर्षणाचं बल माणसाला जमिनीकडे खेचतं. त्याच धर्तीवर निवडणूकर्षणाचं बल माणसाला बिहारकडे खेचून घेऊन येतं', अशा सूचक शब्दाल लालूंनी पंतप्रधानांच्या बिहार भेटीवर टीका केली आहे.
महाराष्ट्र व हरियाणापाठोपाठ दिल्ली विधानसभा निवडणूक जिंकून विजयाच्या गतीवर स्वार झालेल्या भाजपाने आता आपलं लक्ष्य बिहारच्या निवडणुकीकडं वळवलं आहे. बिहारमध्ये ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये विधानसभा निवडणूक होण्याची शक्यता आहे. राज्यात सध्या भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार असून नितीश कुमार हे मुख्यमंत्री आहेत. आगामी निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना शह देण्यासाठी लालू प्रसाद यादव यांनी महाआघाडीची मोट बांधली आहे. या आघाडीत राष्ट्रीय जनता दलासह काँग्रेस व इतर मित्रपक्षांचा समावेश आहे.
बिहारमध्ये निवडणूक आयोगाने मतदार याद्यांची फेरतपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. निवडणूक आयोगाच्या या भूमिकेमुळे अनेक मतदारांना मतदानापासून वंचित राहावं लागू शकतं, असा आरोप काँग्रेसने केला आहे. दुसरीकडे भाजपालाही या मोहिमेचा दबाव जाणवू लागला असून अनेक नेते चिंताग्रस्त असल्याचं दिसून येत आहे.

**बिहारमध्ये भाजपाचे संख्याबळ किती?**

२०२० च्या बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपाने ११० पैकी ७४ जागांवर दणदणीत विजय मिळवला होता. त्यानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत पक्षाने आरजेडीकडून कुधनी विधानसभेची जागा हिसकावून घेतली. ज्यामुळे बिहार विधानसभेत भाजपाची आमदारांची संख्या ७५ झाली. एवढ्यावरच न थांबता भाजपाने विकासशील इंसान पार्टीचे तीन आमदार फोडले आणि आमदारांची संख्या ७८ वर नेली. २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपाने आणखी दोन जागांवर विजय मिळवला. अशाप्रकारे भाजपाकडे आता कागदावर एकूण ८० आमदार आहेत.

# पत्नी, मुलाला भेटताच शुभांशू शुक्ला भावूक



**टेक्सास, दि.१८** वृत्तसंस्था

१८ दिवस अंतराळात राहून पृथ्वीवर परतलेला भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्लाने बुधवारी उशिराने आपली पत्नी कामना आणि ६ वर्षांचा मुलगा कियाश यांची भेट घेतली. या भेटीप्रसंगी शुभांशूने पत्नीला मिठी मारली. तसेच मुलाला आपल्या हातात घट्ट पकडले. यादरम्यान शुभांशू खूप भावनिक दिसत होता. तर मुलगा त्याच्या वडिलांच्या कुशीत खूप आनंदी दिसत होता. अंतराळातून परतल्यानंतर ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला प्रथमच अमेरिकेत कुटुंबीयांना भेटला. पत्नी आणि मुलगा दोघेही सध्या अमेरिका भेटीवर पोहोचले आहेत. शुभांशूच्या पत्नीचे नाव डॉ. कामना शुक्ला असे असून ती व्यवसायाने दंतवैद्य आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातून २० दिवसांनंतर अंतराळवीर शुभांशू शुक्ला मंगळवारी पृथ्वीवर परतला आहे. शुभांशूचे समुद्रात यशस्वी अवतरण होताच त्याचे थेट प्रक्षेपण पाहून आई आशा शुक्ला हिलाही आनंदाश्रू ढाळले होते.

# भूपेश बघेल यांच्या मुलाला ईडीकडून अटक

## छत्तीसगडमधील मद्य घोटाळ्याप्रकरणी कारवाई

**भिलाई , दि.१८** वृत्तसंस्था



काँग्रेस नेते आणि छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांचा मुलगा चैतन्य बघेल याला अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) अटक केली आहे. त्याला भिलाई येथील त्याच्या राहत्या घरातून अटक करण्यात आली आहे.
चैतन्य बघेल यांची ही अटक अशा वेळी झाली आहे जेव्हा आज सकाळी ईडीने भूपेश बघेल यांच्या घरावर छापा टाकला. कथित दारू घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात चैतन्य बघेलची ही अटक करण्यात आली आहे. आज चैतन्यचा वाढदिवसही आहे. छाप्यादरम्यान काही महत्त्वाची कागदपत्रे सापडल्यानंतर ईडीने चैतन्यला ताब्यात घेतल्याचे सांगण्यात येते. ईडीच्या या कारवाईमुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये संताप निर्माण झाला आहे.
ईडीचे पथक भूपेश बघेल यांच्या घरावर छापा टाकण्यासाठी आत जात असताना कामगारांनी त्याला विरोध केला. यानंतर पोलिस आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये जोरदार वादावादी झाली. मात्र, पोलिसांनी त्यांना रोखले. आज छत्तीसगड विधानसभेचा शेवटचा दिवस असताना ही कारवाई करण्यात आली आहे. माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल आज विधानसभेत रायगड जिल्ह्यातील वृक्षतोडीचा मुद्दा उपस्थित करणार होते.
७ जुलै रोजी, आर्थिक गुन्हे शाखेने मद्य घोटाळ्यातील चौथे पुरवणी आरोपपत्र दाखल केले, ज्यामुळे घोटाळ्याची अंदाजे रक्कम २,१६१ कोटी रुपयांवरून ३,२०० कोटी रुपये झाली. हे आरोपपत्र ३० जून रोजी दाखल करण्यात आले.या प्रकरणात आतापर्यंत एकूण पाच आरोपपत्रे दाखल करण्यात आली आहेत, त्यापैकी तीन आधी दाखल करण्यात आली होती. या घोटाळ्यात २९ उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांना (जिल्हा अधिकारी, सहाय्यक आयुक्त, उपायुक्त) आरोपी करण्यात आले आहे, ज्यात काही निवृत्त अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

# दिल्लीतील शाळांना पुन्हा बॉम्बची धमकी

**नवी दिल्ली, दि.१८** वृत्तसंस्था




दिल्लीतील शाळांमध्ये आज पुन्हा एकदा बॉम्बस्फोटाच्या धमक्या मिळाल्या आहेत. एकूण ३ शाळांना बॉम्बस्फोटाच्या धमक्या मिळाल्या आहेत. सुरुवातीला रोहिणी सेक्टर ३ मधील अभिनव पब्लिक स्कूल, नंतर पश्चिम विहारमधील रिच मोंड स्कूल आणि नंतर रोहिणी सेक्टर २४ मधील सॉवरेन स्कूलला बॉम्बस्फोटाच्या धमकीचा मेल आला. अग्निशमन दल आणि दिल्ली पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले आहे. बॉम्बशोधक पथकही तपास करत आहे.
बुधवारी सकाळी दक्षिण दिल्लीतील वसंत व्हॅली स्कूल आणि द्वारका येथील सेंट थॉमस स्कूलला ईमेलद्वारे धमकीचे संदेश मिळाले. दिल्लीतील एकूण नऊ शाळांना सलग तीन दिवसांत १० बॉम्बस्फोटाच्या धमकीचे ईमेल आले.
या वर्षी ७ फेब्रुवारी रोजी पूर्व दिल्लीतील मयूर विहार फेज-१ मधील अल्कॉन पब्लिक स्कूलला बॉम्बस्फोटाची धमकी मिळाली. तथापि, कसून शोध घेतल्यानंतर काहीही संशयास्पद न सापडल्याने अधिकाऱ्यांनी ती केवळ अफवा असल्याचे घोषित केले.गेल्या तीन दिवसांपासून दिल्लीतील शाळा आणि महाविद्यालयांना मिळत असलेल्या बॉम्ब धमक्यांमुळे पोलिसांच्या अडचणी खूप वाढल्या आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की हे धमकीचे ईमेल 'एनक्रिप्टेड नेटवर्क' (एक प्रणाली ज्यामध्ये कोणताही तृतीय पक्ष घुसू शकत नाही) द्वारे पाठवले गेले आहेत, ज्यामुळे त्यांचे स्रोत शोधणे खूप कठीण झाले आहे.
दिल्ली पोलिसांचे सायबर तज्ञ आणि धमक्यांचा तपास करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की धमक्या पाठवणारे 'व्हर्च्युअल प्रायव्हेट नेटवर्क' (व्हीपीएन) आणि 'डार्क वेब' वापरत आहेत. 'डार्क वेब' सहसा गुगल, बिंग सारख्या सर्च इंजिनवरून दिसत नाही आणि ते फक्त विशेष सॉफ्टवेअरद्वारेच ॲक्सेस करणे शक्य आहे, तर ऑनलाइन क्रियाकलाप 'व्हीपीएन' वापरून लपवले जातात. एका अधिकाऱ्याने सांगितले की, ''डार्क वेबचा शोध घेणे म्हणजे आरशांनी भरलेल्या खोलीत सावलीचा पाठलाग करण्यासारखे आहे.

# स्वच्छता सर्वेक्षणात महाराष्ट्राला १० पुरस्कार

**नवी दिल्ली , दि.१८** वृत्तसंस्था

देशातील स्वच्छ शहरांच्या विशेष 'सुपरलीग' श्रेणीत इंदूरने बाजी मारली असली तरी, १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये देशात यंदा अहमदाबादने 'सर्वात स्वच्छ शहर' असा मान पटकावला. महाराष्ट्राने स्वच्छता सर्वेक्षणात १० राष्ट्रीय पुरस्कार मिळवून देशात दबदबा कायम राखला. तीन ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्र सर्वाधिक स्वच्छ गणले गेले. केंद्राच्या नागरी विकास मंत्रालयाच्या वतीने दरवर्षी देशभर स्वच्छता सर्वेक्षण केले जाते. २०२४-२५ च्या सर्वेक्षणातील मानांकित शहरांचा गुरुवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. यंदा 'सुपर स्वच्छ लीग' या नव्या श्रेणीचा समावेश करण्यात आला, त्याचबरोबर स्वच्छ शहरांची श्रेणीही कायम ठेवण्यात आली.

# रांचीमध्ये सरकारी शाळेचे छत कोसळून एकाचा मृत्यू

## सततच्या पावसाने घडली घटना

**पाटणा, दि.१८** वृत्तसंस्था



झारखंडमध्ये सतत सुरु असलेल्या पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. याचदरम्यान रांचीमध्ये दुःखद घटना घडली आहे. सततच्या पावसामुळे एका सरकारी शाळेच्या इमारतीच्या छताचा काही भाग कोसळला आहे. या दुर्घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे, तर एक जण अडकल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. शुक्रवारी (१८ जुलै) अधिकाऱ्यांनी माहिती दिली की, रांचीमध्ये असणार्या पिस्का मोड भागात ही दुर्घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या दुर्घटनेत एकाचा मृत्यू झाला आहे. आणखी एक जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती आहे. अडकलेल्या व्यक्तीला शोधण्यासाठी आणि सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी सध्या बचाव कार्य सुरू आहे. सहायक पोलिस उपनिरीक्षक (एएसआय) चंदू ओरांव म्हणाले, ''भिंत कोसळली तेव्हा खांब नसलेल्या भिंतीजवळ मुले आणि वृद्ध होते. या दुर्घटनेत दोन जण जखमी झाले आहेत आणि त्यांना उपचारासाठी पाठवण्यात आले आहे. एक जण ढिगाऱ्याखाली अडकल्याले त्या व्यक्तीचा मृत्यू झाला,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.सुखदेव नगर पोलिस स्टेशनचे प्रभारी मनोज कुमार यांनी पीटीआयला माहिती दिली की, एक वृद्ध व्यक्तीशाळेच्या व्हरांड्यात झोपला होता आणि त्याचदरम्यान छताचा भाग कोसळला. अधिकाऱ्यांनी या घटनेचा तपास सुरू केला आहे.

# भारतीय नौदलात दाखल होणार 'निस्तार'; ड्रॅगनवर असणार करडी नजर

**नवी दिल्ली, दि.१८** वृत्तसंस्था



भारतीय नौसेनेच्या स्वदेशी क्षमतांना अधिक बळकटी देणारा एक ऐतिहासिक क्षण १८ जुलै रोजी घडणार आहे. विशाखापट्टणममध्ये भारतीय नौदलात पहिल्यांदाच विकसित करण्यात आलेल्या निस्तार या डायव्हिंग सपोर्ट वेसलला अधिकृतपणे नौदलात समाविष्ट करण्यात येणार आहे. हिंदुस्तान शिपयार्ड लिमिटेडच्या विशाखापट्टणम यार्डमध्ये तयार करण्यात आलेल्या या जहाजामुळे भारताच्या सागरी सुरक्षा क्षमतेत मोठी भर पडणार आहे.
'निस्तार' हे नाव संस्कृत शब्दातून घेतले असून त्याचा अर्थ ''मुक्ती'', ''बचाव'' किंवा ''मोक्ष'' आहे. हे जहाज खोल समुद्रात पनडुब्यांवरील आपत्कालीन परिस्थितींमध्ये मदत करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. भारताच्या आत्मनिर्भर संरक्षण धोरणाच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. निस्तार हे जहाज गडद समुद्रात ६० दिवसांपेक्षा अधिक काळ तळाशी काम करण्यास सक्षम असून, ते विशेषतः पनडुब्बी बचाव मोहिमांमध्ये निर्णायक भूमिका बजावणार आहे. हे जहाज 'डीप सबमर्जन्स रेस्क्यू वेसल' साठी मदरशिप म्हणून काम करेल, ज्यामुळे खोल समुद्रात अडकलेल्या नौसैनिकांना बाहेर काढणे शक्य होईल.या जहाजाची रचना अत्याधुनिक गोताखोरी उपकरणांनी युक्त असून, यामध्ये एक प्रगत डाइविंग कॉम्प्लेक्सही बसवण्यात आलेला आहे. निस्तारचे वजन सुमारे १०,५०० टन असून, याची लांबी सुमारे १२० मीटर आणि रुंदी २० मीटर इतकी आहे. हे जहाज ३०० मीटर खोल समुद्रात सॅचुरेशन डाइविंग करण्यास पूर्ण सक्षम आहे. यामध्ये ७५ मीटर पर्यंत डाइविंगसाठी स्वतंत्र साइड डाइविंग स्टेज देखील आहे. निस्तारमध्ये पाण्यातील बचाव कार्यांसाठी 'रिमोटली ऑपरेटेड व्हेईकल' , साइड स्कॅन सोनार, आणि १५ टन क्षमतेची सबसी क्रेन यांसारखी उपकरणे बसवण्यात आली आहेत. यामुळे जलतळाशी तपासणी, वस्तूंची शोध मोहीम आणि बचावकार्य अधिक अचूक आणि परिणामकारक होणार आहे. विशेष म्हणजे या जहाजावर हेलिकॉप्टर लँडिंगचीही सुविधा उपलब्ध आहे, जी कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसादासाठी उपयुक्त ठरणार आहे. निस्तारची नियुक्ती भारतीय नौदलाच्या पूर्वी नौसेना कमांडमध्ये करण्यात येणार आहे. या विभागात हे जहाज खोल समुद्रात डाइविंग आणि पनडुब्बी बचाव कार्यांमध्ये सक्रिय भूमिका बजावेल.गेल्या काही वर्षांमध्ये हिंद महासागरात चिनी पनडुब्ब्यांच्या वाढत्या हालचालींमुळे भारतासाठी नवी सुरक्षा चिंता निर्माण झाली आहे. अशा पार्श्वभूमीवर निस्तारसारखे स्वदेशी जहाज 'ड्रॅगन'वर नजर ठेवण्यासाठी एक महत्त्वाचा सागरी प्रहरी ठरणार आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

## थोडक्यात



### मच्छी विक्रेत्यांचे रस्त्यावर अतिक्रमण

**आर्णी :** येथील दत्त मंदिराजवळ मच्छी विक्रेत्यांनी रस्त्यावरच आपली दुकाने थाटली असून, त्यामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. नगर परिषद प्रशासनाच्या या अक्षम्य दुर्लक्षामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात मच्छी मार्केटसाठी जागा दिलेली असतानाही, काही विक्रेत्यांनी दत्त मंदिराजवळील रस्त्यावर अतिक्रमण केले आहे. मंदिरात येणाऱ्या भाविकांना आणि नागरिकांना या घाणीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे परिसरात रोगराई पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. नगर परिषदेने या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन, अतिक्रमण करणाऱ्या विक्रेत्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिक करत आहेत. प्रशासनाच्या या उदासीनतेवर नागरिकांमध्ये चांगलाच संताप पाहायला मिळत आहे.



### दाते डी.एड. महाविद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी

**यवतमाळ :** येथील दाते डी.एड. महाविद्यालयात गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी गुरु-शिष्य परंपरेचे महत्व विषद करत, भविष्यातील शिक्षकांनी हे नाते शुद्ध भावनेने जपावे, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर श्रीकांत पर्बत होते. त्यांनी आपल्या भाषणात प्राचीन काळातील उदाहरणे देत, गुरु-शिष्य नात्याला शोभेल असे वर्तन करण्याचे आवाहन केले. प्रमुख वक्त्या, प्राध्यापिका डॉ. नीता देवतळे यांनी बदलत्या काळात गुरु-शिष्य नात्यात आलेल्या अंतरावर भाष्य केले. कार्यक्रमाची सुरुवात पसायदानाने झाली. मानसी पेंदोर, वर्षा भड, कल्याणी होले या विद्यार्थिनींनीही आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी मेश्राम यांनी केले, तर प्रास्ताविक साक्षी गेडाम आणि आभार प्रदर्शन आचल उबाड यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



### शालेय साहित्याचे वाटप

**यवतमाळ :** येथील राजमुद्रा प्रतिष्ठान आणि नितीन मिर्झापूरे मित्रपरिवारातर्फे, ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी हातभार लावण्यात आला. बेलोरा आणि मंगरूळ येथील जिल्हा परिषद शाळांमधील एकूण ६० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत, विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या, पेन, पेन्सिल यांसारखे आवश्यक साहित्य देण्यात आले. 'ग्रामीण विद्यार्थ्यांना योग्य साधने मिळाल्यास, ते उज्ज्वल भविष्य घडवू शकतात. याच उद्देशाने हा उपक्रम राबवला जात आहे,' असे मत प्रतिष्ठानचे संस्थापक नितीन मिर्झापूरे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला बेलोरा येथे शिक्षक नरेश महात्मे, विद्या तोडसाम, तर मंगरूळ येथे कल्याणी मादेशवार, रवींद्र पद्मावार यांची उपस्थिती होती. प्रवीण गुघाणे, ईश्वर दळवी, कृष्णा शेंडगे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. या उपक्रमाचे विद्यार्थी आणि पालकांनी कौतुक केले.

### क्रीडा स्पर्धेत आता सीबीएसई, नवोदयच्या विद्यार्थ्यांनाही संधी

**यवतमाळ :** जिल्ह्यातील सीबीएसई, नवोदय विद्यालय, विद्याभारती यांसारख्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मंडळांच्या शाळामधील विद्यार्थ्यांना आता क्रीडा विभागातर्फे आयोजित स्पर्धांमध्ये सहभागी होता येणार आहे. या निर्णयामुळे या मंडळांच्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. भारतीय शालेय खेळ महासंघातर्फे आयोजित जिल्हा ते राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये, आतापर्यंत या विद्यार्थ्यांना सहभागी होता येत नव्हते. मात्र, शासनाच्या नव्या भूमिकेनुसार, आता हे खेळाडू त्यांच्या शैक्षणिक मंडळाच्या किंवा क्रीडा विभागाच्या, यापैकी कोणत्याही एका स्पर्धेत सहभागी होऊ शकतील. या स्पर्धांतील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय सेवेत ५ टक्के आरक्षण आणि शिष्यवृत्तीचा लाभ मिळतो. त्यामुळे, हा निर्णय विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी महत्वाचा ठरणार आहे. मात्र, दोन्ही ठिकाणी सहभागी झाल्याचे आढळल्यास, संबंधित शाळा आणि विद्यार्थ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशारा जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड यांनी दिला आहे. त्यांनी जिल्ह्यातील सर्व शाळा, खेळाडू आणि क्रीडाप्रेमींना याची नोंद घेण्याचे आवाहन केले आहे.

# सहस्त्रकुंड जलविद्युतला 'ग्रीन सिग्नल'

## विदर्भ-मराठवाड्याच्या विकासाला मिळणार गती; आमदार किसनराव वानखेडे यांच्या मागणीला यश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ संभाजी भोयर





**उमरखेड, दि.१८:** विदर्भ आणि मराठवाड्यातील पाच तालुक्यांसाठी 'संजीवनी'ठरणाऱ्या, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पाचा मार्ग आता मोकळा झाला आहे. उमरखेडचे आमदार किसनराव वानखेडे यांनी विधानसभेत ही मागणी लावून धरल्यानंतर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाला सकारात्मकता दर्शवत, प्रशासनाला तातडीने कारवाईचे आदेश दिले आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

राज्याच्या पावसाळी अधिवेशनात, आमदार किसनराव वानखेडे यांनी लक्षवेधीद्वारे, उमरखेड, महागाव, किनवट, हिमायतनगर आणि माहूर या पाच तालुक्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या प्रकल्पाचा मुद्दा उपस्थित केला. हा प्रकल्प झाल्यास, ३५ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येईल आणि २५ मेगावॉट वीज निर्माण होईल, असे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. हा प्रकल्प २००९ सालीच प्रस्तावित होता, मात्र स्थानिक विरोधामुळेतत्कालीन सरकारने तो बाजूला ठेवला होता. आमदार वानखेडे आणि भाजपचे नेते नितीन भुतडा यांनी, या प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन तो पुन्हा सुरू करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली होती. या मागणीची दखल घेत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाला 'हिरवी झेंडी' दाखवली असून, जलसंपदा सचिवांना तातडीने पुढील कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे, या पाच तालुक्यांमधील सिंचन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

### असा आहे महत्त्वाकांक्षी 'सहस्त्रकुंड' प्रकल्प

**पैनगंगा नदीवर प्रस्तावित असलेला हा एक बहूद्देशीय प्रकल्प आहे. यामुळे, विदर्भ आणि मराठवाड्याच्या सीमेवरील तब्बल ३५ हजार हेक्टर कोरडवाहू जमीन सिंचनाखाली येणार आहे. यासोबतच, या प्रकल्पातून २५ मेगावॉट जलविद्युत निर्मितीचेही उद्दिष्ट आहे. त्यामुळे, सिंचनासोबतच विजेचा प्रश्न सोडवण्यासाठीही या प्रकल्पाची मोठी मदत होणार आहे.**

### या पाच तालुक्यांना फायदा

**या प्रकल्पाचा फायदा विदर्भ आणि मराठवाडा या दोन्ही विभागांतील पाच तालुक्यांना होणार आहे. यात, यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड आणि महागाव, तर नांदेड जिल्ह्यातील किनवट, हिमायतनगर आणि माहूर या तालुक्यांचा समावेश आहे. या तालुक्यांमधील पिण्याच्या पाण्याचा आणि सिंचनाचा गंभीर प्रश्न, या एका प्रकल्पामुळे कायमचा सुटण्यास मोठी मदत होणार आहे.**

# प्राध्यापक कपिल जगताप यांना पीएचडी प्रदान



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**राळेगाव, दि. १८ :** येथील इंदिरा गांधी कला महाविद्यालयाचे प्राध्यापक कपिल जगताप यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने 'नॅनो कॉम्पोसिट्स'मधील संशोधनासाठी पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

'इलेक्ट्रोकेमिकल सुपरकॅपॅसिटर' साठी 'नॅनो कॉम्पोसिट्स'च्या निर्मितीवर त्यांनी आपला शोधप्रबंध सादर केला. या महत्त्वपूर्ण संशोधनासाठी त्यांना डॉक्टर राजेश बर्डे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे हे संशोधन भविष्यातील संशोधकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. संस्थेचे अध्यक्ष तथा माजी शिक्षणमंत्री वसंतराव पुरके यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच, प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, मित्रपरिवार आणि विद्यार्थ्यांनीही त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशामुळे तालुक्याच्या शैक्षणिक वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे.

# कलाल-कलार समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करा

## जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना दिले निवेदन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १८ :** राज्यातील कलाल-कलार समाजासाठी स्वतंत्र 'सहस्त्रबाहू अर्जुन आर्थिक विकास महामंडळ' स्थापन करावे, या मागणीने आता जोर धरला आहे. या संदर्भात कलाल समाज संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांर्फत मुख्यमंत्र्यांना पुन्हा निवेदन सादर केले आहे.

राज्यात कलाल-कलार समाजाची लोकसंख्या ६५ ते ७० लाख असूनही, शासन या समाजाकडे दुर्लक्ष करत आहे, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. समाजाची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळाची गरज आहे. यापूर्वी मागणी करूनही शासनाने गांभीर्याने दखल घेतली नाही. आता या मागणीसाठी तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही दिला आहे. निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात नितीन मेश्राम, नितीन उके, डॉक्टर गणेश नाईक, विलास मेश्राम, योगेश मेश्राम यांच्यासमवेत समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहकार पुरस्कारांसाठी मुदतवाढ

**यवतमाळ, दि. १८ :** राज्यातील सहकारी संस्थांसाठी राज्य शासनाच्या सहकार पुरस्कारांकरिता अर्ज सादर करण्यास ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सहकार चळवळीत उत्कृष्ट योगदान देणाऱ्या संस्थांना हे पुरस्कार दिले जातात. यामध्ये सहकार महर्षी, सहकार भूषण आणि सहकार निष्ठ अशा तीन प्रकारांत एकूण ४५ पुरस्कारांचा समावेश आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील कामगिरीच्या आधारावर ही निवड होईल. जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत सहकारी संस्थांनी आपले प्रस्ताव संबंधित तालुका सहायक निबंधक कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी केले आहे.

# अतिक्रमण काढण्यासाठी नागरिकांचे उपोषण

## माजी नगराध्यक्ष आरीज बेग यांची भेट, आश्वासने मिळूनही कारवाई नाही

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**आर्णी, दि. १८ :** शहरातील विविध ले-आऊटमधील रस्ते अतिक्रमणामुळे बंद झाल्याने, संतप्त नागरिकांनी, विशेषतः महिलांनी, अखेर उपोषणाचे अस्त्र उगारले आहे. वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासन कारवाई करत नसल्याने, नागरिकांनी न्यायासाठी आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषण मंडपाला आर्णीचे माजी नगराध्यक्ष आरीज बेग यांनी भेट देऊन, नागरिकांच्या संघर्षाला पाठिंबा दिला.

गोडवे ले-आऊट, चिंतावार ले-आऊट, ग्रीन पार्क आणि सिसोदिया ले-आऊटमधील अंतर्गत रस्ते काही लोकांनी अतिक्रमण करून अडवले आहेत. यामुळे परिसरातील नागरिकांना, विशेषतः महिला आणि विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याविरोधात प्रशासनाकडे अनेकदा निवेदने देऊन आणि मोर्चा काढूनही, कोणतीही कारवाई न झाल्याने अखेर नागरिकांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला. यावेळी, आरीज बेग यांनी उपोषणकर्त्यांशी संवाद साधून, त्यांची व्यथा जाणून घेतली. त्यांनी थेट उपोषण स्थळावरूनच तहसीलदार वैशाख वाहूरवाघ, मुख्याधिकारी रवींद्र राऊत आणि भूमीअभिलेख अधिकारी रमेश हेमके यांच्याशी संपर्क साधून, नागरिकांच्या भावना लक्षात आणून दिल्या आणि तातडीने अतिक्रमण काढण्याची विनंती केली. अधिकाऱ्यांनी यावर सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे समजते. तसेच, मार्गात अडथळा ठरणारे वीज रोहित्र (डीपी) स्थलांतरित करण्याबाबतही त्यांनी विद्युत विभागाचे अधीक्षक अभियंता दरोळी यांच्याशी चर्चा केली. 'न्याय मिळेपर्यंत मी तुमच्या संघर्षात सोबत राहीन,' असे आश्वासन बेग यांनी यावेळी दिले.

# स्वच्छ सर्वेक्षणात घाटंजी नगरपरिषद अव्वल

## प्रशासक राजू घोडके यांच्या नेतृत्वात टीम वर्कला मोठे यश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. १८ :** केंद्र शासनाच्या 'स्वच्छ भारत अभियान २.०' अंतर्गत झालेल्या 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' स्पर्धेत, घाटंजी नगरपरिषदेने उज्ज्वल यश संपादन केले आहे. नगरपरिषदेने यवतमाळ जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला असून, अमरावती विभागात (२०,००० ते ५०००० लोकसंख्या गटात) तिसरा क्रमांक मिळवला आहे. यासोबतच, देशात ७२ वा आणि राज्यात ५१ वा क्रमांक मिळवून, घाटंजीने स्वच्छतेच्या राष्ट्रीय नकाशावर आपले नाव कोरले आहे.

या स्पर्धेत 'कचरा मुक्त शहर', 'हागणदारी मुक्त शहर' आणि स्वच्छ सर्वेक्षण रँकिंग यांसारख्या घटकांचे मूल्यांकन केले जाते. यासाठी नगरपरिषदेने २०२४ पासूनच कचराकुंडी मुक्त शहर, सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता, वृक्षारोपण आणि व्यापक जनजागृती यांसारखे उपक्रम हाती घेतले होते. याच पूर्वतयारीचे फळ म्हणून, नगरपरिषदेला शासनाच्या ॠऋउ रँकिंगमध्ये 'वन स्टार' मानांकन आणि जऊॠ++ दर्जा कायम राखण्यात यश आले. या स्पर्धेत एकूण १२,५०० गुणांपैकी, घाटंजी नगरपरिषदेने ९३८४ गुण प्राप्त केले. या यशासाठी, मुख्याधिकारी तथा प्रशासक राजू घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली, पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता ज्ञानेश्वर घरडे, नगर अभियंता रॉजर नारणकर, शहर समन्वयक नवीन देशट्टीवार, आरोग्य जमादार बाळासाहेब भोयर, स्वप्नील ढेकणे, कंत्राटदार संस्थेचे अमीत प्रधान, गोलुभाऊ फुसे, अमोल गोडे, अमन पाटणकर, प्रफुल खोब्रागडे, रुपेश बावरु आणि सर्व सफाई कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या या सांघिक कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### मानांकनाने वाढविला गौरव

**या स्पर्धेतील यशासोबतच, घाटंजी नगरपरिषदेने शासनाच्या 'जीएफसी' (गार्बेज फ्री सिटी) रँकिंगमध्ये 'वन स्टार' मानांकन मिळवले आहे. तसेच, 'ओडीएफ++' (हागणदारी मुक्त शहर - प्लस प्लस) दर्जाही कायम राखला आहे. यामुळे, घाटंजी शहराने स्वच्छतेच्या बाबतीत आपली गुणवत्ता आणि सातत्य सिद्ध केले आहे.**

# राळेगाव तालुक्यातील ग्रामपंचायतींवर 'महिला राज'

## ४७ पैकी २५ सरपंचपद महिलांसाठी राखीव, अनेकांची स्वप्ने भंग पावली, तर काहींना मिळाली संधी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**राळेगाव, दि. १८ : तालुक्यातील ४७ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत शुक्रवारी (दि. १८) जाहीर झाली. यात, तब्बल २५ गावांचे सरपंचपद महिलांसाठी राखीव झाल्याने, तालुक्याच्या राजकारणात 'महिला राज' येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या सोडतीमुळे, अनेक इच्छुकांची राजकीय समीकरणे बिघडली असून, गावागावांत आता नव्या घडामोडींना वेग आला आहे.**



राळेगाव तहसील कार्यालयाच्या सभागृहात, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील आणि तहसीलदार अमित भोईटे यांच्या उपस्थितीत ही आरक्षण सोडत पार पडली. या सोडतीत, अनुसूचित जातीसाठी ३ (२ महिला), अनुसूचित जमातीसाठी ७ (४ महिला), नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी (ओबीसी) १३ (७ महिला) आणि सर्वसाधारण (खुला) गटासाठी २४ (१२ महिला) जागा निश्चित करण्यात आल्या. यामुळे, एकूण ४७ पैकी २५ ग्रामपंचायतींवर महिलांचे वर्चस्व राहणार आहे. या सोडतीनंतर, अनेक गावांमध्ये राजकीय वातावरण तापले आहे. काही ठिकाणी किरकोळ बदल झाले असले, तरी अनेक प्रमुख गावांमध्ये मोठे फेरबदल झाले आहेत. त्यामुळे, अनेक वर्षांपासून सरपंचपदाची तयारी करणाऱ्या इच्छुकांचा हिरमोड झाला आहे. आता, सर्वच राजकीय पक्ष या बदललेल्या समीकरणांनुसार आपली नवी रणनीती आखण्यात गुंतले आहेत. या सोडतीला तालुक्यातील नागरिक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### 'या' आहेत प्रमुख राखीव ग्रामपंचायती

**या सोडतीत, वडकी (अनु. जाती महिला), वनोजा (अनु. जाती), रावेरी (अनु. जाती महीला), शेभर (अनु. जमाती महीला), वालधूर (अनु. जमाती), टाकळी (अनु. जमाती), तर झाडगाव, अंतरगाव, चिखली (व), पिंपरी (सा), श्रीरामपूर, मंगी आणि उंदरी या ग्रामपंचायती नागरिकांच्या मागास प्रवर्गातील (ओबीसी) महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. या आरक्षणामुळे, या गावांमध्ये आता नवीन महिला नेतृत्व उदयास येण्याची संधी निर्माण झाली आहे.**

### ५० टक्क्यांहून अधिक गावांवर 'महिला राज'

**या आरक्षण सोडतीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, महिलांना मिळालेले मोठे प्रतिनिधित्व. राळेगाव तालुक्यातील एकूण ४७ ग्रामपंचायतींपैकी, तब्बल २५ गावांचे सरपंचपद महिलांसाठी राखीव झाले आहे. हे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. यामुळे, गावाच्या कारभारात आणि विकासात महिलांचा दबदबा वाढणार असून, त्यांच्या नेतृत्वाला एक मोठी संधी मिळणार आहे, जी एक अत्यंत सकारात्मक बाब मानली जात आहे.**

## थोडक्यात

### मंगरूळपीर तालुक्यात शेतकरी पीक डवरणीत व्यस्त



**मंगरूळपीर :** यंदाच्या रोहिणी, मृग नक्षत्र व त्या नंतरच्या आर्द्रा, पुनर्वसु व पुष्य नक्षत्रात अधूनमधून झालेल्या रिमझिम पावसाने काही भागातील पिकांना आधार दिला असला तरी उर्वरीत वीस टक्के भागातील शेतकरी पेरणीत व्यस्त असून मागील बारा दिवसापासून झालेल्या रिमझिम पावसामुळे सोयाबीन, मुग, उडीद, तुर आदी पिकांवर गोगलगाय व पाने कुरतुडणाऱ्या अळ्याचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकरी सध्या औषध फवारणी व कोळपणीच्या काम व्यस्त आहेत.

### शेलुबाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात क्षयरुग्णांची तपासणी



**शेलुबाजार :** येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे संशयित क्षयरुग्नाचे तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये डिजिटल मशीनद्वारे संशयित क्षयरुग्णाचे एक्स रे काढण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पांडुरंग ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ कावरखे जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ परभणकर जिल्हा हिवताप अधिकारी डॉ बेले तालुका आरोग्य अधिकारी डॉ धनश्री जाधव,वैद्यकीय अधिकारी डॉ कविता यादव,डॉ देवकी सोमभोयर यांचे मार्गदर्शनाखाली फार्मसी ऑफिसर रविंद्र दाभाडकर, पवार मोहाडे,आरोग्य सहाय्य्क वानखडे, गोपणारायण ,आरोग्य सेवक पवार इ्याटे,मुळे , संतोष बल्हाळ गटप्रवर्तक मोडक भगत मच्छिन्द्र मदने,गणेश राऊत, परिचर मनिष जाधव ,बायस्कार, गव्हाणे तसेच आशा सेविका यांची उपस्थिती होती.

### माँ सती आई वारकरी शिक्षण संस्थेचे उद्घाटन



**शेलूबाजार :** शेलूबाजार येथे अध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्थेचे उद्घाटन मंगरूळपीर वाशिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्याम भाऊ खोडे यांच्या हस्ते करण्यात आले. सोनू तट्टू यांनी इंटरनेटच्या या युगात मुलावर अध्यात्मिक संस्कार व्हावे म्हणून माँ सती आई अध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्था सुरू केली आहे. कार्यक्रमाला बालू मुरकुटे, विनोद जाधव. रवि लांभाडे, अनिल काटकर, दिगंबर खोरणे, महादेव लांभाडे, रवी बारड आदिंची उपस्थित होते.

### गावगुंडावर एमपीडीएची कारवाई: वर्षभरासाठी जेलमध्ये

**वाशिम :** पंचशील नगर येथील रहिवासी आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीचा गावगुंड म्हणून ओळखला जाणारा अब्दुल साजिद ऊर्फ शाहरुख अब्दुल माजीद याच्यावर एमपीडीए (महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ डेंजरस ॲक्टीव्हिटीज) अंतर्गत कारवाई करत जिल्हा प्रशासनाने त्याला एक वर्षासाठी कारागृहात डांबले आहे, अशी माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयाकडून १६ जुलै रोजी प्राप्त झाली. अब्दुल साजिदवर गंभीर स्वरूपाची दुखापत करणे, चोरी, जबरीचोरी करण्यासह जवळ अनधिकृत शस्त्र बाळगणे, आदी स्वरूपातील अनेक गुन्हे दाखल आहेत. तो २०२० पासून पोलिसांच्या रडारवर होता. त्याच्या वाढत्या गुन्हेगारी कारवायांमुळे स्थानिक नागरिक भयभीत होते. ही बाब लक्षात घेऊन त्यास तडीपार करण्यात आले होते, तरीही त्याने गुन्हेगारी मात्र थांबवली नाही. या पार्श्वभूमीवर १५ जुलै रोजी एमपीडीए - अंतर्गत आदेश पारित करून त्यास येरवडा (पुणे) येथील कारागृहात पाठवण्यात आले.

# वाशिमच्या आमदाराला 'कोल्हापुरी तडका'

## कोल्हापूरचे आमदार क्षीरसागर (शिवसेना) यांनी मांडला वाशिमचा प्रश्न

। धनंजय कपाले ।

**वाशिम, दि. १८ :** मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात कोल्हापूर उत्तर येथील आमदार राजेश क्षीरसागर यांनी वाशिम शहरातील गुन्हेगारीबद्दल प्रश्न तारांकित करून वाशिम जिल्ह्यातील नागरिकांची मने जिंकली. तर दुसरीकडे वाशिम येथील गुन्हेगारी बद्दलचा ज्वलंत प्रश्न वाशिमच्या आमदारांनी का उपस्थित केला नाही. असा प्रश्न नागरिक करत आहेत.

वाशिम शहरातील गुरुवार बाजार परिसरात वास्तव्यास असलेले दिलीप आप्पा काष्टे यांचे गॅरेज मधील वाहनांना अज्ञात इसमाने आग लावून लाखो रुपयांचे नुकसान केले होते. या अगोदर गेल्या सहा महिन्यात आणखी काही मोठमोठे क्राईम घडले होते. या सर्व वाशिम शहरातील आणि जिल्ह्यातील गुन्हेगारी विश्वातील संवेदनशील असलेल्या घटनांचा अद्यापही पोलिसांनी तपास लावला नाही.



श्री. राजेश विनायकराव क्षीरसागर

याबद्दल कोल्हापूर उत्तर येथील शिवसेनेचे आमदार राजेश क्षीरसागर यांनी पावसाळी अधिवेशनात हा प्रश्न तारांकित केला. आमदार क्षीरसागर यांनी सभापती महोदयांना वाशिम जिल्ह्यातील गुन्हेगारी विश्वाबद्दल सांगत असताना पोलिसांच्या तपास यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले. पोलिसांच्या या संथ गती तपासावर त्यांनी प्रचंड नाराजी व्यक्त करत वाशिम जिल्ह्यातील गुन्हेगारीचा तपास लवकर करावा आणि अन्यायग्रस्तांना न्याय मिळण्याचे हेतूने प्रशासनाने तात्काळ पावले उचलावी अशी विनंती त्यांनी सभापती यांचेकडे केली.

या सर्व घटनाक्रमाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. सोशल मीडिया वरती मजेशीर गमतीशीर असे कमेंट्स बघायला मिळत आहेत. काही लोकांच्या मते वाशिम च्या जनतेने कोल्हापूरच्या आमदाराला यापुढे मतदान करावे तेच आपल्याला न्याय देऊ शकतात अशी मिश्किल उडवून अशा पिकवला. काहींनी म्हटले की कोल्हापूरच्या आमदारांना वाशिम ची काळजी आहे तर वाशिमचे आमदारांना स्वतःच्या मतदारसंघातील काळजी का नाही असाही प्रश्न उपस्थित केला गेला. थोडक्यात गुन्हेगारी विश्वातील संवेदनशील घटनेचा वाशिम च्या आमदार महोदयांनी अधिवेशनात प्रश्न मांडायला पाहिजे होता अशा प्रतिक्रिया सोशल मीडिया वरती बघायला मिळाल्या.

अशीच काहीशी साम्य असणारी दुसरी घटना रिसोड मालेगाव मतदारसंघांमध्ये घडली. रिसोड मालेगाव मतदार संघातील रस्ते आणि पुलांची अवस्था कशी आहे. याबद्दलचा प्रश्न याच पावसाळी अधिवेशनामध्ये आमदार अमोल मिटकरी यांनी मांडला. हाच प्रश्न रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित झनक यांनी का मानला नाही अशा प्रतिक्रिया सोशल मीडियावर उमटत होत्या. त्यामुळे रिसोड मालेगाव ची चिंता ही जर का अकोला येथील अमोल मिटकरी यांना आहे तर मग आमच्या आमदारांना स्वतःच्या मतदार संघातील काळजी का नाही. असा प्रश्न जनता सोशल मीडियाद्वारे थेट आमदारांना विचारत आहे.

एकूणच वाशिम वाशिम जिल्ह्यातील लोकांच्या मनातील संवेदनशीलपणा हा कोल्हापूरच्या आमदारांना आणि अकोला येथील आमदारांना कळू शकते तर स्थानिक आमदारांना का करू शकत नाही असा संतप्त सवाल मतदार विचारत आहेत.

> कोल्हापूर येथील शिवसेनेचे आमदार राजेश क्षीरसागर यांनी माझ्या गॅरेजवर झालेल्या घटनेचा सर्व वृत्तांत पावसाळी अधिवेशनात मांडून पोलिसांच्या तपास यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले. कोल्हापूर येथील आमदार साहेबांनी वाशिम शहरातील जनतेच्या भावना थेट अधिवेशनात मांडल्या ही बाब निश्चितच वाशिमकरांसाठी अभिमानास्पद आहे. वाशिम येथील प्रश्न स्थानिक आमदारांनी सुद्धा मांडावे अशी सर्व जनतेच्या वतीने माजी सुद्धा इच्छा आहे.
>
> **- दिलीप काष्टे,** शिवसैनिक, वाशिम

# हुमणी अळीच्या आक्रमणामुळे सोयाबीन पीक धोक्यात..!

## पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**रिसोड, दि. १८ :** खरिपातील शेतक-याचे सोयाबीन हे प्रमुख पीक आहे. सध्या या पिकावर हुमणी अळीचा प्रादृर्भाव प्रचंड मोठ्या प्रमाणात आढळून आला आहे. जिल्ह्यातीलअनेक गावातील शेतकऱ्यांची सोयाबीन पिक या अळीमुळे धोक्यात आले असून शेतकरी हवालदिल झाला आहे. उगवून आलेले सोयाबीन पिक संकटात सापडले आहे त्यामुळे अनेकांवर दुबार पेरणीची वेळ आली आहे. सरकारने नुसकानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपपाईसह दुबार पेरणीसाठी मदत करावी, अशी मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने वाशिम जिल्हा कृषी अधीक्षक यांच्याकडे करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील सोयाबीनचा पेरा सर्वाधिक असून सोयाबीन हेच प्रमुख या जिल्ह्यात आहे. शेतकऱ्यांची नगदी पीक म्हणून या पिकाकडे पाहिले जाते परंतु हुमणी अळीच्या आक्रमणामुळे सध्या सोयाबीन पीक धोक्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्वच सर्वत्र शेतांमध्ये



या अळीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. हुमणी कीड हि बहुभक्षी असून तिच्या प्रादुर्भावामुळे झाडांची पाने पिवळी पडत आहे. तर काही शेतात मोठ्या प्रमाणात झाडे सुकताना दिसत आहे. झाडे उपटून तपसल्यास त्यांची मुळे कुरतडलेली दिसतात. तसेच झाडाच्या मुळांजवळ २-३ इंच खोलीवर अळ्या आढळून येत असल्याने प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. महागड्या औषधांची फवारणी करूनही या अळीचा प्रादुर्भाव आटोक्यात येत नसल्याचे दिसून येत आहे. शेतकर्यांनी अगोदरच विविध बँकांचे कर्ज घेऊन पेरणी केली आहे.त्यात उशिरा आलेला पाऊस, दुबार पेरणीचे संकट आणि आता पिकांवर विविध रोगासह हुमणी अळीचा प्रादुर्भाव यामुळे शेतकऱ्याचे सोयाबीन पिक पूर्णपुणे उध्वस्त होण्याच्या मार्गावर असल्याने शेतकरी संकटात सापडले आहे. शेतकऱ्याचा यावर्षीचा खरीप हंगाम वाया जाण्याची शक्यता निर्माण झाल्याने शेतकरी मोठ्या प्रमाणात अडचणीत सापडला आहे. त्यामुळे कृषी विभागामार्फत पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी तसेच दुबार पेरणीसाठी आर्थिक मदत करावी अशी मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. निवेदन देताना क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी मोरे, व युवा जिल्हाध्यक्ष सतीश इढोळे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# खात्यात पैसे पाठविल्याचे सांगून १८ हजाराने लुबाडले

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. १८ :** तुमच्या घरच्यांनी पैसे पाठवायला सांगीतले होते . पण चुकुन जास्तीचे पैसे तुमच्या खात्यात पाठवण्यात आले. त्यामुळे ते परत करा. असे एका आलेल्या अज्ञाताच्या कॉलवरुन सांगीतल्याने मंगरुळपीर शहरातील मठ मोहल्ला कांरजा रोड मंगरुळपीर जि.वाशिम येथील एका महिलेने त्या व्यक्तिच्या खात्यात पैसे पाठवले अशाप्रकारे फसवणुक झाल्याची फिर्याद मंगरुळपीर पो.स्टे.आणी सायबर सेल वाशिमकडे दाखल केली आहे.

सविस्तर वृत्त असे की,मंगरुळपीर येथील एका महिलेला दि.१५ रोजी दुपारी १ वाजून १.३३ मिनीटांनी नामे अनिल शर्मा मोबाईल क्रंमोक ९२५१०६०६४२ या नंबर वरून दोन वेळा मिस्कॉल येवुन मी तिस-यादा फोन उचलला तर समोरील अज्ञान व्यक्तीनी त्या फिर्यादी महिलेला सांगीतले की, तुमच्या पतीने मला रुपये १२,००० बारा हजार रुपये तुमचे खात्यात टाकावयास सांगीतले असुन मी तुम्हाला रुपये १०,००० दहा हजार रुपये टाकले नंतर म्हणाला की आणखी रुपये २,००० दोन हजार रुपये टाकतो परत फोन करुन म्हणाला की २५,००० पंचवीस हजार रुपये गलतीने तुमचे खात्यात टाकलेले आहे मला फक्त रुपये १२,००० बारा हजार रुपये देणे होते तुम्हाला रक्कम जास्त आली मला शिल्लक रक्कम परत करा हयामुळे मी नंतर मी माझ्या फोन पे व्दारे १८,००० रुपये फोनपे ने मी पंजाब नॅशनल बँक नामे साहीद सो उस्मान फोन पे नंबर ९०९९३८७७१९ हयावर रक्कम टाकली नंतर मला समजले की समोरील अज्ञान इसमाने फ `क मॅसेज आधार घेवुन माझ्याकडुन रक्कम बळकावली आहे व माझी फसवणुक केली आहे.मला समजले की माझी फसवणुक केली आहे .याप्रकरणी योग्य चौकशी सायबर ब्रँच मध्ये करण्यात यावी अशा आशयाची फिर्यात पोलिस स्टेशनला दाखल केली असुन पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# वन्यप्राण्याच्या हैदोसाने खरिपाची कोवळी पिके फस्त



**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**रिसोड, दि. १८ :** तालुक्यातील शेलुखडसे, भरजाहगीर,मोरगव्हान या परिसरात मोठ्यप्रमाणात वणन्यप्राण्या हैदोस घातल्याने रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर आता वन्यप्राण्यांचं मोठं संकट उभं ठाकलं आहे.

सध्या खरीप हंगामातील सोयाबीन,तूर,कपाशी ही पिकं वाढीस लागली असतांना हरीण,निलगायी आणि रान डुक्करांचे मोठं मोठे कळप हजारो हेक्टर वरील ही कोवळी पिकं फस्त करत असून त्यांच्या पायामुळं पिकांची ही मोठ्या प्रमाणात नासाडी होत असल्यानं शेतकऱ्यांचं आर्थिक गणित पूर्णपणे बिघडत आहे.आधीच निसर्गावर अवलंबून असलेला हा शेतकरी वन्य प्राण्यांच्या हैदोसामुळं आणखी अडचणीत सापडला आहे.

वनविभागानं या वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा आणि खरीप पिकांचं होणारं नुकसान थांबवावं अशी मागणी शेलुखडसे येथिल शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

> आम्ही आमच्या शेतात नुकतीच सोयाबीन,तूर आणि कपाशीची पेरणी केली असून हे पीक सद्यस्थितीत कोवळं आहे.हरीण,निलगायी आणि रान डुक्कर हे वन्य प्राणी हेच कोवळं पिकं फस्त करत असल्यानं माझं मोठं नुकसान होत आहे त्यामुळं मला या पिकांमधून अपेक्षित उत्पन्न मिळणार नाही.यासाठी वन विभागानं या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी तसेच वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा.
>
> **- ओम खडसे,** शेतकरी

> खरिपातील सोयाबीन,तुर,हळद या पिकाचे मोठयाप्रमाणत नीलगाय, रानडुक्कर शेती पिकांचे नुकसान करित आहेत वन-विभागाने लक्ष देऊन या प्राण्याचा बंदोबस्त करावा व झालेल्या पिकांचे पंचनामे करून शेतक-याला अर्थिक मदत करावी
>
> **- रेनुका भानदास ताकतोडे**
> सरपंच, शेलुखडसे

# मिरचीचा कंटेनर: रिसोडहून श्रीलंकेत निर्यात

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**रिसोड, दि. १८ :** जिथे बहुसंख्य तरुण आपलं शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या शोधात असतात, तिथे रिसोड तालुक्यातील भोकरखेडा येथील आपल्या वडिलांच्या मार्गदर्शनाखाली एका ध्येयवेड्या तरुणाने अवघ्या काही वर्षांतच उद्योजक म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे. निखिल सुभाष रंजवे याने, अगदी कमी वयातच, विठ्ठल कृपा इंटरनॅशनल इम्पोर्ट अँड एक्स्पोर्ट या आपल्या कंपनीच्या माध्यमातून लाल मिरचीचा एक भलामोठा कंटेनर थेट श्रीलंकेला निर्यात करून एक नवा आदर्श निर्माण केला आहे. निखिलचे हे यश केवळ त्याच्या वैयक्तिक कर्तृत्वापुरते मर्यादित नाही, तर ते अनेक तरुण उद्योजकांना प्रेरणा देणारे आहे. सामान्यतः आंतरराष्ट्रीय व्यापार आणि निर्यात हे मोठे अनुभव आणि भांडवल असलेल्या कंपन्यांचे क्षेत्र मानले जाते. मात्र, निखिलने आपल्या जिद्द, कठोर परिश्रम आणि योग्य नियोजनाने हे सिद्ध केले आहे की योग्य दृष्टिकोन आणि मेहनतीने कोणत्याही वयात मोठे यश मिळवता येते. या निर्यातीमुळे निखिलच्या विठ्ठल कृपा इंटरनॅशनल इम्पोर्ट अँड एक्स्पोर्ट कंपनीने आंतरराष्ट्रीय बाजारात आपले स्थान निर्माण केले आहे. श्रीलंकेसारख्या देशात भारतीय कृषी उत्पादनांना मोठी मागणी आहे आणि निखिलने ही संधी अचूक हेरली. लाल मिरचीचा कंटेनर यशस्वीपणे श्रीलंकेला पोहोचवणे हे केवळ एका व्यावसायिक कराराची पूर्तता नाही, तर ते आंतरराष्ट्रीय व्यापारामधील अनेक तांत्रिक आणि प्रशासकीय अडथळे पार केल्याचे द्योतक आहे.

> माझा मुलगा निखिल याचा मला अभिमान असून आमची स्वतःची विठ्ठल कृपा इंटरनॅशनल इम्पोर्ट अँड एक्स्पोर्ट ही कंपनी नसून एक परिवार आहे आणि हा परिवार आणि सर्व कुटुंब मिळून चालवतो यामध्ये माझी पत्नी माझा मुलगा आणि मुलगी त्याचं नेहमी सहकार्य असते निखिल हा तरुण आहे. त्यांनी लाल मिरचीचा कंटेनर हा श्रीलंकेला पोहोचून इतर तरुणांना नोकरीच्या मागे न लागता स्वतःच करिअर घडवण्यासाठी अनेक गोष्टी उपलब्ध आहेत त्यामुळे तरुणांना कुठल्याही प्रकारचे मार्गदर्शन लागल्यास मी करायला तयार आहे
>
> **- सुभाष पाटील रंजवे**
> विठ्ठल कृपा इंटरनॅशनल इम्पोर्ट अँड एक्स्पोर्ट कंपनी

> तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता उद्योजकतेचा विचार करणे निश्चितच महत्त्वाचे आहे. हे देशाच्या आर्थिक विकासासाठीही आवश्यक आहे. मात्र, यात असलेले धोके आणि आवश्यक तयारी याबद्दलही त्यांना पूर्ण माहिती असणे गरजेचे आहे. योग्य मार्गदर्शन आणि तयारी असेल, तर अनेक तरुण यशस्वी उद्योजक बनून स्वतःचे आणि समाजाचे भवितव्य घडवू शकतात. मराठा स्नेहसंवर्धन या सामाजिक चळवळीने माझा जो सन्मान केलेला आहे त्या सन्मानामुळे नक्कीच माझी जबाबदारी वाढली भविष्यात मी तरुण कसे उद्योजक बनतील यासाठी प्रयत्नशील राहील त्यामुळे तरुणांनी उधोजक बनावे.
>
> **- निखिल सुभाष रंजवे**
> भोखरखेड ता रिसोड जिल्हा वाशिम

# नैसर्गिक शेतीच्या दिशेने जिल्ह्याची वाटचाल!

## बायोडायनामिक कंपोस्ट स्पर्धा पुरस्कार सोहळा

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १८ :** नैसर्गिक शेती ही केवळ शेतीपद्धती नाही, ती आरोग्य, पर्यावरण आणि आर्थिक समृद्धी यांचा संगम आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीचा अवलंब करावा,व शेतीची नवसंस्कृतीची जपावी असे प्रतिपादन जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी केले.

स्व. संजय रोमन यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आयोजित बायोडायनामिक कंपोस्ट स्पर्धा २०२४-२५ चा पुरस्कार वितरण सोहळा आज जिल्हाधिकारी कार्यालयातील 'राजे वाकाटक सभागृहात' आज दि.१७ जुलै रोजी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. बोलत होत्या. यावेळी जिल्हा कृषी अधीक्षक



आरिफ शहा, सर्ग विकास समितीचे राजेश तिवारी व विनीता शहा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विनीता शहा यांनी यावेळी नैसर्गिक व बायोडायनामिक शेतीतील नाविन्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण करत शेतकऱ्यांना सखोल माहिती दिली.

स्पर्धेमधून निवडलेल्या उत्कृष्ट बायोडायनामिक कंपोस्ट तयार करणाऱ्या शेतकऱ्यांना आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह व रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. या दरम्यान पिक विमा योजनांच्या पत्रकाचे अनावरण देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या पत्रकातून शेतकऱ्यांना विमा योजनांची सविस्तर माहिती मिळणार आहे, अशी माहिती आयोजकांनी दिली.

कार्यक्रमाचे संयोजन प्रेरणादायी वातावरणात पार पडले. नैसर्गिक शेतीच्या दिशेने हा उपक्रम एक सकारात्मक पाऊल ठरल्याचे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले. कार्यक्रमात सर्व विकास समितीचे पदाधिकारी, शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.आभार अभिजीत वंजारे यांनी मानले. कार्यक्रमाचे संपूर्ण संयोजन प्रेरणादायी वातावरणात पार पडले. नैसर्गिक शेतीच्या दिशेने हा उपक्रम एक सकारात्मक आणि मार्गदर्शक पाऊल ठरल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

# सायबर चोरांचा नवीनच फंडा

## मोबाईल चोरीपाठोपाठ बँक खातेही रिकामे, ‘फोन पे’, ‘गुगल पे’ठरताहेत डोकेदुखी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ गणेश खडसे

**यवतमाळ, दि.१८:** यवतमाळ जिल्ह्यात सायबर गुन्हेगारांनी फसवणुकीचा एक नवीन आणि धोकादायक फंडा शोधला आहे. आता, केवळ मोबाईल चोरी होत नाहीत, तर त्या चोरीच्या मोबाईलमधील 'फोन पे', 'गुगल पे' यांसारखे ॲप्स वापरून, थेट बँक खात्यातून पैसे लंपास केले जात आहेत. या नव्या प्रकारामुळे नागरिक धास्तावले असून, सायबर गुन्हे रोखण्यात पोलिस अपयशी ठरत असल्याचा आरोप होत नागरिकांकडून केला जात आहे.

शहरातील आणि तालुक्यातील आठवडी बाजारांसारख्या गर्दीच्या ठिकाणांहून, चोरटे नागरिकांचे मोबाईल चोरतात. त्यानंतर, हे मोबाईल सायबर गुन्हेगारांना कमी किमतीत विकले जातात. हे गुन्हेगार, मोबाईलमधील 'फोन पे', 'गुगल पे' आणि इतर 'यूपीआय' ॲप्सचा वापर करून, पीडित व्यक्तीचे बँक खाते काही मिनिटांतच रिकामे करतात. मोबाईल चोरी झाल्याचे लक्षात येऊन, नागरिक पोलिस ठाण्यात तक्रार करेपर्यंत, मोबाईल ट्रेस होईपर्यंत आणि नवीन सीम कार्ड बदल करेपर्यंत, त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झालेले असते. यवतमाळ, पुसद आणि वणी या शहरांमध्ये, मोबाईल चोरीचे अनेक गुन्हे प्रलंबित आहेत. या नव्या प्रकाराची पोलिसांना माहिती असूनही, ते या चोरांचा सुगावा लावण्यात अपयशी ठरत असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे, गर्दीच्या ठिकाणी जाताना, नागरिकांनी आपल्या मोबाईलची विशेष काळजी घ्यावी आणि आपले बँक खाते सुरक्षित ठेवावे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या वाढत्या गुन्हेगारीमुळे, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

### ॲप्स असतील तर ‘किंमत’, नसतील तर ’भंगार’

या रॅकेटमध्ये, मोबाईलच्या किमतीपेक्षा त्यातील ॲप्सला जास्त महत्त्व आहे. ज्या चोरीच्या मोबाईलमध्ये 'फोन पे', 'गुगल पे' सारखे ॲप्स नसतात, ते मोबाईल भंगारात विकले जातात किंवा फेकून दिले जातात. मात्र, ज्या मोबाईलमध्ये हे ॲप्स आहेत, ते बँक खाते रिकामी होईपर्यंत जपून ठेवले जातात. यावरून, या गुन्ह्याचे स्वरूप किती संघटित आहे, हे स्पष्ट होते.



’सहा महिन्यांपूर्वी माझा मोबाईल आठवडी बाजारातून चोरीला गेला होता. मी तातडीने सायबर सेल आणि पोलिसांत तक्रार दाखल केली. तातडीने सीमही बदलले. परंतु, यूपीआय आयडीवरून चार बँकांच्या खात्यातून ४० हजार रुपये काढण्यात आले. ज्यांच्या अकाउंटमध्ये पैसे जमा झाले त्याविषयीची माहिती दिली, परंतु याप्रकरणी कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे सायबर चोरट्यांचे चांगले चांगभले होत आहे.

-मोहम्मद रिजवान कश्मिरी, शर्मा ले-आउट, यवतमाळ.

# ‘डिजिटल इम्प्लांट सर्जरी’ दातांच्या आरोग्यासाठी वरदान!

## डॉ. चेतन दरणे : दात गमावलेल्यांना हास्य मिळविणे शक्य

**येथील प्रख्यात दंत चिकित्सक डॉ. चेतन दरणे यांनी, नुकतीच एक अत्याधुनिक ‘डिजिटल गाइडेड फुल माऊथ इम्प्लांट सर्जरी’यशस्वीपणे केली. या नवीन तंत्रज्ञानामुळेदंतोपचार अधिक सोपे, सुरक्षित आणि अचूक कसे झालेत, याबद्दल त्यांच्याशी केलेली ही खास बातचीत...**

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ राजकुमार भीतकर



**यवतमाळ, दि.१७: दात गमावलेल्या रुग्णाला चेहऱ्यावर नैसर्गिक व सुंदर हास्य मिळविणे आता शक्य झाले आहे. 'डिजिटल इम्प्लांट सर्जरी' त्यासाठी एक वरदान ठरत असून रुग्णाच्या चावण्याची क्षमता, आत्मविश्वास आणि आर्युमान वाढविणे शक्य झाले असल्याची माहिती येथील प्रसिद्ध दंत चिकित्सक डॉ. चेतन दरणे यांनी दिली. ते दैनिक 'अजिंक्य भारत'शी संवाद साधत होते.**

बात चित

शहरातील प्रसिद्ध दंतचिकित्सक डॉ. चेतन दरणे यांच्या क्लिनिकमध्ये नुकतीच एक अत्याधुनिक 'डिजिटल गाइडेड फुल माऊथ इम्प्लांट सर्जरी' यशस्वीपणे पार पडली. याबाबत माहिती देताना डॉ. दरणे यांनी सांगितले की, ‘आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर केल्यास सर्जरी अधिक सुरक्षित, अचूक आणि रुग्णांना अनुकूल ठरते. यवतमाळ शहरात या अत्याधुनिक सेवेचा लाभ रुग्णांना मिळत असल्याचेही ते म्हणाले. या सर्जरी विषयी विचारले असता डॉ. दरणे म्हणाले की, ही एक अत्याधुनिक दंतोपचार पद्धती आहे. यामध्ये, डॉक्टर रुग्णाच्या तोंडाचा ‘इंट्राओरल स्कॅन’ आणि ‘सीटी स्कॅन’ करतो. या दोन्ही स्कॅनच्या मदतीने, रुग्णाच्या दातांची, जबड्याच्या हाडांची आणि नसांची एक त्रिमितीय प्रतिमा तयार करतो. या डिजिटल माहितीच्या आधारे, इम्प्लांट अगदी अचूकपणे कुठे आणि कसा बसवायचा, याचे नियोजन केले जाते, ज्यामुळे शस्त्रक्रियेतील धोका जवळपास नाहीसा होता. पारंपरिक इम्प्लांट पद्धतीपेक्षा ही नवीन डिजिटल सर्जरी रुग्णांसाठी अधिक फायदेशीर कशी आहे, या प्रश्नाच्या उत्तरात डॉ. दरणे म्हणाले की, याचे अनेक फायदे आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, यात अचूकता शंभर टक्के असते. कमीत कमी चिरफाड होत असते. रुग्णाला वेदना, रक्तस्राव आणि सूज यांचा त्रास पारंपरिक पद्धतीपेक्षा खूपच कमी होतो. ही शस्त्रक्रिया वेळेत पूर्ण होते आणि रुग्ण लवकर बरा होतो. शस्त्रक्रियेपूर्वीच संपूर्ण डिजिटल प्लॅनिंग होत असल्याने, शस्त्रक्रिया यशस्वी होण्याचा दर खूप अधिक आहे. या शस्त्रक्रियेनंतर, ज्या रुग्णांनी दात गमावले आहेत, त्यांच्या जीवनात काय सकारात्मक बदल होऊ शकतात, या प्रश्नाच्या उत्तरात डॉ. दरणे यांनी सांगितले की, ज्यांनी नैसर्गिक दात गमावले आहेत, त्यांना या प्रक्रियेमुळे पुन्हा एकदा नैसर्गिक आणि सुंदर स्मितहास्य मिळविणे शक्य होते. त्यांची चावण्याची क्षमता पूर्णपणे पूर्ववत होते, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि आर्युमान उंचावते. ते पुन्हा एकदा आपल्या आवडीचे पदार्थ खाऊ शकतात आणि मोकळेपणाने हसू शकतात. यवतमाळसारख्या शहरातही ही आधुनिक सेवा उपलब्ध असल्याचे डॉ. चेतन दरणे यांनी सांगितले.

## थोडक्यात

### नेत्रालयाचे आज उद्घाटन

**यवतमाळ:** येथील 'श्री सत्यसाई संजीवनी नेत्रालया'चे उद्घाटन शनिवारी, दि. १९ जुलै रोजी होणार आहे. या रुग्णालयातून नागरिकांना निःशुल्क नेत्रसेवा मिळणार आहे. वाघापूर येथील श्री सत्यसाई क्रीडा नगरीत सकाळी १०:४५ वाजता हा सोहळा होईल. सद्गुरु मधुसूदन साई यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाचे आभासी उद्घाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मंत्री संजय राठोड, मंत्री अशोक उईके, ना. हंसराज अहिर, खासदार संजय देशमुख, आमदार बाळासाहेब मांगुळकर, माजी खासदार विजय दर्डा, पद्मश्री डॉ. विकास महात्मे, डॉ. सतीश खोडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### अपघातात दुचाकीस्वार ठार

**दिग्रस :** दिग्रस-आर्णी मार्गावर भरधाव ऑटोने दुचाकीला धडक दिल्याने एका ५६ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. याप्रकरणी पोलिसांनी ऑटोचालकावर गुन्हा दाखल केला आहे. अल्ताफ गफूर मलनस (वय ५६) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते आपल्या दुचाकीने (एमएच २९ बीझेड ८६७९) दिग्रसहून आर्णीकडे जात होते. यावेळी एमएच १७ एजी ३३७ क्रमांकाच्या ऑटोचालकाने निष्काळजीपणे वाहन चालवून त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यात अल्ताफ यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

### समाधान शिबिराचे आयोजन

**आर्णी :** तालुक्यातील सावळी सदोबा येथे २४ जुलै रोजी ‘समाधान शिबिर’ आयोजित केले आहे. महाराजस्व अभियानांतर्गत होणाऱ्या या शिबिरात नागरिकांच्या विविध शासकीय योजनांसंदर्भातील तक्रारींचे निराकरण केले जाणार आहे. गुरुवारी सकाळी ११ वाजता साई मंगल कार्यालयात हे शिबिर होईल. यात महसूल, कृषी, आरोग्य, शिक्षण यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या जाणून घेतील. आमदार राजू तोडसाम, तहसीलदार वैशाख वाहूरवाघ, गटविकास अधिकारी आदी उपस्थित राहणार आहेत.

## CAPTION आजी पूजन....



**यवतमाळ : शहरी संस्कृतीत दुरावत चाललेल्या नात्यांना पुन्हा एकदा प्रेमाचा ओलावा देताना येथील डॉ. नंदुरकर विद्यालयात आयोजित ’आजी पूजन’ सोहळ्यात आपल्या आजीच्या चरणी नतमस्तक झालेले नातवंडे. नातवांचे हे प्रेम पाहून आजींचे डोळेही पाणावले.**

### दिव्यांगांचा रविवारी सत्कार

**यवतमाळ, दि.१७:** 'सेवा समर्पण' संस्थेच्या दिव्यांग (अंध) प्रकल्पांतर्गत पंढरपूरची पायी वारी पूर्ण करणाऱ्या बांधवांचा कौतुक सोहळा रविवारी, दि. २० जुलै रोजी आयोजित करण्यात आला आहे. शहरातील भोसा-वाकी रोडवरील मानवसेवा धाम येथे सकाळी ११ वाजता हा मावंदाचा कार्यक्रम होईल. या दिव्यांग बांधवांनी २३ दिवसांत ५२९ किलोमीटर पायी वारी पूर्ण केली. या सोहळ्यात त्यांचे, तसेच त्यांना साथ देणारे प्रशांत व प्राची बनगीनवार यांचाही सत्कार होणार आहे. याच कार्यक्रमात, अतिरिक्त जिल्हाधिकारी पदोन्नती झालेले ललितकुमार वऱ्हाडे यांचा गौरव आणि नवे निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांचे स्वागत केले जाणार आहे.

# झरी तालुक्यातील ३० ग्रामपंचायतींचे सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

## सुधारित आरक्षणामुळे राजकीय समीकरणे बदलणार, अनेकांची स्वप्ने भंग पावली

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**झरी (जामणी), दि.१८:** येथील तहसील कार्यालयात आज, शुक्रवारी झालेल्या सोडतीत तालुक्यातील ३० ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे सुधारित आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या आरक्षण सोडतीमुळे, गावागावांतील राजकीय समीकरणे आता स्पष्ट झाली आहेत.

यवतमाळ जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार, दि. १७ आणि १८ जुलै रोजी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये सरपंचपदासाठीची ही सुधारित आरक्षण सोडत प्रक्रिया राबविण्यात आली. त्यानुसार, आज, शुक्रवारी दुपारी १२ वाजता झरी तहसील कार्यालयाच्या सभागृहात सोडतीला सुरवात झाली. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि महिलांसाठीचे आरक्षण यावेळी निश्चित करण्यात आले. तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ही प्रक्रिया पार पडली. या आरक्षण सोडतीमुळे, आगामी निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांना आता आपला मतदारसंघ निश्चित करता येणार आहे. या सोडतीमुळे काही प्रस्थापितांना धक्का बसला, तर काही इच्छुकांना संधी मिळाली आहे. त्यात राजूर ना.मा. प्र. महिला, दिग्रस ना.मा. प्र. महिला, मांगली सर्वसाधारण महिला, लिगती अनुसूचित जमाती पुरुष, सतपेल्ली ना.मा. प्र. महिला, दरा ना.मा. प्र. पुरुष, हिरापूर ना.मा. प्र. महिला, सुर्दापूर अनुसूचित जाती पुरुष, अर्धवन सर्वसाधारण महिला, कमळवेल्ली सर्वसाधारण महिला, टाकळी सर्वसाधारण, येडशी सर्वसाधारण, पाटण ना.मा. प्र. पुरुष, मुकुटबन सर्वसाधारण, सिंधी वाढोणा सर्वसाधारण, धानोरा अनुसूचित जाती महिला, दुर्भा सर्वसाधारण महिला, अडेगाव सर्वसाधारण, वठोली अनुसूचित जमाती महिला, बोपापूर सर्वसाधारण, वेडद सर्वसाधारण महिला, कोसारा ना.मा. प्र. पुरुष, पांढरकवडा ला. सर्वसाधारण पुरुष, अहेरल्ली सर्वसाधारण महिला, भेंडाळा ना.मा. प्र., खडकी सर्वसाधारण, पिंप्रड सर्वसाधारण, खातेरा सर्वसाधारण महिला, पिवरडोल सर्वसाधारण महिला, येदलापूर सर्वसाधारण महिला, या प्रकारे सरपंच पदाचे आरक्षण सोडण्यात आले आहे.

# रेतीच्या अवैध वाहतुकीवर महसूल विभागाची धाड

## कोसारा शिवारात ट्रक पकडला



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १८ :** मारेगाव तालुक्यातील कोसारा शिवारात रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या एका ट्रकवर महसूल विभागाने धडक कारवाई केली. तहसीलदार उत्तम निलावाड यांनी सापळा रचून हा ट्रक पकडल्याने, अवैध रेती व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

कोसारा परिसरातून रेतीची अवैध वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती तहसीलदारांना मिळाली होती. त्यानुसार, त्यांनी आपल्या पथकासह सोईट ते खैरी रस्त्यावर सापळा रचला. यावेळी रेतीने भरलेला एक ट्रक अवैध उत्खनन करून वाहतूक करत असताना पकडण्यात आला. या कारवाईत १३ ब्रास रेतीसह ट्रक जप्त करून, तो तहसील कार्यालयाच्या परिसरात लावण्यात आला आहे. ही कारवाई तलाठी गजानन वानखेडे, चैतन्यकुमार शिंगणे, सनदेवल कुडमेथे, विवेश सोयाम, विठ्ठल सरनाईक, शिपाई किशन वेले आणि कोतवाल दिलीप पचारे यांच्या पथकाने केली. या धडक कारवाईमुळे रेतीमाफियांचे धाबे दणाणले आहेत.

# गुणवंतांचा आज गौरव सोहळा

**यवतमाळ, दि. १८ :** येथील मेत्ता भिशी संघातर्फे दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. आज, शनिवारी (दि. १९) रोजी होणाऱ्या या कार्यक्रमात ’मेत्ता भिशी’चेही आयोजन आहे. मेडिकल चौकातील सेलिब्रेशन हॉल येथे दुपारी १२ वाजता हा कार्यक्रम सुरू होईल. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहाय्यक वनसंरक्षक निलेश सोनवणे उपस्थित राहणार आहेत. समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी आणि ज्येष्ठ कर्मचाऱ्यांच्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सत्कार सोहळा आयोजित केला आहे. दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उत्तम गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा आणि विविध विभागांतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा यावेळी गौरव केला जाईल. या कार्यक्रमाला समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मेत्ता भिशी संघाने केले आहे. कार्यक्रमानंतर अल्पोपहाराची सोय करण्यात आली आहे.

# उमरखेडमध्ये दिव्यांगांसाठी ‘प्रहार’चा आक्रोश

## उमरखेड नगर परिषदेवर धडकला मोर्चा; लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. १८:** दिव्यांगांसाठी राखीव असलेला ५ टक्के विकास निधी गेल्या अनेक वर्षांपासून मिळत नसल्याने, प्रहार जनशक्ती पक्षाने आज शेकडो दिव्यांग बांधवांसह नगर परिषदेवर आक्रोश मोर्चा काढला. प्रशासनाकडून चालू वर्षाचा निधी देण्याचे आणि प्रलंबित निधीबाबत कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन मिळाल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.



शासनाच्या २०१८ च्या धोरणानुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांना ५ टक्के निधी दिव्यांगांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. मात्र, उमरखेड नगर परिषदेने या नियमाचे पालन केले नाही. याविरोधात प्रहारने चार वर्षे आंदोलने करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. अखेर, शुक्रवारी प्रहारचे शहरप्रमुख राहुल मोहितवार यांच्या नेतृत्वात हा मोर्चा काढण्यात आला. पोलिसांनी मोर्चा गेटवर अडवताच, आंदोलकांनी तिथेच ठिय्या मांडला. अखेर, प्रहारचे प्रमुख बच्चू कडू यांनी मुख्याधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून चर्चा केल्यानंतर, प्रशासनाने लेखी आश्वासन दिले. यात चालू वर्षाचा निधी वितरित करण्याचे आणि २०१८ ते २०२४ पर्यंतच्या प्रलंबित निधीबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याचे मान्य करण्यात आले. यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे शहरप्रमुख राहुल मोहितवार, तालुकाप्रमुख सय्यद माजीद, दिव्यांग क्रांती आंदोलनाचे तालुकाप्रमुख बालाजी माने, गोपाल झाडे, श्याम चेके, दिव्यांग क्रांती आंदोलनाचे शहर प्रमुख प्रेम रुडे, नारायण भवर, बलवंत तिग्गलवाड, भास्कर गंजेवाड, प्रजेश खंदारे, श्रावण चांगले, आदी प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांसह असंख्य दिव्यांग बांधव उपस्थित होते.

### दिव्यांग धडकले पंचायत समितीवर!

**नगर परिषदेतील आंदोलनानंतर, ग्रामीण भागातील दिव्यांगांनाही त्यांचा हक्काचा निधी मिळावा, यासाठी आंदोलकांनी पंचायत समितीवर धडक दिली. गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देऊन, तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमधील दिव्यांगांना १५ दिवसांत निधीचे वाटप करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.**

# शेंबाळपिंपरीत शॉर्टसर्किटमुळे चार दुकाने जळून खाक

## दिव्यांग व्यावसायिकासह चौघांचे नुकसान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**शेंबाळपिंपरी, दि. १९ :** येथील मुख्य बाजारपेठेत गुरुवारी रात्री लागलेल्या भीषण आगीत चार टेलरिंगची दुकाने जळून खाक झाली. शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या या आगीत गरीब व्यावसायिकांचे अंदाजे आठ लाखांहून अधिक रुपयांचे नुकसान झाले असून, त्यांचे संसार उघड्यावर आले आहेत.

गुरुवारी रात्री अकराच्या सुमारास ही आग लागली. यात दिव्यांग असलेले कुंडलिक तासके, तसेच गजानन डाखोरे, संतोष कठाळे आणि विजय थोरात यांच्या दुकानांचा कोळसा झाला. दुकानांतील शिलाई मशीन, ग्राहकांचे कपडे आणि



सर्व साहित्य जळून खाक झाले. पुसद येथील अग्निशमन दलाने घटनास्थळी पोहोचून आग आटोक्यात आणल्याने मोठा अनर्थ टळला. महसूल अधिकारी अविनाश आडे यांनी घटनेचा पंचनामा केला आहे. याच व्यवसायावर उदरनिर्वाह अवलंबून असलेल्या या चारही कुटुंबांना शासनाने आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आता गावकऱ्यांमधून जोर धरू लागली आहे. या घटनेमुळे संपूर्ण गावात हळहळ व्यक्त होत आहे.

## थोडक्यात

### 'एक पेड माँ के नाम' २.० उपक्रमांतर्गत वृक्षारोपण



**बार्शीटाकळी :** 'शिक्षा जीवन के लिये, जीवन राष्ट्र के लिये', हे ब्रिदवाक्य विद्यार्थांच्या मनात रूजले पाहिजे, यासाठी जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा बोरमळीचे मुख्याध्यापक मुसळे, शिक्षक यांनी 'एक पेड मा के नाम', त्यासोबत वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्त पाण्याची स्टील बॉटल वाटप केली. प्रमुख उपस्थिती म्हणून गटविकास अधिकारी बार्शीटाकळी रविकांत पवार, गट शिक्षणाधिकारी संदीप मालवे, शिक्षण विस्तार अधिकारी प्रताप वानखडे, धाबा केंद्र प्रमुख गोपाल वाकोडे, से. नि. विस्तार अधिकारी सत्कारमूर्ती रमेश चव्हाण, तसेच प्लास्टिकमुक्त अभियानामध्ये गोरसीकवाडी जिल्हा सहसंयोजक दानशुर रवींद्र जाधव, सचिव वसंतराव नायक सौंदर्यीकरण समिती, गोर गावंळीयां जिल्हाध्यक्ष अकोला. गावातील सरपंच वंदना राठोड, उपसरपंच स्मिता राठोड, ग्रा. पं. सदस्य बोरमळी शेलगाव, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, आजी-माजी कर्मचारी, अधिकारी, तांड्यातील नायक कारभारी महिला उपस्थित होत्या. समाजसेवक तथा माजी सरपंच बापूराव राठोड यांनी विकासाचा ध्यास मनात घेऊन गावकरी तसेच बार्शीटाकळी पं. स. कर्मचारी, अधिकारी सर्वांच्या सहकार्याने गाव, तालुका, जिल्हा, जिल्हा नव्हे तर, विभागीयपर्यंत पारितोषिक मिळविले, केंद्रापर्यंत जाण्याचे त्या पद्धतीने काम करीत आहे.

### बालवैष्णवांच्या भजनानंदात मातोश्री चंद्रभागादेवींचा पुण्यतिथी उत्सव



**अकोट :** आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ।। कुळी कन्यापुत्र होतीं जे सात्त्विक । तयांचा हरिख वाटे देवा ।।

या अभंगानुसार संपूर्ण जगताला आपल्या वाणी तथा लेखणीद्वारा जगदोद्धारक ठरलेले सद्गुरु श्री संत वासुदेव महाराज हे महान विभूतीमत्व. अशा महान विभूतींना सदैव मार्गदर्शन करणाऱ्या व प्रत्येक कार्यात साथ देणाऱ्या त्यांच्या मातोश्री चंद्रभागादेवी या खऱ्या अर्थाने परमवंदनीय ठरतात. या संतमाता चंद्रभागादेवी यांचा पुण्यतिथी उत्सव आषाढ कृष्णअष्टमी या तिथीला श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, अकोटद्वारा विधिवत संपन्न झाला. यानिमित्ताने पहाटे श्रींचा अभिषेक होऊन सकाळी स्वानंद सुखनिवासी सद्गुरु श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, श्री क्षेत्र आळंदी देवाची अंतर्गत उपशाखा - श्री संत वासुदेव महाराज वारकरी शिक्षण संस्था, श्री क्षेत्र श्रद्धासागर, अकोट येथील बालवैष्णवांनी अतिशय सुंदर सकल संत गाथा भजन केले. यावेळी श्री संस्थेचे सहसचिव मोहनराव जायले पाटील यांनी सपत्नीक मातोश्री चंद्रभागादेवी यांचे पूजन केले. यानंतर महाआरती संपन्न झाली. वैष्णव भोजन अर्थात महाप्रसादाच्या कार्यक्रमाने या पुण्यतिथी उत्सवाची सांगता झाली. कार्यक्रमाकरिता श्री संस्थेचे अध्यक्ष हभप वासुदेवराव महाराज महल्ले, किशोर ऊर्फ अविनाश गावंडे, सुरेंद्र चिकटे, अनंतराव गावंडे, बाळकृष्ण वाकोडे, महादेवराव बोरोकार, अमोल मानकर, दिलीप कुलट, राम महाराज गाढे, पुरुषोत्तम महाराज तळोकार, विष्णू महाराज गावंडे, आदी मंडळी उपस्थित होती.

## निधन वार्ता

### तुकाराम मांगुळकर



**जानोरी मेळ :** येथून जवळच असलेल्या अंदुरा येथील रहिवासी तुकाराम महादेव मांगुळकर हे वीज वितरण कंपनीचे सेवानिवृत्त कर्मचारी होते. त्यांचे १७ जुलै रोजी रात्री अकरा वाजता हृदयाची गती बंद पडल्यामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुली, सुना, नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनामुळे निंबा-अंदुरा सर्कलमध्ये शोककळा पसरली आहे.

# घरकुलप्रकरणी सचिवावर होणार शिस्तभंगाची कारवाई

**तीन दिवसात उत्तर सादर करण्याचे आदेश**



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोट , दि. १८ :** तालुक्यातील ग्राम बोर्डी येथील घरकुल योजनेच्या बांधकामाची व भ्रष्टाचाराची लेखी तक्रार करण्यात आली होती. या तक्रारीची बातमी दै.अजिंक्य भारतमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. त्या बातमीची दखल घेऊन मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश दिले होते. त्या आदेशानुसार पथकामार्फत चौकशी करण्यात आली व पथकाने त्याबाबत वस्तुनिष्ठ अहवाल गटविकास अधिकारी अकोट यांच्याकडे सादर केला आहे. त्या अहवालवरून बोर्डी ग्राम पंचायतचे सचिव यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यामध्ये ३ दिवसांच्या आतमध्ये उत्तर मागितले आहे. विहीत वेळेच्या आत उत्तर आले नाही तर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेश मिळाले असल्यामुळे बोर्डी येथील घरकुलप्रकरणी सचिवावर शिस्तभंगाची कारवाई होणार आहे.

मौजे बोर्डी येथील केलेल्या तक्रारीप्रकरणी संदर्भीय पत्र क्रमांक ३ व ४ अन्वये चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. या चौकशी अहवालाचे अवलोकन केले असता लाभार्थीच्या घरकुल बांधकामात अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे. ग्रामपंचायत बोर्डी येथील सन २०२४,२५ या वर्षातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या निकषानुसार ८ लाभार्थी पात्र असल्याचे नमूद करून आपण स्वतः माहे जानेवारी २०२५ मध्ये त्यांचे मंजुरीचे प्रस्ताव पंचायत समितीला सादर केले आहे, तसेच आपण संदर्भ क्रमांक ४ नुसार सादर केलेल्या अहवालात त्याच लाभार्थीचे आरसीसी पक्के घर असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे उक्त प्रकरणी आपली भूमिका प्रशासनाची पूर्णतः दिशाभुल करणारी असल्याचे दिसून येत आहे. यावरून घरकुल बांधकामाच्या अनियमिततेच्या बाबतीत ग्रामपंचायतीचे सचिव या नात्याने आपण आपल्या कर्तव्यात हलगर्जीपणा करून कसुर केल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध होत आहे.त्यामुळे ग्रामपंचायत बोर्डी येथील सन २०२४-२५ या वर्षातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या पात्र लाभार्थीचे निकषानुसार ८ लाभार्थी यांची वस्तुस्थितीबाबत प्रशासकीय व भौतिकदृष्ट्या पडताळणी करून त्यांचे परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी ही आपली होती; मात्र असे न करता आपण संबंधित लाभार्थी यांची दिशाभुल करणारी दस्ताऐवजे प्रशासनाकडे सादर करून घरकुल बांधकाम प्रकरणी आपणाकडून अनियमितता झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

त्यानुसार वरीलप्रकरणी आपण महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा(वर्तणूक) नियम १९६७ चे उल्लंघन केल्याची जबाबदारी आपणावर निश्चित करून आपणा विरुद्ध महाराष्ट्र जि.प.जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ अन्वये शिस्तभंगविषयक कार्यवाही का करण्यात येऊ नये? या बाबतचा आपला खुलासा नोटीस मिळाल्याच्या तीन दिवसांच्या आत सादर करावा. आपला खुलासा विहीत मुदतीचे आत प्राप्त न झाल्यास उक्त प्रकरणी आपले काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन आपणाविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, असे लेखी पत्र अकोट गटविकास अधिकारी यांनी बोर्डी ग्राम पंचायत सचिव यांना बजावले आहे.

मात्र रोजगार हमी योजनेमार्फत काम सुरू नसतानाही मजूर कामावर हजर दाखवून मजुराच्या नावे खोटे मस्टर तयार करून बोर्डीतील रोजगार सेवक यांनी ते ऑनलाइन केले व मुजराच्या खात्यात एक टप्पा टाकण्यात आला आहे. याची चौकशी मात्र अद्यापही पथकाने केलेली नाही, ही उल्लेखनीय बाब आहे. रोजगार हमी योजनेचे मस्टरची चौकशी अद्यापही गुलदस्त्यात का? रोजगार सेवक यांना कोण पाठीशी घालत आहे, याची चौकशी होणे गरजेचे आहे. तरी वरिष्ठ अधिकारी यांनी दखल घेऊन रोजगार हमी योजनेचे जे बोर्डीतील रोजगार सेवक यांनी मजुराच्या नावे खोटे मस्टर तयार करून ऑनलाइन केले, याची सुद्धा चौकशी करून कारवाई होणे गरजेचे आहे. तरी आता वरिष्ठ अधिकारी आता नेमकी काय कारवाई करतात, याकडे लक्ष लागले आहे.

> बोर्डी येथील घरकुल योजनेच्या बांधकामाची व भ्रष्टाचाराची लेखी तक्रार प्राप्त झाली होती. त्या तक्रारीवरून पथकामार्फत चौकशी करून पथकाने अहवाल सादर केला आहे. त्या अहवालावरून बोर्डीचे सचिव यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. याबाबत तीन दिवसात उत्तर मागविण्यात आले आहे. त्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.
>
> **- माया वानखडे**
> गटविकास अधिकारी पं.स.अकोट.

## शेतकऱ्यांनी रेशीम उद्योगातून आर्थिक बळकटी मिळवावी- डॉ. ढवळे



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**पातूर, दि. १८ :** शेतकऱ्यांचे उत्पन्न प्रति एकरी दुप्पट करण्यासाठी रेशीम उद्योग हा एक चांगला पर्याय आहे, त्याचबरोबर दुग्ध व्यवसाय कुक्कुटपालन हे छोटे-छोटे उद्योग शेतकऱ्यांनी केल्यास त्यांची आर्थिक उन्नती नक्की होऊ शकते. रेशीम उद्योगातून शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रति पीक कोश उत्पादनातून होऊ शकते. तुतीच्या काडीपासून रेशीम उद्योग केल्यास शेतकरी माडी बांधू शकतो व गाडीपर्यंत पोहचू शकतो. इतके सामर्थ्य या उद्योगात आहे. फक्त शेतकऱ्याची इच्छाशक्ती व कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे, असे प्रतिपादन डॉ.ढवळे यांनी केले. पातूर तालुक्यातील आदिवासीबहुल भागातील पाचरण येथे जिल्हा रेशीम कार्यालय अकोला यांच्यामार्फत तुती लागवड पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम १५ जुलै २०२५ रोजी संपन्न झाला आहे. कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून उपसंचालक, रेशीम संचालनालय, नागपूर डॉ. महेंद्र ढवळे हे उपस्थित होते.

सहायक संचालक, अमरावतीचे हेमंत लाडगावकर, जिल्हा रेशीम अधिकारी, अकोला सुनीलदत्त फडके यांनी याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक फडके यांनी केले.पातूर तालुक्यातील आलेगाव परिसरात तुती रोपवाटिकेचा मोठ्या प्रमाणात व्यवसाय केला जातो. सध्या आलेगाव परिसरात १५ लक्ष रोपे उपलब्ध असून, मराठवाड्यातील बीड, उस्मानाबाद, छत्रपती संभाजीनगर, जालना आणि विदर्भातील बुलडाणा, अमरावती, वाशिम, यवतमाळ, वर्धा या जिल्ह्यात तुती रोपांची विक्री झाली आहे. तसेच रेशीम कीटकांचे बालसंगोपन करून त्याचा पुरवठा शेतकऱ्यांना केल्यास त्यापासून हमखास भरघोस कोश उत्पादित होऊन रेशीम शेतकऱ्यांना फायदा मिळतो. पाचरण येथील मंगेश डाखोरे या होतकरू रेशीम उद्योजकांनी बाल कीटक संगोपन केंद्राची उभारणी केली असून, त्याची पाहणी डॉ. महेंद्र ढवळे, हेमंत लाडगावकर व जिल्हा रेशीम अधिकारी सुनील दत्त फडके यांनी केली. या कार्यक्रमासाठी आलेगाव पाचरण व वाशिम जिल्ह्यातील पांगरी नवघरे, बोरगाव या ठिकाणचे नवीन रेशीम उद्योजक शेतकरी उपस्थित होते. त्याचबरोबर प्रादेशिक रेशीम कार्यालय, अमरावतीचे सहायक संचालक हेमंत लाडगावकर हे उपस्थित होते.

## लोकशाहीर आण्णाभाऊ साठे स्मृती दिवस साजरा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**देवरी, दि. १८ :** जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव. सांगणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा स्मृती दिवस १८ जुलै रोजी देवरी येथे साजरा करण्यात आला.

या महान जनकवीला, क्रांतिकारक लेखकाला व दलित शोषितांच्या व्यथांना वास्तवात उतरविणाऱ्या साहित्यसम्राटाला ग्रामपंचायत देवरी येथील माजी सरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य शेवंता विठ्ठल तायडे व ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व जनसामान्य देवरीकरांनी विनम्र अभिवादन केले. अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर बोरकर यांच्यासह अनेकांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची महती सांगितली. अण्णाभाऊंचा वाटेगाव ते मुंबई हा जीवन प्रवास एक नव संजीवनी देऊन गेला.

रस्त्यावरील सिनेमांचे बोर्ड, भिंतीवरील जाहिराती आणि मुंबईकरांची गजबजलेली गल्लीबोळातल्या अनुभवांनी त्यांची ज्ञानाची गंगा वाहू लागली. अख्या मुंबईच्या झोपडपट्ट्यातील जीवन त्यांनी उभ्या महाराष्ट्राला शाहिरीद्वारे दाखविले. त्यांनी ३५ कादंबऱ्या, लोकगीते, शेकडो लावण्या, प्रवास वर्णन, लोकनाट्य, पोवाडे प्रचंड गजलेली फकीरा कादंबरीने महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळविला.. छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा गात गात सामान्य जनतेच्या मनात शौर्य चेतवणारा त्यांचा इतिहास समुद्र पल्याड नेणारा लोकहिताचा शाहीर.. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उभारून महाराष्ट्र मुक्त करणारे, रशियामध्ये भारत देशाचे आदर्श जोपासणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची उजळणी झाल्याचा प्रत्यय आला तेव्हा गावातीलच नागरिक साहेबराव लबड, रवींद्र ओहेकर, मंमद शहा, केळाजी नागे, शामराव शाहीर, बंडू तायडे, जगदेवराव तायडे, दादाराव तायडे, नारायण घ्यारे, दिलीप तायडे, प्रकाश शिरसाट, श्रीराम गावंडे, श्याम पाटील गावंडे ,नाना पाटील गायकवाड व श्यामराव शाहीर यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची स्तुती करत अण्णाभाऊंचे गीत गायीले.. आज लाडक्या लोकशाहिरांना विनम्र अभिवादन केले.

## डवरणीसाठी शेतकऱ्यांची धावपळ



**बार्शीटाकळी:** तालुक्यातील भेंडीमहाल परिसरात बैलजोडीच्या संख्येत घट असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या कसोटीने बैलजोडी आणि मजूर मिळवणे मोठी कसरत आहे. बाळु जाधव यांच्या शेतात व अन्य शेतीचे डवरणी फेर सुरू असून, मजुराची जुळवाजुळव करण्यास शेतकऱ्यांमध्ये अडचणी येत आहेत, तसेच पावसाच्या उघडीनंतर सर्वांच्या शेतामध्ये आपले शेत स्वच्छ डवरणी करण्यास आजूबाजूच्या परिसरातून शेतकऱ्यांमध्ये झुंबड उडाली आहे, तसेच मजूरांमध्येही कमी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याची मोठी डोकेदुखी वाढत आहे. भेंडीमहाल परिसरात अनेक शेतकऱ्यांकडे अल्प शेती आहे, त्यांना जे पिकातून उत्पन्न होईल तितकेसुद्धा शेतकऱ्याच्या पदरी खर्च वजा जाऊन नफा येणे अडचणीचीच बाब आहे, असे अनेक शेतकरी असून, सध्या शासनानेसुद्धा यातून मार्ग काढत शेतीचे उत्पन्न कधी दुप्पट होईल? याचा विचार करावा व तश्या योजना शेतकऱ्यांसाठी आणाव्यात, अशी मागणी होत आहे.

## मोठ्या रकमेची लालच देत रुग्णसेवकाला सायबर गुंडाकडून गंडविण्याचा प्रयत्न

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**विवरा, दि. १८ :** देशात सायबर गुन्हेगारीचे जाळे दिवसेंदिवस अधिकच विस्तारित होत आहे. नागरिकांना सरकारी अधिकाऱ्यांच्या नावे खोट्या धमक्या देत, त्यांच्यावर गंभीर गुन्ह्यांचे आरोप लावून, वैयक्तिक माहिती मिळवीत त्या आधारे गंडवण्याचे प्रकार वाढले आहेत. अशाच प्रकारात विवरा (ता. पातूर) येथील समाजसेवक मंगेश केनेकर यांना २ कोटी २० लाख रुपयांच्या मनी लॉड्रिंग प्रकरणात गोवण्याचा प्रयत्न करण्यात आला. स्वतः ला सायबर बोर्ड ऑफ इंडियाचे अधिकारी सांगणाऱ्या व्यक्तीने व्हिडिओ कॉल करून धमकी दिली; मात्र मंगेश केनेकर यांनी प्रसंगावधान राखत तत्काळ चान्नी पोलीस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली.



विवरा येथील रहिवासी आणि समाजासाठी वैद्यकीय मदत करणारे रुग्णसेवक मंगेश केनेकर यांना काही दिवसांपूर्वी एक फ ेक फोन कॉल आला. फोनवरील व्यक्तीने आपले नाव राहुल कुलकर्णी सांगितले. आपण सायबर टाटा लोकेशन बोर्ड ऑफ इंडियामधून बोलत असल्याचा दावा केला. त्याने सांगितले की, तुमच्या नावावर मुंबईतील कॅनरा बँकेत बोगस खाते उघडण्यात आले असून, त्या खात्यातून दोन कोटी वीस लाख रुपयांची मनी लॉड्रिंग झाली आहे. हे ऐकून मंगेश केनेकर चक्रावून गेले. लगेचच कॉल दुसऱ्या तथाकथित वरिष्ठ अधिकाऱ्याला, गणेश (सायबर कॅफे बोर्ड चेन्नई) यांच्याकडे जोडण्यात आला. या व्यक्तीने व्हिडिओ कॉलद्वारे अधिकृत पोशाख परिधान करून संवाद साधला. मंगेश यांच्यावर तुमच्या नावावर २० गुन्हे दाखल आहेत.. असे सांगत गंडविण्याचा प्रयत्न केला; मात्र या प्रकाराची गांभीर्याने दखल घेत मंगेश केनेकर यांनी चान्नी पोलीस स्टेशन आणि अकोला सायबर गुन्हे शाखा येथे याबाबतची तक्रार दाखल केली. त्यांनी यामध्ये संपूर्ण संवाद, व्हिडिओ कॉलचा उल्लेख आणि संबंधित मोबाईल नंबरही पोलिसांना पुरावा म्हणून दिले आहेत.

### पोलिसांकडे तक्रार करा

तुमच्या खात्यावर कोट्यवधींचे व्यवहार झालेत, गुन्हे दाखल आहेत. अशा थापा मारून लोकांना घाबरविण्याचा प्रयत्न करतात. नागरिकांनी अशा कोणत्याही कॉलला बळी पडू नये, घाबरून कोणतीही माहिती देऊ नये. जवळच्या पोलीस स्टेशन किंवा सायबर पोलिसांकडे संपर्क साधावा.

**- रवींद्र लांडे,**
ठाणेदार, चान्नी पोलीस स्टेशन

### गरीब रुग्णांसाठी काम करतो

माझ्या नावावर दोन मोबाइल क्रमांक आहेत. मला जे बोलायचे होते ते मी स्पष्टपणे सांगितले. मी तत्काळ पोलीस व सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

**- मंगेश केनेकर,**
समाजसेवक, रा. विवरा.

# कुटुंबाच्या मिलनासाठी सावरा आपत्कालीन ग्रुपने गोंधळलेल्या उत्तर प्रदेशातील युवकाला केली मदत

## भाषेचा येत होता अडसर, मात्र माणुसकीने केले साध्य

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोट , दि. १८ :** महाराष्ट्रातील मराठी व उत्तर प्रदेशातील भाषा याचा मेळ बसत नसल्याने उत्तरप्रदेशमधील प्रयागराज येथील भटकलेला आणि त्यामुळे गोंधळलेला युवक भटकत भटकत अकोट तालुक्यातील सावरा येथे पोहोचला. त्याला त्याच्या गावी जायचे होते; मात्र जवळ पैसा नाही आणि भाषेचाही अडसर होताच. अश्या गोंधळलेल्या युवकाची त्याला विश्वासात घेऊन त्याच्याकडून त्याची संपूर्ण माहिती मिळवीत त्याच्या कुटुंबासोबत संपर्क करून सावरा आपत्कालीन ग्रुपला यश आले.

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथील एक युवकाची मानसिकता बिघडल्याने भटकत होता. गेल्या एक ते दीड महिन्यापासून तो युवक आपल्या परिवारात जाण्याकरिता फिरत होता. त्याच्याजवळ पैसे नाही, खायला अन्न नाही, ज्या ठिकाणी जात होता त्या ठिकाणी प्रत्येकाला विचारत होता, मेरा गाव कहा है, मात्र त्याच्या बोलीवरून त्याला कोणीही मदत करत नव्हतं. अशाच पद्धतीने तो फिरत-फिरत सावरा येथे पोहोचला. सावरा गावातील आपत्कालीन ग्रुपने त्या युवकाला आपल्या कुटुंबात पोहोचविण्याची त्याला सर्व माहिती विचारली. त्या माहितीच्या आधारे उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे असलेल्या त्याच्या कुटुंबाला फोनवर संपर्क साधला. त्या युवकाच्या कुटुंबाशी त्यांचा संपर्क झाला. यूपीमधील सर्व कुटुंब त्या युवकाला घेण्यासाठी सावरा येथे पोहोचले. त्या युवकाचे नातेवाईक येईपर्यंत आपत्कालीन पथकाने जेवणाची व्यवस्था राहण्याची व्यवस्था केली. या संपूर्ण घटनेची माहिती सावरा येथील नागरिकांनी अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनला दिली. त्या ठिकाणी सावरा येथे बीड जमादार झटाले,पांडव तसेच सावरा येथील आपत्कालीन ग्रुपचे विशाल धांडे, अतुल कळस्कर, शंकर राऊत, नितीन सोनोने, सागर राऊत, दीपक पळसकर, ज्ञानेश्वर राऊत, संकेत सपकाळ, अक्षय सपकाळ, देवेंद्र ठाकरे, अच्युत मानकर, रामजी जवंजाळ, दीपक बोंडे यांच्या सहकार्याने व गावकऱ्यांच्या मदतीने त्या युवकाला आपल्या कुटुंबासोबत रवाना केले व आजही माणुसकी असली की, कोणताही अडथळा येत नाही, हेच यनिमित्ताने सिद्ध झाले आहे.

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## शुभांशू आम्हाला तुमचा अभिमान आहे!

ॲक्सिअम - ४ मोहिमेतील अंतराळवीरांना परत पृथ्वीवर घेऊन येणारे ग्रेस यान प्रशांत महासागरातील अमेरिकेच्या सेंट दियागो किनाऱ्यालगत पाण्यात अलगद उतरले, तेव्हा भारताने आपल्या अंतराळ विज्ञानाच्या प्रगतीतला खूप महत्त्वाचा टप्पा पार केला. 'ॲक्सिअम-४' अंतराळ मोहिमेत सहभागी झालेल्या ४ अंतराळवीरांपैकी केवळ एक, शुभांशू शुक्ला भारतीय असला, तरी भारताच्या आगामी 'गगनयान' या अत्यंत महत्त्वाकांक्षी, स्वदेशी मोहिमेची मुहूर्तमेढ शुभांशूच्या या यशस्वी अंतराळफेरीने रोवली, हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक भारतीयाला शूभांशूचा अभिमान असल्यास नवल नाही. शूभांशूच्या अगोदर भारताचा राकेश शर्मा हा अंतराळवीरही अंतराळात जाऊन सुखरूप परतला आहे. पण, त्याचा अंतराळ काळ कमी दिवसांचा होता आणि ती मोहीम मुख्यतः रशियाचीच होती. रशियाच्या 'सॅल्यूट - ७' या अंतराळ तळावर आठ दिवस राहून राकेश शर्मा परत आला, त्याला चाळीस वर्षे झाली. राकेश शर्मांचा आदर्श समोर ठेवून सुधांशू शुक्ला अंतराळात गेला. आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन केंद्रात पाऊल ठेवणारा तो पहिला भारतीय ठरला. पृथ्वीच्या कक्षेबाहेर २० दिवस राहून सुखरूप परतणाराही तोच पहिला भारतीय ठरला. भारताच्यादृष्टीने अनेक महत्त्वाचे प्रयोग त्याने केले. त्या प्रयोगांनी संबंधित क्षेत्रात नवी दिशा सापडेल आणि समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी त्यातून जी रहस्य उघडतील, त्याचे प्राथमिक श्रेयही सुधांशूलाच द्यावे लागेल! शुभांशूचे सुरू असलेले कौतुक, त्यासाठी त्याने घेतलेले कष्ट, जिद्द आपल्या उगवत्या पिढीपुढे ठेवली, तर त्यातून आणखी अनेक अंतराळवीर तयार होतील आणि ते भारताचे नाव अवघ्या विश्वात उंचावतील, यात शंका नाही. ॲक्सिअम - ४ ही मोहीम खरंतर गेल्या वर्षीच्या सुरुवातीलाच फत्ते व्हायची होती. पण, वातावरणाच्या अनेक अडचणी येत गेल्या. नवी तारीख जाहीर व्हायची, संपूर्ण तयारी केली जायची; पण हवामान आणि पृथ्वीच्या कक्षेच्या सीमारेषेवरील वातावरण दरवेळी काहीतरी नवी अडचण उभी करत असे. अखेरीस २६ जूनचा मुहूर्त कामी आला. त्या दिवशी अंतराळवीरांना घेऊन जाणाऱ्या यानासह अग्निबाणाने पृथ्वीची कक्षा ओलांडली. यानाने आपल्या १८ दिवसांच्या अंतराळ मुक्कामात पृथ्वीभोवती तब्बल २८८ प्रदक्षिणा घातल्या, ७६ लाख मैलांचा प्रवास केला. ४३३ तासांच्या या अथक प्रवासादरम्यान सर्व शास्त्रज्ञांनी मिळून एकूण ६० संशोधनपर प्रयोग केले. शुभांशूने केलेल्या प्रयोगांमुळे भारतातल्या स्टेम सेलसंबंधातील संशोधनाला गती मिळेल, असा शास्त्रज्ञांचा विश्वास आहे. भारत आज अंतराळ संशोधनात अग्रेसर नाही, हे खरे आहे, पण त्या यादीत पहिल्या पाचमध्ये आहे, हेही खरे. या क्षेत्रातील अतिप्रगत देशांच्या पंक्तीत मानाचे स्थान मिळविण्यासाठी भारताला अजून वेळ आहे. नियोजित 'गगनयान योजने'ने या क्षेत्रात आणखी काही पावले पडतील, असे मानायला मात्र जागा आहे. 'ॲक्सिअम- ४' योजनेतला शुभांशूचा सहभाग, 'नासा'च्या अमेरिकेतील संशोधन केंद्रात तब्बल आठ महिने शिकण्याची मिळालेली संधी, अंतराळ प्रवासाचा आणि रहिवासाचा अनुभव - हे सगळेच गगनयानसाठी पायाभरणी ठरणार आहे. ही पायाभरणी अगदी भक्कम झाली, असे इस्रोतील तज्ज्ञांचे मत झाले आहे. ॲक्सिअम-४ मधील तीच भारताची मोठी कमाई आहे. 'गगनयान योजनेसाठी संपूर्ण भारतीय बनावटीच्या एचएलव्हीएम-३ या अग्निबाणाची उभारणी जवळजवळ पूर्ण झाली आहे. गगनयान अंतराळ यानाची उभारणीही अंतिम टप्प्यात आहे. या मोहिमेसाठी ज्यांची निवड झाली आहे, त्या प्रशांत नायक, अजित कृष्णन् आणि अंगद प्रताप यांना भारत आणि रशियाच्या अंतराळ संशोधन संस्थांकडून प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्याबाबतचे वेळापत्रकही तयार आहे. २०२८ मध्ये नियोजनानुसार गगनयान मोहीम यशस्वी होईल, असा या क्षेत्रातील तमाम शास्त्रज्ञांचा दृढ विश्वास आहे. त्याला धोरणकर्त्यांनी पाठबळ द्यायला हवे. विज्ञान तंत्रज्ञानातील संशोधनासाठी अमेरिका त्यांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.५ टक्के निधी खर्च करते, तर चीन २.७ टक्के निधी खर्च करतो. दक्षिण कोरियासारखा छोटा देश संशोधन, विकासावर त्यांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५ टक्के निधी खर्च करतो. ब्राझीलही त्यासाठी १.२ टक्के निधी राखीव ठेवतो. भारताचा हा खर्च आपल्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या अवघा ०.७२ टक्के आहे. म्हणजे, भारताने आपल्या विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधनासाठी किमान एक टक्क्यांचं महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवायला हवे, असे म्हणावे लागेल. आपल्या अर्थव्यवस्थेचा विस्तार, शिक्षण प्रसार, विविध क्षेत्रांत देशाची सुरू असलेली घोडदौड पाहता या बाबीवरही अत्यंत गांभीर्याने विचार व्हायला हवा. सध्या दिसत असलेली प्रगती शाश्वत असावी, असे वाटत असेल, तर संशोधन आणि तंत्रज्ञान विकासाच्या स्वदेशी प्रगतीसाठी निधीची चांगली तरतूद होणे गरजेचे आहे. संशोधन आणि नवीनतम कल्पनांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वीच एक लाख कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्याची घोषणा केली आहे. त्या निधीचा योग्य आणि कार्यक्षम वापर झाला, तर भारताची तरुणाई त्यात आपले भरीव योगदान देईल यात शंका नाही. या तरुणाईसमोर शूभांशूने एक आदर्श निर्माण केला आहे त्यामुळे त्याच्याबाबत सर्वांना अभिमान असणे साहजिकच आहे.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### सूप वाजले



महाराष्ट्र विधिमंडळाचे
ते पावसाळी अधिवेशन
प्रश्न सुटले का जनतेचे
हे कोण करेल विवेचन

अधिवेशनाचे सूप वाजले
बराच झाला तो धिंगाणा
सभेमध्ये काही मुद्दे गाजले
खास नेत्यांवर हा निशाणा

महाराष्ट्राच्या विधिमंडळाला
भव्य परंपरा ती संस्काराची
हनिट्रॅप व राडाच्या वादाला
किनार राजकीय दुश्मनीची

## ।। अभंगवाणी ।।

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

अभंग म्हणजे
कधी न भंगणे ।
शुद्ध तू असणे
परिपूर्ण ।।

नेतल विचार
समृध्द असती ।
प्रगत करती
देशास हो ।।

आतून मलिन
विचार नसणे ।
आतून असणे
नेतल तू ।।

नेतल असावे
अपुले विचार ।
मनी सदाचार
ठेवुनिया ।।

# कळले, पण उमजले का नाही...!



## संवाद

सौ.प्रांजल रायपुरे
9028825708

**आयुष्य हे पोस्टा, सारखे असते. काही पत्र पूर्ण होतात काही, पत्र अधुरीच!.. या पृथ्वीतलावर कोणीही अमर नाही, कधीही काहीही होऊ शकते. हे न कळण्याइतके काही आपण अडाणी नाही, पण हे सगळे कळत असूनही अनेक गोष्टी आपण उद्यावर ढकलतो.. भविष्याची स्वप्न रंगवतो पुढचे बेत आखतो, पारही पाडतो.. आपण बेसावध राहतो, नेमक्या अशाच बेसावध क्षणांचा मुहूर्त साधने, म्हणजेच काळाचा आवडता खेळ मृत्यू होय....**

संपूर्ण जीवन जगण्याचा खेळ मनावर आहे ,मन अगम्य आहे.. मन कधी उसळून येते, कधी उमळून कधी सैरभैर, तर कधी गार होते.. नाहीतर गप्प मनाचं काहीच खरं नसतं.. मन कधी नात्यांना तोडतं ,कधी फिनिक्स ,पक्षी होऊन गगनांतर्गत त्यातूनच आपली जीवनशैली ठरते... निराकार मार्ग क्षणोक्षणी आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देते. माझ्या सहवासातील व्यक्तींना बघताच मी भारावून जाते. माझ्याच घरातल्या घटनांनी मी विचलित होते, तर कधी प्रसन्नतेच्या जलधारा बरसतात असं वाटते !.घरात वसंत फुलला संपूर्ण सृष्टी, आनंदाचेच गाणे गाते .ज्या घटना आयुष्यात घटल्या त्याच मनाला विचारी वेड लावतात. असं मला वाटते.

आपल आयुष्य मनाप्रमाणे जगतो. मनाच्या आधीन इतक आहोत आंधळ्यासारखं प्रेम करतो.. कधी कधी इंद्रधनुष्याच्या रंगात रंगवतो, डोळ्यातील भाव उठवून रडवतो, हसवितो आयुष्याच्या अंधार यात्रेत प्रकाशाच्या रेषेतही चालतो कुणी कुणाचाच भाग्य घेत नाही, कुणी कुणाचं भाग्य घेऊ शकत नाही. देहाचा मोरपीस कधी होईल कळणार नाही.. मनाला मायेच्या प्रेमाच्या फुलोऱ्यात ठेवावे ,नसा नसातुन अनामिक चैतन्याची लहर प्रवाहित व्हावी. असं बेभान मन सदैव चिंतनात डुबवून ठेवते.. दिवस-रात्र त्याची गुलामी, सलामी हा जीवनाचा परिपाठ ठरतो.. आपले आयुष्य स्थित प्रज्ञ वृक्षांसारखेच!.. कणा, कणातून विचाराला मोहित करतात.. मनाची भाषा, व्याख्या, उदाहरणे अनेक आहेत.. मन अशी शक्ती द्रव्य आहे जे डोळ्यांनी बघितलंच नाही.. तो केवळ संबोधन करू शकतो ,किंवा चर्चा करू शकतो.. शरीराच्या अवयवाचा भाग नसून शरीराचा महत्त्वाचा सहस्त्रकार होय .उठणाऱ्या अनेक बाबी घटना, प्रसंग ऊर्जा, विश्वास हे सर्व मनातून होते. सांगण्याच तात्पर्य एवढेच संपूर्ण शरीराला केंद्रित करणारा रसायन म्हणजे मन.. उठणाऱ्या असंख्य, विचारांना थांबवण्याचे कार्य मन करते .सुख ,दुखात घटना मनामुळेच घडते .आपले मन जागो जागी मत, मेंदूकडे नोंदवीत असते. कधी आनंद, उत्स्फूर्त प्रतिसाद देतो .नाराजी व्यक्त करतो खरं तर आपल्याच विचाराने पिंजऱ्यात प्रत्येक व्यक्ती कैद आहे. पण ढिंडोरा पिटतो मी करता?, हुशारीचा आयुष्यातील घटना स्वतःतील बदलाव करून अमुलाग्र उन्नती करण्याचा असतो. पण वेड मन असं विचारांच्या जाळ्यात अटकवतो रोज जन्मठेप, काला पाण्याची सजा मनाला आपणच देत असतो !..विचारांचा चक्र कधीच थांबत नाही.. असंख्य प्रश्न आहे पूर्ण होत नाही ,अपूर्णत्वाच्या विचाराने भूतकाळ, भविष्यकाळ ,वर्तमान काळ दूषित करतो...

मन खूप चंचल आहे ओढून ,ताणून नवीन कार्यप्रणालीत झुलवते.. कधी अशक्य स्वप्नांच शहद रोज प्राशन करवते. काय ,करतो काय? काहीच कळत नाही.. मेडिटेशन उपाययोजना, कुठेतरी मनातील विचारांना शांती मिळते. पण अंधश्रद्धा ला बळी पडतो. त्याची सांगता संपतच नाही. मी पणा जेव्हा विरेल. तेव्हाच खऱ्या सुखाची प्राप्ती होईल .काही सोडायचे नाही, अशांततेला घाबरायच नाही!.. नित्य कर्म आनंदाने करावे. सुखाची आशा मुठभर ठेवावी.. तरच अंजोळी भर सुख प्राप्त होते. जीवन कमळासारखे जगावे. डुबूनही शुद्ध, व्यक्ती मत्वाची खूप सुंदर ,सुबक उदाहरण निसर्ग देतो, सृष्टीतील प्रत्येक बाब नैसर्गिक आहे. काही ना काही शिकवत असतो.. जीवन रहस्य समजवितो रोज झोपणे ,म्हणजे मृत्यू होणे.. जाग येणे पुन्हा जन्म मिळणे. याच दिनचर्या च्या चक्रात आपली पिळवणूक होते...

वास्तविक जगण्यासाठी अनेक दालने उघडी आहे: पण बोध काय?.. ज्ञानासाठी विचारी दौलत हवी. दिशा, दशा आयुष्याची कळली तरच जीवन आनंदीत. अन्यथा सर्व मिळूनही अप्राप्ती?.. दुःख ,यातना का होते?. मनातील अनेक प्रश्ननांचा पूर्ती साठी सदैव झटने, झुकणे, राबणे, हाजी, हजी करणे मोठेपणा देऊन, खोटेपणात राहणे. स्वतःच्या आयुष्याची डोर दुसऱ्यांना वाहने, गारुडी सारखे नाचणे. माझ्यातील मिला संपवून दुसऱ्यांच्या सलामीवर जगणे... प्रत्येकाचा मृत्यू अटळ आहे. अध्यात्म सांगते, देह झाला सी कळस.. आत्म्याची मुक्ती मुखी असावे नाम ओठी. अनंत ओवी भाषा संतांनी केली.

शेवटी एकच निघते स्वतःला स्वतः ची प्राप्ती हीच जग उन्नती .संपूर्ण ब्रह्मांड सामर्थ स्वतःत आहे. विवेकी विचार, आत्मविश्वास काहीतरी करण्याची उर्मी सदैव, मनाला आपल्याच विचारात बांधावे? नाही तर कळले पण उमजले का नाही.. हा प्रश्न घेऊनच देह त्याग होईल. निरर्थक तेत पडायचं नाही. जादूटोणा, ह्या आपल्याच मनाच्या भाकड कल्पना आहे. दुसरी बाजू वेगळी असू शकते. पण आज, आत्ता, फक्त आनंदी विचारांचा सुंदर राज्य निर्माण करण्यासाठी झटावे.. नवा पराक्रम, नवे रोप आपोआप पेरल्या जाईल.. अशक्य बाजू आपोआप पूर्ण होते. मनाच्या गतीला ताब्यात ठेवावेच लागेल. तरच शक्य होईल अन्यथा विचारी मना तुच स्वतःला विचारावे, काय मिळवले, काय गमावले स्वतःने स्वतः ला सांगावे. दुसऱ्यांना दोष देऊन काय अर्थ?.. कितीही कठीण परिस्थितीत स्वतः खंबीर असलो ना तर कर्म चुकणार नाही. पुंडलिकाने कर्म सोडले नाही भक्तीच्या जोरावर विठ्ठलाला विटेवर उभे केले. आत्मिक बलाने व्यक्ती काहीही करू शकतो. वेळेच्या आत कळावे कळल्यावर आपलेच आयुष्य सुगंधित होईल...

# जिसका मन मस्त है उसके पास समस्त है!



## वास्तव

डॉ. धनंजय देशपांडे
समुपदेशक

**मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमधील एका हार्ट स्पेशालिस्ट सर्जनची ही कथा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलून टाकते. आजच्या काळात तर ती फारच गरजेची.... म्हणून सांगतोय. हे डॉक्टर अतिशय निष्णात. सगळीकडे त्यांच्या कौशल्याचा बोलबाला. मृत्यूच्या दाढेतून अनेकांना त्यांनी बाहेर काढून जणू नवीन जीवन दिलेलं.**

मात्र ऑपरेशन करण्यापूर्वी जसा एक कन्सर्न फॉर्म (ऑपरेशनच्या परवानगीचा अर्ज) भरून घेतला जातो त्याच फॉर्मसोबत हे डॉक्टर अजून एक फॉर्म भरून घ्यायचे. त्यात त्यांनी विचारलेलं असायच की, जर तुम्ही या ऑपरेशनमुळे वाचलात, तर बाकीचे आयुष्य तुम्ही कशा प्रकारे जगणार आहात ते इथं लिहून द्यायच आणि त्याचबरोबर आजवरच्या जीवनात ''करायचे राहून गेलेलं'' असं काही असेल तर तेही लिहायच. की मला जीवदान मिळाले तर मी अमुक तमुक करेल !

ऑपरेशनला आलेले रुग्ण तो फॉर्म भरून डॉक्टरकडे देत.

- त्यात कुणी लिहिलेलं असायच की, आजवर कुटुंबाला वेळ देऊ शकलो. तर आता यापुढे देईन
- तर कुणी लिहायच.... माझ्या लहान मुलासोबत मी भरपूर खेळेन. ते राहूनच गेलं आहे.
- कामधंद्याच्या नादात निसर्गात भटकायचं, टूरवर जायच राहून गेलं आहे. ते नक्की आता करणार
- एकाने तर हेही लिहिलं की, माझ्याकडून आजवर कुणाला दुखावलं गेलं असेल तर त्यांना शोधून त्यांच्याकडे स्वतः जाऊन माफी मागेन.
- एकीने लिहिलं.... संसार, पै पाहुण्याच्या नादात स्वतःसाठी जगायच, हसायचंच विसरून गेलेय... यापुढं मनसोक्त हसत हसत जगणार
- निवृत्त वडिलांनी लिहिलेलं.... माझ्या शिस्तीच्या वागण्यामुळे अनेकांना माझ्याबद्दल तक्रारी होत्या. उर्वरित आयुष्यात अशी तक्रार कुणाचीच येऊ देणार नाही.
- एका सासूने लिहिलं होत.... लेक आणि सुनेत मी थोडं डाव उजवं करत आले. आता लेकीसारखंच सुनेशी वागेन !

अशी अनेकांनी त्यांची त्यांची उर्वरित जीवनाची संकल्पचित्रे त्या फॉर्ममध्ये शब्दात मांडली. आणि मग डॉक्टर त्या रुग्णाला ऑपरेशन थियेटर मध्ये नेत आणि यशस्वीरित्या ऑपरेशन करून जीवनदान मिळवून देत. नंतर काही दिवस हॉस्पिटलमध्ये ठेवल्यावर डिस्चार्ज देताना त्या त्या रुग्णाने भरून दिलेला तो ''उर्वरित आयुष्याबद्दलचा फॉर्म'' त्याला परत देत. आणि त्याला सांगत की, तुम्ही घरी जाल, नव्याने जीवन जगाल तेव्हा तुम्ही राहून गेलेल्या ज्या ज्या गोष्टी लिहिल्या आहेत, त्या प्रत्यक्षात आणल्यावर त्याच्या समोर ''टिकमार्क'' करत जा. आणि मग सहा महिन्यांनी तो फॉर्म घेऊन मला भेटायला या आणि सांगा की त्यातल्या कशासारखं जीवन तुम्ही जगला?

आणि मग डॉक्टरांच्या लक्षात आलं की, सगळ्यांनी सगळं लिहिलं पण कुणाशीच भांडण / वैर झालं नाही असा एकही नसणार ! पण तरीही कुणीही असं लिहिलं नव्हतं की, ''जर मी वाचलो तर मला अमुक व्यक्तीचा बदला घ्यायचा आहे. माझ्या त्या शत्रूला धडा शिकवायचा आहे. आणि जमलं तर त्याला पूर्ण बरबाद करायच आहे''

किंवा असेही कुणी लिहिले नव्हते की, मला अजून खूप पैसे कमवायचे आहेत. खूप श्रीमंत व्हायच आहे. स्वतःला खूप बिझी ठेवायच आहे.

आणि मग सहा महिन्यांनी भेटायला आलेल्या रुग्णांना डॉक्टर विचारत, ''ऑपरेशनपूर्वी जेव्हा कधी तुम्ही स्वस्थ होता. तेव्हा असं आयुष्य का जगला नाहीत जे गेल्या सहा महिन्यात जगलात. तुम्हाला तसे जगण्यासाठी कुणी अडवलं होत ? यावर रुग्ण निरुत्तर होत मात्र निघताना डॉक्टरचे पाय धरून समाधानाने घरी जात. डॉ. डीडी क्लास : मृत्यूची घंटा वाजल्यावरच आपण जागे होतो. हार्ट अटॅक आल्यावरच त्यातून वाचल्यावर निष्कारण होणारी धावपळ थांबवतो. जेवणाखाण्याची हेळसांड थांबवतो. शिस्तबद्ध आयुष्य जगतो. आज जरा हे सगळं वाचून झाल्यावर खुर्चीत स्वस्थ डोळे मिटून थोडं चिंतन करा. की हातात किती आयुष्य आहे.... माहित नाही. पण निदान जितके आहे ते कशा प्रकारे जगायचे ते मनाशी नियोजन करा. आणि जमलंच तर ते सगळं एकाखाली एक असं वहीत लिहून काढा.

आणि मस्तपैकी हातपाय तोंड धुवून नव्याने आयुष्याकडे पाहायला सुरु करा. आणि स्वतःला आधी हेच सांगा की, ''अजून कुठं उशीर झालाय? जब जागो तब सवेरा'' यामुळे तुम्हाला अजून उत्साह येईल. आणि हे मी स्वानुभातून सांगतोय. पंधरा वर्षांपूर्वी मीही अशीच चूक केलेली आणि मी ती जाहीरपणे मान्य देखील करतोय. जेवणाकडे हेळसांड करून धाव धाव धावत होतो. सगळं मनासारख प्रत्यक्षात आणलं खरं पण अचानक अटॅकपायी हॉस्पिटलच्या आयसीयूमध्ये दाखल व्हावं लागलं. त्यातून बाहेर आलो खरा पण आत जातानाचा मी अन बाहेर आल्यावरचा मी यात जमीन अस्मानचा फरक होता. जिथं चार पायऱ्या चढायला डॉक्टरांनी बंदी घातली होती आणि चौथ्या मजल्यावरचे (विना लिफ्ट)चे घर ताबडतोब सोडून ग्राउंड फ्लोअरला दुसरं घ्या असं सांगितलं होत तिथं मी ते काहीही न करता मस्त ठणठणीत जगतोय. गडकिल्ले चढून जातोय.

योग्य आणि वेळेवर आहार, रोज स्वतःसाठी एक तास आणि योगासने, रात्री झोपताना गार दूध, नो जागरण.... बास याच उपायावर त्या आजारातून बाहेर आलो. एकही गोळी न खाता. म्हणून म्हणतो, मला जी अक्कल ''घंटा'' वाजवून आल्यावर आली ती वेळ तुमच्यावर येऊ नये म्हणून हा लेखप्रपंच !

आणि अजून एक म्हणजे.... फार वखवख करत जगणे सोडून द्यावे.

**कारण... असं म्हणतात की जो प्राप्त है वह पर्याप्त है और जिसका मन मस्त है उसके पास समस्त है!**

# न्यायव्यवस्थेतील सुधारणा काळाची गरज



## चर्चा

डॉ. विनोद गायकवाड
राजकीय अभ्यासक, मो. ९८५०३२४२०२

भारताच्या संविधानाने सत्ताविभाजनाच्या तत्त्वानुसार स्वतंत्र न्यायपालिका निर्माण केली. न्यायव्यवस्थेची रचना आणि अधिकारात राज्यसरकारांचा हस्तक्षेप अधिक होऊ नये म्हणून एकेरी न्यायव्यवस्था स्वीकारली. कायदे करणारी विधिमंडळे आणि त्याची अंमलबजावणी करणारी कार्यपालिका एवढेच शासन यंत्रणेचे कार्य नसून त्या कायद्याचे पालन न करणाऱ्यास शिक्षा करण्याची व्यवस्था करणे, व्यक्ती-व्यक्तीमधील संघर्ष तसेच नागरिकांच्या अधिकारांनाही शासनापासून संरक्षण देण्यासाठी न्यायव्यवस्था असणे अत्यंत आवश्यक असते. तसेच संविधानाची अंमलबजावणीही तितकीच महत्त्वाची ठरते. म्हणूनच भारतीय संविधानाच्या पाचव्या व सहाव्या भागात कलम १२४ ते १४६ तसेच कलम २१४ ते २३७ मध्ये न्यायदान व्यवस्थेची तरतूद करण्यात आली आहे. भारतीय नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे आणि संविधानाचे संरक्षण करण्याची मोठी जबाबदारी न्यायालयाची आहे. मात्र न्यायास विलंब होत असल्याने नागरिकांच्या अधिकारांवर गदा येत आहे अशी चर्चा होत असते. तीच बाब वेगळ्या पद्धतीने सरन्यायाधीशांनी पुढे आणली.

सर्वोच्च न्यायालयाच्या ७५ वर्षीय वाटचालींच्या आधारावर सरन्यायाधीश भूषण गवई यांनी चिंता व्यक्त केली. हैदराबाद येथील विधी विद्यापीठाच्या पदवी प्रदान समारंभात सरन्यायाधीशांनी प्रलंबित घटल्यांबाबत मांडलेली भूमिका न्यायालयाच्या अधिकार कक्षेत सुधारणा सुचविणारी आहे. न्यायालयीन खटले दशकानुदशके चालू शकतात आणि अनेकदा एखादा आरोपी निष्पाप असल्याचे सिद्ध होईपर्यंत त्यांनी वर्षानुवर्षे तुरुंगवास भोगलेला असतो. अनेक वेळा खटले दशके उलटतात तरी सुटत नाहीत. काही प्रकरणांमध्ये व्यक्ती निर्दोष ठरल्यावरही त्याने निर्णय येईपर्यंत काही वर्ष कारावासात काढलेले असतात. ही परिस्थिती खेदजनक आहे. न्याय मिळविण्यासाठीचा कालावधी इतका वाढतो आहे की सामान्य माणसाचा विश्वास या प्रणालीवरून उडू शकतो. अशी चिंता स्वतः सरन्यायाधीशांनी व्यक्त केल्याने त्या दिशेने प्रयत्न होणे अपेक्षित आहे. अनेकदा निर्णय आरोपीच्या मृत्यूनंतर आलेले आहेत. बोफोर्स तोफ प्रकरणाचा निर्णय माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या मृत्यूनंतर आला. महाराष्ट्रातील शिंदे गटाच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभेचा कार्यकाल संपला तरीही अजूनही प्रलंबित आहे. महाराष्ट्रातील सत्तांतराच्या महानाट्यात दोषी कोण ? हे अजूनही स्पष्ट झालेले नाही. तिकडे गेल्या दोन दशकांपासून नेट-सेटग्रस्त प्राध्यापकांचा प्रश्न प्रलंबित आहे. असे अनेक खटले आहेत त्यावर वेळेत निर्णय घेणे आवश्यक असतांनाही न्यायालयाला वेळेअभावी निर्णय देता आले नाहीत. म्हणूनच न्यायालय निर्णय देते, निकाल देते की, न्याय देते ? हा प्रश्न सर्वसामान्यांना पडतो.

सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्या मोठी आहे. जगात सर्वात जास्त प्रलंबित खटले भारतात आहेत. नॅशनल ज्युडिशिएल डेटा ग्रिड (एनजेडीजी) नुसार सर्वोच्च न्यायालयात ८१ हजारांपेक्षा अधिक खटले प्रलंबित आहेत, तर उच्च न्यायालयांमध्ये ६० लाखांपेक्षा अधिक खटले प्रलंबित आहेत. जिल्हा आणि कनिष्ठ न्यायालयांमध्ये ४ कोटी ४९ लाख ९९ हजार ५६५ खटले प्रलंबित आहेत. एकूणच भारतातील विविध न्यायालयांमध्ये ५ कोटींहून अधिक खटले प्रलंबित असल्याची आकडेवारी आहे. अशाप्रकारे प्रलंबित खटल्यांनी न्यायव्यवस्थेसमोर आव्हान उभे केले. तीच बाब सरन्यायाधीशांनी अधोरेखित केली. सर्व प्रलंबित खटल्यांपैकी सुमारे २० टक्के प्रकरणे जमीन आणि मालमत्तेच्या वादांशी संबंधित आहेत. सामाजिक संघर्षांपेक्षा निवडणूक वादाची आणि राजकीय संघर्षाचीच प्रकरणे अधिक येत असल्याने इतर खटल्यांकरिता न्यायालयाला वेळ कमी पडतो आहे. सत्तांतर, राज्यपालांची भूमिका, सभागृहाच्या सभापतींची भूमिका, विरोधी पक्षाच्या अधिकारकक्षा, पक्षांतर, पक्षफुटी, बंडखोरी, स्वायत्त संस्थांची भूमिका, तपास यंत्रणांची भूमिका निश्चित असतांनाही संवैधानिक तरतुदींचे पालन होत नसल्याने अशी प्रकरणे न्यायालयासमोर अधिक प्रमाणात येतात. राज्यपाल, सभापती, निवडणूक आयोगांसारख्या संस्था यांच्या अधिकार कक्षेत न्यायालय हस्तक्षेप करू इच्छित नसल्याने राजकीय घडी विस्कटली. परिणामी खटल्यांची संख्या वाढली. भारताची लोकसंख्या आणि न्यायाधीशांची संख्या यांचा ताळमेळ बसविणे तसेच खटल्यांची वेळ मर्यादा निश्चित करणे हे यावर उपाय ठरू शकतात. काही देशांमध्ये खटल्याचे स्वरूप पाहून युक्तिवादनाची वेळ मर्यादा निश्चित केली आहे.

अमेरिकेतील न्यायव्यवस्थेला असलेले महत्त्वाचे अधिकार भारताच्या सर्वोच्च व उच्च न्यायालयाला देण्यात आले असले तरी खटल्यांबाबतची वेळेची मर्यादा लागू करण्यात आलेली नाही. अमेरिकन नागरिकांना वेळेत न्याय मिळत असल्याने तेथे न्यायालयाकडे आदराने पाहतात व त्याचा अमेरिकन लोकांच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर प्रभाव पडतो असे दिसते. मात्र भारतात खटले प्रलंबित असल्याने वेळेत न्याय मिळत नाही. परिणामी न्यायपालिकेवरील जनतेचा विश्वास उडतो आहे हे खरे. कायदे विभाग आणि कार्यकारी विभागापासून स्वतंत्र असलेल्या न्यायपालिकेतील न्यायाधीशांच्या नियुक्त्या आणि बदलीबाबत राजकीय हस्तक्षेप होतो. न्यायाधीशांच्या नियुक्तीबाबत काही सुधारणा करण्यात आल्यात, तशी पाऊले न्यायालयांच्या अधिकार कक्षेबाबत उचलणे गरजेचे बनले. कारण सर्वोच्च न्यायालय प्रजातंत्र्याचा संरक्षक म्हणून कार्य करते. नागरिकांचे स्वातंत्र्य अबाधित राखण्याची मोठी जबाबदारी न्यापालिकेची आहे. न्यायपालिका फक्त न्यायपालिका नसून न्यायदेवता आहे. शासनव्यवस्थेतेचा तिसरा विभाग असलेल्या न्यायविभागाकडून लोकशाहीतील जनतेच्या खूप अपेक्षा आहेत. म्हणूनच न्यायव्यवस्थेतील सुधारणांकरिता संसदेने पुढाकार घेणे काळाची गरज बनले.





# ‘पूजेतल्या पानाफुला, मृत्यू सर्वांग सोहळा’

प्रा. पंढरीनाथ उर्फ भाऊसाहेब मांडवगणे यांची वयाच्या ब्यान्नव्या वर्षी पुणे येथे झालेल्या दु:खद निधनाची वार्ता त्यांचे असंख्य विद्यार्थी आणि स्नेहीजनांसाठी अतिशय दु:खद आणि अंतः करणाचा एक हळवा कोपरा कायमचा रिता करणारी. भाऊसाहेब मांडवगणे नावाची एक समृद्ध संस्था पश्चिम विदर्भाच्या शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रामधे गेले अर्धशतक नांदत होती. आता ती काळाच्या कुशीत कायमची विसावली. सर अगदी शेवटपर्यंत क्रियाशील आणि चिंतन, वाचन, लेखन समृद्ध आयुष्य जगले. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये संपूर्ण विदर्भामध्ये अग्रेसर असलेल्या अकोला येथील सीताबाई कला महाविद्यालयामध्ये त्यांनी इंग्रजी विषयाचे प्राध्यापक म्हणून दीर्घकाळ सेवा दिलेली आहे. विदर्भ साहित्य संघाच्या अकोला शाखेची जबाबदारी त्यांची लेखिका असलेली पत्नी सौ. पद्म मांडवगणे यांच्यासोबत नाविन्यपूर्ण साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांनी अनेक वर्ष सांभाळली होती. अकोला येथे १९८१ साली गो. नी. दांडेकरांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे ते सरचिटणीस म्हणून आयोजक होते. त्यांच्या ‘अभिरुची’ नावाच्या नाट्यसंस्थेद्वारे अनेक अनवट नाटकांचे मंचन त्यांनी एकेकाळी अकोला येथे केले आहे. अकोला एज्युकेशन सोसायटी या अत्यंत प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थेची धुरा अध्यक्ष म्हणून अनेक वर्षांपासून अगदी मृत्यूपर्यंत क्रियाशीलपणे सांभाळली आहे. संवेदनशील शिक्षक आणि खंबीर संस्थाचालक म्हणून सरांजवळ असलेली शैक्षणिक दृष्टी विलक्षण आणि अत्यंत दुर्मिळ. अकोला एज्युकेशन सोसायटीच्या शाळा संकुलांमध्ये त्यांच्या विद्यार्थीहितदक्ष कार्यप्रणालीच्या खुणा जागोजागी दिसतात. एक विधिज्ञ म्हणून घटनेच्या मूलभूत तत्वांची, कायद्याच्या आशयावरच्या भाष्यांची त्यांची जाण दुर्मिळात दुर्मिळ. अकोला येथील एका महिला ग्रंथपालाला शिक्षकेतर कर्मचारी ठरवून संस्थेने केलेली बडतर्फी संबंधित कायद्यावरील सरांच्या नवीन भाष्यांमुळे रद्द झाली. ग्रंथपाल पदाची गणती ही शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये होत नाही तर शिक्षक वर्गामध्ये होते आणि त्यामुळे त्यांचा बडतर्फीचा अधिकार संस्थेकडे नसतो तर विद्यापीठाकडे असतो हे त्यांचं संबंधित कायद्यावरचं भाष्य उच्च न्यायालयाने मान्य केलं आणि ग्रंथपालाची पुनर्स्थापना झाली. त्यांनी विधी महाविद्यालयामध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमांमुळे जस्टिस लोढा किंवा जस्टीस चंद्रचूड यांच्यासारख्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींना ऐकण्याची संधी अकोलेकरांना मिळाली. सर हे अत्यंत संवेदनशील आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ क्षेत्रामधील इंग्रजी भाषेच्या शिक्षकांच्या अनेक पिढ्या त्यांनी घडवल्या आहेत. खरंतर त्या काळामध्ये इंग्रजी विषय शिकण्यासाठी आजच्यासारखी साधनांची उपलब्धता नव्हती आणि परकीय भाषा म्हणून इंग्रजी विषयी प्रचंड भीती. सरांचं इंग्रजी भाषेवरचं प्रभुत्व आणि इंग्रजी साहित्याचा अफाट वाचन यामुळे त्यांची वर्गखोली ही विद्यार्थ्यांना एका अनोख्या आणि अनवट विश्वास दर्शन घडवून आणायची. त्यांच्या तासाला उपस्थित असणे हे कायम आनंदाचीच अनुभूती असायची. त्यांच्या सर्वच विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्याविषयी एक कृतज्ञतेचा आणि जिव्हाळ्याचा एक हळवा कोपरा कायम जिवंत आहे. खंबीर परंतु संवेदनशील शिक्षक व संस्थाचालक, चतुरस्त्र रसिक-वाचक आणि अनवट साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजक हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे तीन ठळक पैलू.

आपल्या अधिपत्याखाली असलेल्या वेगवेगळ्या संस्थां द्वारे अनोखे कार्यक्रम आयोजित करून संगीत, साहित्य, विज्ञान, नाटक, राजकारण अशा अनेक क्षेत्रातील हिमालया एवढ्या उंचीच्या नायकांचं दर्शन अकोलेकरांना घडविल. यामध्ये जुन्या संगीत रंगभूमीवरील बालगंधर्व आहेत, तर आधुनिक प्रायोगिक नाटकामधील विजय तेंडुलकर आहेत. मंगेश पाडगावकर, सोपानदेव चौधरी यासारखे कवी आहेत. वसंत गोवारीकरांसारखे शास्त्रज्ञ आहेत. अरुण गोविल सारखा चित्रपट अभिनेता आहे. अनिल अवचट, सिंधुताई सपकाळ यासारखे सामाजिक क्षेत्रामधील कार्यकर्ते-लेखक आहेत. पु. ल. देशपांडे, सुनीता देशपांडे, मंगेश पाडगावकर गो. नि. दांडेकर यासारखे साहित्यिक आहेत. त्यांनी अकोल्याचं कलात्मक-साहित्यिक-सांस्कृतिक पर्यावरण अतिशय समृद्ध व श्रीमंत केलं.

सरांच्या पश्चात प्राध्यापिका आणि लेखिका असलेल्या सुविद्य पत्नी, उच्चपदस्थ दोन मुले आणि एक मुलगी आणि उच्चशिक्षित नातवंडे असा समृद्ध परिवार आहे. माऊलींच्या ज्ञानेश्वरी मधील १८व्या अध्यायाच्या एका ओळीमध्ये, ‘‘वाचे बरवे कवित्व! कवित्वी बरवे रसिकत्व! रसिकत्वी परतत्व! स्पर्शू जैसा!’’ वक्तृत्व, कवित्व, रसिकत्व आणि अंतर्मुख करणारा परातत्व स्पर्श असा चढत्या क्रमाचा अनुबंध आहे. या चारही घटकांनी समृद्ध असलेलं सरांचं सफल, संपूर्ण आणि कृतार्थ आयुष्य आमच्यासारख्या त्यांच्या विद्यार्थ्यांना कायम प्रेरक आणि स्फूर्तीदायक आहे.

**प्रा. डॉ.गजानन मालोकार,**
**अकोला**

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 105

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

(चौकटीत दिलेले शब्द: पा णी ग्र ह ण; र क म वा र; मं दो द री; न र्त न)

**संकेत शब्द:–**

**दोन अक्षरी**
- आव
- कच्छ
- कर
- खर
- ग्रह
- तय
- दरी
- दांडी
- धीर
- **नर**
- नर
- नव
- नस
- नीर
- नीला
- प्रथा
- भर
- मर्म
- मल
- मात
- मेवा
- माथा
- राग
- लाख
- वडा
- वसा
- वारा
- वाव
- विळी
- साल
- सुत
- संधी
- स्वर
- संप
- हज
- हम
- हर
- हस्त
- क्षौर

**तीन अक्षरी**
- अनुज
- अमित
- आलय
- कपोल
- कयास
- गवाक्ष
- गहन
- डाहळी
- तनुजा
- थेरडा
- दांभिक
- नर्तन
- परवा
- पोचट
- पोहरा
- भजनी
- मलम
- मेनका
- यथेच्छ
- शयन
- सखोल
- समई
- सवाष्ण
- हमाल

**चार अक्षरी**
- करामत
- कानशील
- डावखोरा
- दगदग
- दरवेश
- धागादोरा
- परकाया
- पाणपोई
- भडीमार
- मंदोदरी
- लवकर
- वितरण
- विद्यमान
- सरस्वती
- सुलक्षणी
- स्वाभिमान

**पाच अक्षरी**
- अनवधान
- अंगरक्षक
- चरमरीत
- पाणी ग्रहण
- रकमवार
- लाभदायक

**अन्य अक्षरी**
- अहमहमिका
- आद्य प्रवर्तक

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | र | द | वि | ना | य | क | | वै | मा | नि | क | | आ | ग |
| द | या | | द्यु | | | लं | | भ | | र्व्य | | अ | ग्र | ज |
| न | | दा | त | | ए | क | मे | व | | स | त्या | ग्र | ह | |
| | लो | ह | चुं | ब | क | | ष | | मा | नी | | ले | | सु |
| त | ह | | ब | हु | म | त | | व | धु | | सु | ख | | रे |
| | पु | र | क | | त | प | न | | क | स | र | | क्र | ख |
| क | रु | ण | | य | | की | | प | री | | दा | य | क | |
| वि | ष | | र | त्न | पा | र | खी | | | | स | म | र | स |
| ता | | अ | जा | | य | | र | क्त | ग | ट | | रा | व | ण |
| | ना | भि | | चौ | घ | ड | | | र्भ | | मा | ज | | वा |
| न | | शा | खा | | डी | | | | श्री | मा | न | | क्र | र |
| व | र्धा | प | न | | | | आ | स | मं | त | | क्र | ना | |
| रं | | | दा | ख | ला | | ळ | | त | | चे | | ढे | ह |
| ग | जा | न | न | | क्ष | मा | शी | ल | | अ | व | क | ळ | |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 486

**—: आडवी विधाने :—**

1) जीवनात क्रमून आलेल्या मार्गाकडे सिंहाप्रमाणे अभिमानाने मागे वळून बघणे
4) एखाद्या कर्माचे किंवा व्रताचरणाचे फल सांगणारा ग्रंथ भाग
7) पतिव्रता स्त्री
8) उपनयन संस्कारातील उत्सवमूर्ती
9) गंध, राहणे 10) वाकडा, तिरपा
11) चोवीस सेकंदाचा काळ (हिं.)
12) भविष्याचा विचार करणारा, दूरवर पाहणारा
13) नि:शब्द शांतता 14) रुढी, पद्धती
15) संसार त्याग करुन ईश्वर चिंतनात लागलेला पुरुष
16) अनेक रस्ते एकत्र होण्याचे ठिकाण
18) अनेक अफलातून घडामोडी असलेला शाहरुख खानचा एक चित्रपट
19) गुणून आलेली संख्या
21) दु:ख, विलाप
22) सूर्यास्तापूर्वी 30 पळे व नंतरची 30 पळे यांच्या मधला काळ, हा मुहूर्त फार उत्तम समजला जातो
25) जीव, हृदयस्थ वायू
26) योग्य, कार्य करण्यास उपयुक्त, समोर
27) घाण, विष्ठा
28) कलह, चर्चा, भांडण
29) लहान शहर
31) निरर्थक कष्ट सोसून फिरणे
32) शोभणारे, सुंदर
34) जर नंतर येणारा शब्द
36) उजळणी, पुनरावृत्ती
37) चिखल (सं.)
38) काळवीटाच्या शिकार प्रकरणी दंडित झालेला एक खान अभिनेता
39) वैगुण्य, अनेक पायांचा एक छोटा जीव
40) स्मरण चिन्ह
42) सर्व बाजूंनी पूर्ण, पुष्कळ
43) आंग्ल भाषेत हो म्हणणे
45) परस्पर, बाहेरच्या बाहेर
47) धातूची परीक्षा, तत्वांश, अर्क
49) मूळ रकमेच्या दुप्पट झालेली रक्कम
50) वागणूक
52) सोंगट्याचा पट किंवा खेळ
54) पराग कण, धूळ
55) होमात टाकावयाचे हवनद्रव्य
57) थंडी पांघरण्याचे मृदू पांघरुण
59) देवदासची प्रेयसी
60) समारंभाची समाप्ती
62) सर्वात लहान कन्या
63) व्रताचे कठोर आचरण, ईश चिंतन
64) विशिष्ट अटींवर केलेली युद्धबंदीची घोषणा
65) खारट पदार्थ, मीठ
66) फुलांतील रस पिणारा भ्रमर
68) ज्याला पालखीत बसण्याचा मान मिळालेला आहे असा
72) पक्ष्यांचा चिवचिवाट
73) कामापुरता .......... ताकापुरती आजी, या वाक्प्रचारात गाळलेला शब्द
74) पर्वत, डोंगर 76) लोणी
77) हिंदू वर्षातील आठवा महिना
78) अंधार

**—: उभी विधाने :—**

1) मालवण जवळील समुद्रातील दूर्ग
2) लग्न समारोहात वधु पित्याने नवरदेवाला दिलेली दक्षिणा
3) कंबर
4) लाक्षणिक अर्थाने मामा बनविणे, ठकविणे
5) नभोवाणीवर सादर होणारी लहान नाटिका
6) बाण, शर
7) पति किवा पत्नीचे वडील
8) बलिष्ठ, शक्तिमान
9) दिवस
11) घडून येणारा बदल
13) योग्य
15) काळजीपूर्वक रक्षण
16) नारी, स्त्री
17) रात्री क्षणिक प्रकाशणारा एक जीव
18) नवग्रहातील एक ग्रह
19) विद्यार्थ्याने सर्व विषयात प्राविण्यासह मिळविलेले विशेष गुण, हुशारी
20) कासवासारखे मंदगतिने चालणे
22) गडबड, घोटाळा (हिं)
23) ठरवून दिलेला कालावधी
24) तीर्थक्षेत्री केलेली हजामत
27) अभयदान प्राप्त मय राक्षसाने पांडवांकरीता बांधलेले चमत्कारिक सभागृह
30) नातेवाईक, आप्त
32) मृत व्यक्तिच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून अंत्य संस्कारास उपस्थित असलेल्यांनी केलेली प्रार्थना
33) मुस्लिमांनी केलेली अल्लाची प्रार्थना
35) रद्द केलेले
36) भाडे देऊन घरात राहणारा
41) लबाडी, कृत्रिमता
42) भटाला दिली ......अन् तो हातपाय पसरी, या म्हणीतील गाळलेला शब्द
44) समजूतदार, समंजस
46) बलरामाची पत्नी, सत्ताविसावे नक्षत्र
47) गुरेढोरे मारुन त्यांचे मांस विकून आपला उदरनिर्वाह चालविणारा
48) पर्वतारोही
51) माणसाच्या डोक्याची कवटी
53) एकच एक गोष्ट वारंवार सांगणे
55) बालंट, आळ
56) बंदरांचे ओरडणे
58) कठीण, गुंतागुंतीचे
59) पान, पडणे
60) सारखे
61) गोडवा, मधुरता
63) वातावरणातील उष्णतेची स्थिती
65) धुणे
67) अंड्याच्या आतील पिवळा भाग
69) मांसाचा बारीक कीस
70) काही कालावधीसाठी थांबविलेले
71) विद्वान, हुशार, सुज्ञ
72) ख्याति, प्रसिद्धी
75) चारशे ऐंशी कागदांचे पुडके

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ | म | रा | व | ती | | लं | | प | त्र | का | र | | वा | म |
| ज | व | | | ज्र | | थें | ब | | सा | | | | सं | | हा |
| मा | ता | म | ह | | ध | | क | रा | र | ना | मा | | को | म | ल |
| न | र | क | | अ | नु | त्ती | र्ण | | | च | ल | बि | च | ल | |
| त | | र | | | र्वा | | | पा | | ता | | | | म | |
| | आ | वृ | त्ती | | त | वा | | ये | ग | ये | ग | स | री | | सा |
| रा | | त्त | | पी | | च | म | चा | | ई | | म | त | ल | ब |
| म | म | | खो | त | | क | | स | मा | ना | र्थ | क | | व | र |
| प | ति | त | पा | व | न | | स | र | | अं | | क्ष | त | | म |
| हा | | | | र्ण | | स | र्व | दा | | ग | ड्डी | | पा | व | ती |
| रा | ज | सू | य | | अ | | | र | म | ण | | क | स | र | |
| | ल | | था | ली | पी | ठ | | | | वा | खा | ण | णी | | स |
| श | ता | यु | | ला | ल | सा | | खु | रा | क | | ख | | सी | ता |
| | ड | | र | वि | | | आ | ळ | | डे | | र | सा | | र |
| पा | न | गा | | ग्र | स्तो | द | य | | का | | क्षे | | ग | र | |
| रा | | | अ | ह | म | | ता | जा | क | ल | म | | र | स | ना |

Uday Munde - 8446302691

## ®úÉ¶ÉÒ-¦ÉÊ´É¹aÉ

**मेष :** तुमचे घर अवांछित पाहुण्यांनी भरलेले असू शकते. तुमच्या प्रिय व्यक्तीसोबत वैयक्तिक भावना आणि गुपिते शेअर करण्यासाठी हा योग्य वेळ नाही.

**वृषभ:** घराशी संबंधित योजनांबद्दल विचार करण्याची गरज आहे. तुम्हाला असे वाटेल की तुमच्या प्रिय व्यक्तीचे तुमच्यावरचे प्रेम खरोखरच खूप खोल आहे.

**मिथून :** तुम्हाला असे वाटेल की तुमचे जीवन अधिक अर्थपूर्ण होत आहे. तुमच्या प्रिय व्यक्तीला तुमच्याकडून विश्वास आणि आश्वासनांची आवश्यकता आहे.

**कर्क :** वाद, मतभेद आणि तुमच्यात दोष शोधण्याची इतरांची सवय दुर्लक्षित करा. आज तुम्ही तुमच्या प्रियकराला टॉफी आणि चॉकलेट इत्यादी देऊ शकता.

**सिंह :** घरात आनंदाचे वातावरण तुमचे तणाव कमी करेल. तुम्हीही त्यात पूर्णपणे सहभागी व्हावे आणि केवळ मूक प्रेक्षक राहू नये.

**कन्या :** दूर राहणारा नातेवाईक आज तुमच्याशी संपर्क साधू शकतो. प्रेमाच्या बाबतीत तुमची जीभ नियंत्रित करा, अन्यथा तुम्ही अडचणीत येऊ शकता.

**तुळ :** तुमचे खर्च बजेट बिघडू शकतात कुटुंबातील सदस्यांच्या आनंदी वागण्यामुळे घराचे वातावरण हलके आणि आल्हाददायक होईल.

**वृश्चिक :** स्वतःला एक उत्स-ाही आणि उबदार व्यक्ती बनवा, जो आपल्या कठोर परिश्रमाने आणि प्रयत्नांनी जीवनाचा मार्ग बनवतो.

**धनु :** मुले शाळेचे काम पूर्ण करण्यासाठी तुमची मदत घेऊ शकतात. एखाद्याला भेटण्याची शक्यता जास्त आहे.

**मकर :** आरोग्य चांगले राहील. संशयास्पद आर्थिक व्यवहारात अडकण्यापासून सावध रहा. काही लोकांसाठी- कुटुंबात नवीन व्यक्तीचे आगमन उत्सव आणि आनंदाचे क्षण आणेल.

**कुंभ :** आज तुमच्या प्रियकराला तुमच्या अस्थिर वृत्तीमुळे तुमच्याशी जुळवून घेण्यात खूप अडचण येईल. आजचा दिवस खूप निराशाजनक असू शकतो.

**मीन:** घाईघाईत घेतलेला निर्णय तुम्हाला अडचणीत आणू शकतो. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी थंड डोक्याने विचार करा.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### समाजकार्य महाविद्यालयात एक पेड मॉ के नाम उपक्रम



**अकोला :** ग्रामीण विकास शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, खडकी अकोला द्वारा संचालित, श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी अकोला येथे दिनांक १८ जुलै २०२५ रोजी सकाळी ११: वाजता राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे एक पेड मॉ के नाम उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी ग्रामीण विकास शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. सुरेशराव काळे , महाविद्यालयाचे अध्यक्ष प्राध्यापक डॉ. संकेत काळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव गोरे व सुधाकराव नाईक अकोला महाविद्यालयाचे माजी प्राचार्य बोबडे , एच. एन. सिन्हा महाविद्यालय, पातूर च्या डॉ. ममता इंगोले, खंडेलवाल महाविद्यालयाचे विभाग प्रमुख (मराठी) डॉ. शिवाजी नागरे, काकडे , चोपडे , आर. डी. जी. महाविद्यालयाच्या डॉ. कामे मॅडम आदी उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.केतन वाकोडे, सहा. कार्यक्रमाधिकारी प्रा. नवनाथ बडे, महिला सहा. कार्यक्रमाधिकारी प्रा. एस एम परळीकर मॅडम व महाविद्यालयातील बहुसंख्य स्वयंसेवक उपस्थित होते. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना विविध वृक्षाबाबत व वृक्ष संवर्धनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

### घरकुलामध्ये झालेल्या गैरप्रकाराकडे लक्ष वेधण्यासाठी धरणे आंदोलन



**बाळापूर :** गरिबांना सरकार घरकुल योजना देत आहे. त्यामध्ये बाळापूर येथील गाजीपुरमध्ये घरकुल योजना अंतर्गत बांधलेल्या त्या घरात ड्रेनेज पाईप लाईन तसेच पिण्याच्या पाण्याची पाईप लाईनची सुविधा करण्यात आली आहे. मात्र काही घरकुलामध्ये ही योजना पुर्ण केली गेली नाही. १५०६ ते १५१६ या घरामध्ये कुठल्याच प्रकारच्या पाईप लाईन न टाकल्यामुळे गाजीपूर येथील रहिवाशांनी आज ता १८ जुलै रोजी नगरपरिषद समोर धरणे प्रदर्शन केले. व संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली असता १० दिवसात चौकशी करून करणार कारवाईचे नगरपरिषद अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले. गाजीपुरमध्ये घरकुल योजना अंतर्गत बांधलेल्या परंतु राहिलेल्या त्या घरकुलात पाईपलाईन टाकण्यात यावी . संबंधित ठेकेदाराने केलेला भ्रष्टाचार आणि काम पूर्ण न होताच नगरपरिषदेमधून काढलेले कामाचे बिल ज्या अधिकाऱ्याने काढलेत त्या अधिकाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

### अंजनी बु येथे देहव्यापार करताना पकडले

**डोणगाव :** डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या ग्राम अंजनी बु येथे दि. १७ जुलै ला रात्री ९.१५ वाजताच्या दरम्यान गुप्त माहितीवरुन देहव्यापार करणाऱ्या महीलांना पकडल्याची घटना घडली. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार डोणगाव पोलीस स्टेशनला मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मेहकर चे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील तसेच लोणार चे ठाणेदार निमिष मेहेत्रे मेहकर चे ठाणेदार आलेवार तसेच डोणगाव चे ठाणेदार अमरनाथ नागरे व पोलीस पथक यांनी अंजनी बु येथील शारदा त्र्यंबक नागोलकर हिचे राहते घर ग्राम अंजनी येथे यातील आरोपी शारदा त्र्यंबक नागोलकर वय २९ वर्ष रा अंजनी बु. ता मेहकर जि. बुलडाणा २. वामन किसण लाड वय ५५ वर्ष राअंजनी बु. ता मेहकर जि बुलडाणा ३. विजय दत्ता बोरकर वय २५ वर्ष रा डोणगांव ता मेहकर जि बुलडाणा ४) कवीता त्रंबक नागोलकर ३१ वर्ष रा अंजनी बु. ता मेहकर जि बुलडाणा हे स्वाताच्या आर्थिक फायदयाकरीता स्वाताच्या घरामध्ये देहव्यापार करताना पंच समक्ष मिळून आले आहेत. तसेच त्यांचे अंग झडतीत नगदी पैसे, वापरत असलेले मोबाइल. युपीआय सॅनर, कंडोम पाकीट असे साहित्य असे नगदी ९,६००/- आणि मोबाइल क़ीमत ११,०००/- असा ऐकून २१,१००/- रु चा मुद्देमाल जप्त करून ताबियत घेतला आहे. लोणार चे ठाणेदार निमेष मेहेत्रे यांच्या तक्रारीवरून आरोपी विरूद्ध कलम ३,४,५,६,७ अनौतीक व्यवहार प्रतीबंधक अधीनीयम १९५६ अन्वये दि. १८ जुलै ला सकाळी ४वाजता गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास ठाणेदार अमरनाथ नागरे करीत आहेत. दि. १८ जूलै ला आरोपी ना न्यायालयात हजर करण्यात आले.

# गडचिरोली जिल्ह्यात ४० लाख वृक्ष लागवडीचे लक्ष्य

## मुख्यमंत्री करणार मोहिमेचा शुभारंभ, जिल्हाधिकारी पंडा यांनी घेतला तयारीचा आढावा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**गडचिरोली, दि. १८ :** 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' या राज्यव्यापी अभियानांतर्गत, गडचिरोली जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात ४० लाख झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या महत्वकांक्षी मोहिमेचा शुभारंभ, मुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते, २२ जुलै रोजी कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहे. यानिमित्ताने, जिल्हाभरात 'वृक्ष लागवड पंधरवडा' देखील सुरू करण्यात येत आहे.

या मोहिमेच्या तयारीसाठी, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांच्या अध्यक्षतेखाली आज (दि. १७) सर्व प्रमुख यंत्रणांची एक आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी बोलताना ते म्हणाले, 'वृक्षारोपणानंतर ती झाडे जगवणे, हे आपले खरे कर्तव्य आहे.' 'त्यामुळे, प्रत्येक लावलेल्या झाडाची, किमान एक वर्षासाठीची जबाबदारी निश्चित करण्यात यावी,' असे महत्वपूर्ण निर्देश त्यांनी दिले. 'केवळ वृक्षारोपण नव्हे, तर त्याचे संरक्षण आणि संवर्धन करणे, हाच खरा पर्यावरणपूरक दृष्टिकोन आहे आणि यासाठी शासकीय यंत्रणा आणि नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे,' असेही त्यांनी नमूद केले. 'गडचिरोली जिल्ह्यासाठी ठरवलेले एक कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट, राज्याच्या पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे पाऊल आहे.' 'याची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी, सर्व नागरिक, शाळा, महाविद्यालये आणि स्वयंसेवी संस्थांनी या अभियानात सक्रियपणे सहभागी व्हावे,' असे आवाहनही जिल्हाधिकारी पंडा यांनी केले. या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अप्पर पोलिस अधीक्षक आणि उपवनसंरक्षक यांच्यासह सर्व प्रमुख विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार शुभारंभ

राज्याच्या या महत्वकांक्षी 'हरित महाराष्ट्र' अभियानाला, गडचिरोली जिल्ह्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीने मोठे बळ मिळणार आहे. ते जिल्ह्याचे पालकमंत्री असल्याने, त्यांच्याचहस्ते २२ जुलै रोजी या मोहिमेचा शुभारंभ होत आहे. यामुळे, प्रशासकीय यंत्रणेसोबतच, सामान्य नागरिकांमध्येही या अभियानाबद्दल उत्साह आणि गांभीर्य निर्माण होण्यास मदत होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले आहे.

### झाडे जगविण्यासाठी 'जबाबदारी' निश्चित

या मोहिमेत, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी वृक्षारोपणासोबतच, झाडे जगवण्यावर विशेष भर दिला आहे. त्यांनी प्रत्येक लावलेल्या झाडाची, किमान एका वर्षासाठीची जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत. या अनोख्या संकल्पनेमुळे, लावलेली झाडे केवळ कागदावर न राहता, ती प्रत्यक्षात जगतील आणि वाढतील, याची खात्री केली जाणार आहे. यामुळे, ही मोहीम अधिक परिणामकारक ठरणार आहे.

## इनरव्हील क्लब ऑफ अकोलाचा पदग्रहण सोहळा

### विविध कमिटीसाठी सदस्यांची निवड केली घोषित



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १८ :** इनरव्हील क्लब ऑफ अकोलाच्या मावळत्या अध्यक्ष नीलिमा ठाकरे यांनी नूतन अध्यक्ष जयश्री शास्त्रकार यांना ११ जुलै रोजी संध्याकाळी एका शानदार हॉटेल मध्ये आयोजित सोहळ्यात पदभार सोपविला. मुख्य अतिथी आंतरराष्ट्रीय इनरव्हील कोषाध्यक्ष डॉ .रश्मी शर्मा आणि भुसावळ क्लबच्या पाहुण्या यांची उपस्थिती होती. आयपीपी नीलिमा ठाकरे यांनी नूतन अध्यक्षा जयश्री शास्त्रकार यांचा परिचय करून दिला.

याच सोहळ्यात विविध कमेटी सदस्यांची निवड करण्यात आली आणि ती घोषित करण्यात आली. यामध्ये उपाध्यक्ष तसनीम वाघ,आय पी पी नीलिमा ठाकरे, सचिवपदी सीमा साबळे, कोषाध्यक्ष अलका मेहता, आयएसओ सुनीता सैतवाल, क्लब एडिटर अनुजा मांडवे. पीपी जया सरदेसाई ,पीपी गौरी पडगिलवार, कुलदीप सहानी, सुजाता सावळे ,नैना अमीन, सई ठाकरे ,ज्योती शेवतकर ,निरू शाह यांची एक्झिक्यूटिव्ह टीममध्ये निवड करण्यात आली. तर पिडीसी वैजयंती पाठक ,पीपी लतिका खडसे, पीपी संगीता गांगुर्डे यांची ॲडव्हायझरी कमिटीमध्ये निवड करण्यात आली आणि पीपी समीना नाजमी ,पीपी नसीम वाघ, पी पी नीता गांधी आणि प्रवीणा चीमा यांची बर्थडे कमिटीमध्ये निवड करण्यात आली. आणि शहनाज तारापोरावाला, निरु शाह यांनी संचालन केले. गणेश वंदना डॉ. नम्रता वाघमारे, स्नेहल उतांगळे यांनी केले. माधुरी दाते आणि प्रतिभा पवार , गौरी पडगिलवार, टीना ओबेराय यांनी मुख्य अतिथी यांचे स्वागत केले. नयना अमीन आणि सुजाता सावळे यांनी सजावट केली. पीपी समीना नाझमी यांनी आभार व्यक्त केले. डॉ. सोनल मोदी ,डॉ. स्वाती चीमा ,डॉ. माधुरी चांडक यांनी वर्षोनुवर्षे रुग्णांची अविरत सेवा केल्याबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले. पीपी संगीता गांगुर्डे यांनी मुख्य अतिथी यांचा परिचय दिला.

या कार्यक्रमाला पिडीसी आशा मालीवाल, पिडीसी आशा तारे, पीडीसी विना वाघेला, पीपी संगीता गांगुर्डे, पीपी रीता खडसे, पीपी निशा सुरेखा, पीपी नीता पांड्या, रिता ओरा आणि उपस्थित सर्व सदस्य यांचे सहकार्य मिळाले . या कार्यक्रमाला श्रद्धा भोकरे , गुरवीण ओबेराय,अध्यक्ष जयश्री शास्त्रकार यांचे पती विकास शास्त्रकार आणि मुलगा लोकेश शास्त्रकार तसेच मित्रमंडळी आणि रोटरी क्लब अकोल्याचे अध्यक्ष नेहरु तारापोरवाला आणि सचिव श्रीकांत पडगिलवार तसेच इनरव्हील क्लब ऑफ अकोला क्वीन आणि नॉर्थ च्या अध्यक्षा आणि सचिव उपस्थित होते. नवीन सदस्यांचे इनरव्हील क्लब मध्ये आगमन झाले. तसेच पदग्रहण सोहळ्यात मायक्रो फायनान्स प्रोजेक्ट च्या अंतर्गत सराव गावाच्या महिलेला चक्की देण्यात आली.

### गायकवाड यांच्यावर हल्ल्याचा निषेध; जनसुरक्षा कायदा रद्द करा : स्वाभिमानी संघ

**अकोला :** संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष शिवश्री प्रविण दादा गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे दिपक काटे या सराईत गुन्हेगाराने सहकाऱ्यांसह केलेल्या शाईफेक व प्राणघातक हल्ल्याच्या निषेधार्थ आणि महाराष्ट्र शासनाने सादर केलेला जनसुरक्षा कायदा तात्काळ मागे घ्यावा, या मागणीसाठी भारतीय स्वाभिमानी संघाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मा. राज्यपालांना निवेदन दिले. दिपक काटेवर मकोका अंतर्गत कठोर कारवाई करावी, त्याच्या गुन्हेगारी टोळीचा तपास करून राजकीय पाठबळाचा शोध घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली. तसेच जनसुरक्षा कायदा हा संविधानाच्या अनुच्छेद १४, १९ आणि २१ चे उल्लंघन करणारा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य व आंदोलनाच्या हक्कावर घाला आहे, असे म्हणत हा ''काळा कायदा'' तात्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली.

## स्कॉलरशिप परीक्षेत राजेश्वर कॉन्व्हेन्टचे घवघवीत यश



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १८ :**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने २०२४ २५ साठी घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये स्थानिक रेणुकानगर येथील राजेश्वर कॉन्व्हेंटच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. येथील एकूण ६ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले आहेत. त्यामध्ये वर्ग ८ वी मधील प्रवर्ष तळे हा महाराष्ट्र राज्यातून ११ वा व अकोला जिल्ह्यातून प्रथम मेरिट आहे. तसेच देवांशू चव्हाण (१५), सतेज शिराळ (१७), चिन्मय अमृतकर (५९), मंथन धोपेकर (९२) हे शहरी विभागातून मेरिट आले आहेत. तसेच वर्ग ५ वी तुन प्रफुल डोंगरे अकोला जिल्हातून ६ वा मेरिट आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना दीपक पटोकार तसेच विशाल इंगळे ज्योत्स्ना जाधव, प्रीती कळम, अर्चना नवलखे, रूपाली पाचरे तसेच शीतल ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू मेहरे, अध्यक्ष नंदकिशोर मेहरे, सचिव वैभव मेहरे, कोषाध्यक्ष अरुण देशपांडे , संचालिका कांचन पटोकार, मुख्याध्यापिका सरिता वरणकर, डॉ.प्रदीप अवचार, अमोल सावंत,अधीक्षक सागर बोराखडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### 'अमृत'तर्फे खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बलांसाठी विविध योजना: जिल्हाधिकारी

**अकोला:** महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनीतर्फे (अमृत) राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विविध योजना राबवल्या जातात. पात्र व्यक्तींनी त्याचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात 'अमृत'च्या जिल्हा कार्यालयाचा शुभारंभ जिल्हाधिका-यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. प्रबोधिनीचे विशेष कार्य अधिकारी सिद्धेश्वर वरणगावकर, जिल्हा व्यवस्थापक धनंजय कुलकर्णी, उपव्यवस्थापक ऋषिकेश विधाते, जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार आदी उपस्थित होते. खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग, संस्था, महामंडळातर्फे योजनांचा लाभ मिळत नाही अशा आर्थिक दुर्बल घटकांना अमृत संस्थेच्या योजनांचा लाभ दिला जातो. त्यात उद्योजकांसाठी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व परशुराम गट कर्ज व्याज परतावा योजना राबवली जाते, अशी माहिती श्री. वरणगावकर यांनी दिली. प्रबोधिनीतर्फे रोजगारक्षम कौशल्य विकासासाठी स्वयंरोजगार प्रोत्साहन व प्रशिक्षण कार्यक्रम, कृषी उत्पन्नाधारित उद्योग प्रशिक्षण, शासकीय संगणक टंकलेखन व लघुलेखन परीक्षा, ड्रोन ऑपरेटर रिमोट पायलट प्रशिक्षण, रोजगार, नोकरी सहाय्य, तसेच औद्योगिक व उन्नत कौशल्य विकासासाठी तांत्रिक रोजगारक्षम प्रशिक्षण, सी-डॅक माहिती तंत्रज्ञान, व्यवसाय, उद्योग इन्क्युबेशन सेंटर, किशोर विकास उपक्रम आदी राबवले जाते, अशी माहिती श्री. कुलकर्णी यांनी दिली.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय, मानोरा ता. मानोरा जि. वाशिम**
दुरध्वनी कंमाक -०७२५३-२६३२४६
Email adderss- tahsildarmanora@gmail.com
क्रं. जन्म-मृत्यु नोंदणी स.स.कावि- ४०२/२०२५
दिनांक ११/०७/२०२५

**जाहिरनामा**

अर्जदार :- उल्हास साहेबराव सस्ते ह.मु. रा. कोथळी ता. बार्शिटाकळी जि. अकोला
..विरूद..
गैरअर्जदार :- ग्राम पंचायत कार्यालय, भिलडोंगर ता. मानोरा जि. वाशिम
बनाम :- सर्व नागरिक

याव्दारे सार्वत्रिक लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार उल्हास साहेबराव सस्ते रा. कोथळी ता. बार्शिटाकळी जि. अकोला येथील रहिवासी असून यांनी स्वतःचे मुलांचे नावाने जन्म नोंदीचा आदेश ग्राम पंचायत कार्यालय, भिलडोंगर ता. मानोरा जि. वाशिम येथे आदेश मिळणेकामी विनंती अर्ज केलेला आहे. अर्जदाराचे स्वतःचे मुलांचे नामे नितेश उल्हास सस्ते रा. भिलडोंगर यांचा जन्म दिनांक २९/१०/२००८ रोजी अर्जदाराचे राहते घरी मौजा भिलडोंगर ता. मानोरा जि. वाशिम येथेच झालेला आहे. असे जन्म नोंदणी निबंधक यांचे अभिप्रायात नमुद आहे. परंतु ग्राम पंचायत कार्यालय, येथे गेले असता अर्जदाराचे स्वतःच्या मुलांचे जन्म नोंदीचा अभिलेख आढळला नाही. अर्जदाराकडून जन्म नोंद अनावधानाने करण्यात आलेले नाही. त्यासाठी ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय, भिलडोंगर यांचे कडून जन्म नोंद नसल्याचा अनुउपलब्धता प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.
प्रकरणात अर्जदारानी आधार कार्ड, सचिव, ग्राम पंचायत, भिलडोंगर यांचा जन्म नोंद अनुउपलब्धता प्रमाणपत्र,सरपंच पो.पाटील यांचा रहिवासी प्रमाणपत्र, वंशावळ, मतदान कार्ड, शिधापत्रिका, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र या सोबत जोडलेले आहे. तरी शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र यावरिल तारिख नमुद करून ग्राम पंचायत कार्यालय, भिलडोंगर येथे जन्म-मृत्यु नोंदणी कायदा सन १९६९ कलम १३ (३) २०२३ अन्वये जन्म नोंद होण्याकरिता विनंती अर्ज केलेला आहे.
करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्वतःचे मुलांचे जन्म मौजा भिलडोंगर ता. मानोरा येथे झालेले आहे. परंतु सदरचा दस्त/अभिलेख उपलब्ध नसल्याने जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय, भिलडोंगर ता. मानोरा यांचे अभिलेखावर घेवून जन्माचे प्रमाणपत्र मिळणेकामी कोणाचेही हितसंबंध असल्यास, कोणाचेही उजर असल्यास अथवा कोणास आक्षेप घ्यावयाचे असेल तर हा जाहिरनामा वृत्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत किंवा नेमलेल्या नेमलेल्या तारखेच्या दिवशी न्यायालयात हजर होवून आपली हरकती लेखी स्वरूपात कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीचे आत कोणीही योग्य हरकत न दाखविल्यास सदरहु न्यायालय उपरोक्त अर्जदारास त्यांच्या स्वतःचे मुलांचे जन्म नोंदणी करण्याबाबत लागलीच पुरावा घेवुन अर्ज निकाली काढण्यात येईल मंजुर करण्यात येईल.
आज दिनांक ११/०७/२०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

(डॉ. संतोष येवलीकर)
तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मानोरा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय, मानोरा ता. मानोरा जि. वाशिम**
दुरध्वनी कंमाक -०७२५३-२६३२४६
Email adderss- tahsildarmanora@gmail.com
क्रं. जन्म-मृत्यु नोंदणी /म.स./कावि- ४२७/२०२५
दिनांक १७/०७/२०२५

**जाहिरनामा**

अर्जदार :- दिलीप परसराम राठोड रा. पोहरादेवी ता. मानोरा जि. वाशिम
..विरूद..
गैरअर्जदार :- ग्राम पंचायत कार्यालय, पोहरादेवी ता. मानोरा जि. वाशिम
बनाम :- सर्व नागरिक

याव्दारे सार्वत्रिक लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार दिलीप परसराम राठोड रा. पोहरादेवी ता. मानोरा जि. वाशिम येथील रहिवासी असून यांनी स्वतःचे नावाने जन्म नोंदीचा आदेश ग्राम पंचायत कार्यालय, पोहरादेवी ता. मानोरा जि. वाशिम येथे आदेश मिळणेकामी विनंती अर्ज केलेला आहे. अर्जदाराचे स्वतःचे जन्म दिनांक २८/०१/१९६८ रोजी अर्जदाराचे राहते घरी मौजा पोहरादेवी ता. मानोरा जि. वाशिम येथेच झालेला आहे. असे जन्म नोंदणी निबंधक यांचे अभिप्रायात नमुद आहे. परंतु ग्राम पंचायत कार्यालय, येथे गेले असता अर्जदाराचे स्वतःचे जन्म नोंदीचा अभिलेख आढळला नाही. अर्जदाराकडून जन्म नोंद अनावधानाने करण्यात आलेले नाही. त्यासाठी ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय, पोहरादेवी यांचे कडून जन्म नोंद नसल्याचा अभिप्रायासह अनुउपलब्धता प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.
प्रकरणात अर्जदारानी आधार कार्ड, सचिव, ग्राम पंचायत, पोहरादेवी यांचा जन्म नोंद अनुउपलब्धता प्रमाणपत्र, सरपंच/पो. पाटील यांचा रहिवासी प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र ई. कागदपत्रे याप्रकरणा सोबत जोडलेले आहे. तरी शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र यावरिल तारिख नमुद करून ग्राम पंचायत कार्यालय, पोहरादेवी येथे जन्म-मृत्यु नोंदणी कायदा सन १९६९ चे कलम १३ (३) २०२३ अन्वये जन्म नोंद होण्याकरिता विनंती अर्ज केलेला आहे.
करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्वतःचे जन्म मौजा पोहरादेवी ता. मानोरा येथे झालेले आहे. परंतु सदरचा दस्त/अभिलेख उपलब्ध नसल्याने जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय, पोहरादेवी ता. मानोरा यांचे अभिलेखावर घेवून जन्माचे प्रमाणपत्र मिळणेकामी कोणाचेही हितसंबंध असल्यास, कोणाचेही उजर असल्यास अथवा कोणास आक्षेप घ्यावयाचे असेल तर हा जाहिरनामा वृत्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत किंवा नेमलेल्या नेमलेल्या तारखेच्या दिवशी न्यायालयात हजर होवून आपली हरकती लेखी स्वरूपात कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीचे आत कोणीही योग्य हरकत न दाखविल्यास सदरहु न्यायालय उपरोक्त अर्जदारास त्यांच्या स्वतःचे जन्म नोंदणी करण्याबाबत लागलीच पुरावा घेवुन अर्ज निकाली काढण्यात येईल मंजुर करण्यात येईल.
आज दिनांक १७/०७/२०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

(डॉ. संतोष येवलीकर)
तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मानोरा

## सेवानिवृत्त सैनिकांकडून मिल्ट्री कँटीनमधील विदेशी मद्याची अवैध वाहतूक

### वेलकम पॉईंटजवळ एक्साईजच्या भरारी पथकाची मोठी कारवाई

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अमरावती, दि. १८ :**भारतीय सैन्यातुन सेवानिवृत्त झालेल्या दोन माजी सैनिकांकडून मिल्ट्री कँटीन मधील विदेशी मद्याची अवैध वाहतूक करत असतांना राज्य उत्पादन शुल्कच्या भरारी पथकाने वेलकम पॉईंटजवळ सापळा रचून ९.९३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.१६ जुलैच्या सायंकाळी ही कारवाई करण्यात आली. सेवानिवृत्त झालेल्या अनेक माजी सैनिकांच्या नावावर नागपूर येथील कँटीन मधून मद्याच्या बाटल्या घेऊन त्या चारचाकी वाहनाने अकोला पर्यंत विकण्याचा मोठा गोरखधंदा राज्य उत्पादन शुल्काच्या भरारी पथकाने उघडकीस आणला.

गुप्त व खात्रीशीर माहितीनुसार, अमरावती येथील राज्य उत्पादन शुल्कच्या भरारी पथकाने नागपूर-अमरावती मार्गावरील वेलकम पॉईंटजवळ सुझुकी कंपनीची ब्रेझा क्र. एम.एच.३०,ए झेड ६०३९ ही पांढऱ्या रंगाची चारचाकी थांबवून तपासणी केली असता, वाहनातील तीन टुरिस्ट बॅगमध्ये ७५० मि.ली. क्षमतेच्या विविध विदेशी मद्याच्या बाटल्या आढळल्या. सदर मद्य दुसऱ्या एका अज्ञात वाहनात स्थलांतर करण्याचा प्रयत्न सुरू असताना ही कारवाई करण्यात आली. हे मद्य भारतीय सैन्याच्या कॅन्टीनमधून स्वतःच्या व इतर सेवानिवृत्त सैनिकांच्या कॅन्टीन कार्डवरून खरेदी करून त्याची अवैध वाहतूक केली जात होती. या प्रकरणी अटक करण्यात आलेले आरोपी शांताराम हरी थाटे (वय ४५, रा. गीतानगर, अकोला) आणि रामेश्वर जानोजी पुंडकर (वय ५४, रा. संभाजीनगर, आकोट, जि. अकोला) हे दोघेही भारतीय सैन्य दलातून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांच्या विरोधात महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५(अ) आणि ६५(ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईत विदेशी मद्य, वाहन आणि बॅग यासह एकूण ₹८,९७,३१६/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून खुल्या बाजारातील किंमत लक्षात घेतल्यास मुद्देमालाची एकूण किंमत अंदाजे ₹९,९३,४००/- इतकी आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क मुंबई येथील आयुक्त डॉ. राजेश देशमुख,सहआयुक्त प्रसाद सुर्वे,प्रभारी विभागीय उपआयुक्त, डॉ. पराग नवलकर, आणि अधीक्षक शशीकांत गर्जे यांच्या आदेश व मार्गदर्शनातप्रभारी निरीक्षक संतोष पी. वायाळ,सुभाष एस. खरे, आकाश जाधव, सादीक नौरंगाबादे, अंकुश काळे,आर. पी. मोकळकर, पी. आर. भोरे,सुजीत जाधव,विठ्ठल कस्टे, जगदीश जव्हाण, गजानन वाकोडे, के. एम. मातकर, तसेच महिला कर्मचारी श्रीमती व्ही. बी. पारखी आणि कु. डी. डी. मानकर यांच्या संयुक्त पथकाने केली.

### आर्मी लिहिलेल्या वाहनातून मद्य वाहतूक

ज्या वाहनातून मद्य वाहतूक करण्यात येत होती त्या वाहनावर आर्मी असे ठळक अक्षरात लिहिलेले होते. अशा प्रकारे अवैध मद्य वाहतुकीसाठी 'आर्मी' लिहिलेल्या वाहनाचा वापर करून अधिकाऱ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अनेक नाकाबंदी व तपासणी दरम्यान या वाहनावर संशय येऊ नये म्हणून आर्मी या शब्दाचा वापर करण्यात आला होता. मात्र राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने ही शक्कल हाणून पाडत वाहन थांबवले आणि तपासणी केली असता, त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर मद्य साठा आढळून आला.

मणप्पुरम
घर

**मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड पूर्वी मनप्पुरम होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड**
CIN : U65923KL2010PLC039179
नोंदणीकृत कार्यालय: IV/470A (जुने) W/638A (नवीन) मणप्पुरम हाऊस वलपद त्रिशूर, केरळ 680567
कॉर्पोरेशन ऑफिस: मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड, तिसरा मजला, युनिट क्रमांक ३०१ ते ३१५, ए विंग, 'कनकिया वॉल स्ट्रीट', अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-४०००९३, महाराष्ट्र. फोन क्रमांक: ०२२-६६२११०००, वेबसाइट: www.manappuramhomefin.com

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)

तर, खाली स्वाक्षरी करणारा हा सिक्युरिटायझेशन अंतर्गत मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड ("माहोफिन") चा अधिकृत अधिकारी आहे आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्बांधणी आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी *[कायदा], २००२ (२००२ चा ५४) आणि प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ९ सह वाचलेल्या कलम १३(१२) अंतर्गत कर्जदारांना आवाहन करणारी मागणी सूचना जारी केली. आणि सह-कर्जदारांनी नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम आणि त्यावरील व्याज ही सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत परत करावे. कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी ठरल्याने, कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की अधोस्वाक्षरीकर्त्याने [illegible]

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |

तारीख: १९ जुलै २०२५ | ठिकाण: महाराष्ट्र
अधिकृत अधिकारी मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड

# बुमराहला खेळविण्याकडे कल! चौथ्या कसोटी सामन्याबाबत प्रशिक्षकाचे संकेत

**बेकनहॅम: दि. १८ प्रतिनिधी**

इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील आव्हान टिकविण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या भारतीय संघाचा मँचेस्टर येथे होणाऱ्या चौथ्या सामन्यातही तारांकित वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराला खेळविण्याकडे कल आहे. मात्र, अंतिम निर्णय सामन्याच्या पूर्वसंध्येलाच घेतला जाईल, असे भारतीय संघाचा साहाय्यक प्रशिक्षक रायन टेन दोएशहाते म्हणाला.पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारतीय संघ सध्या १-२ असा पिछाडीवर असून चौथा सामना २३ जुलैपासून मँचेस्टर येथे खेळवला जाणार आहे. त्यापूर्वी भारतीय संघाने गुरुवारी बेकनहॅम येथे सराव केला. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना दोएशहातेने भारतीय संघाच्या योजनेची माहिती दिली.

बुमराबाबतचा निर्णय आम्ही मँचेस्टरला पोहोचल्यानंतरच घेऊ. उर्वरित दोनपैकी एकाच सामन्यात बुमरा खेळणार असल्याचे आम्हाला ठाऊक आहे. मात्र, आता मालिकेतील आव्हान टिकविणे महत्त्वाचे असल्याने या कसोटीत बुमराला खेळविण्याकडे आमचा कल आहे. मात्र, आम्हाला विविध गोष्टींबाबत विचार करावा लागेल. सामना किती दिवस चालणार? विजय मिळविण्याच्या दृष्टीने सर्वोत्तम पर्याय काय? तसेच ओव्हल येथे होणाऱ्या अखेरच्या कसोटीत कोणाला खेळविणे अधिक योग्य ठरेल? या सगळ्याचा विचार करूनच आम्हाला निर्णय घ्यावा लागेल,'' असे सांगितले.

तिसऱ्या कसोटीत यष्टिरक्षक ऋषभ पंतच्या बोटाला दुखापत झाली. त्यामुळे त्याला पहिल्या डावातील उत्तरार्ध, तसेच दुसऱ्या डावात यष्टिरक्षण करता आले नाही. त्याने दोन्ही डावांत फलंदाजी केली, पण त्याला चेंडू मारताना अडचण येत होती. मात्र, मँचेस्टर कसोटीपूर्वी तो तंदुरुस्त होणे अपेक्षित असल्याचे सांगितले. परंतु तो यष्टिरक्षण करणार की नाही, याचे स्पष्ट उत्तर देणे त्याने टाळले. ''तिसऱ्या कसोटीत फलंदाजी करतानाही पंतला वेदना झाल्या. मात्र, आता विश्रांतीमुळे त्याची दुखापत बरी होत आहे. यष्टिरक्षण हा या प्रक्रियेचा अखेरचा भाग आहे. डावाच्या मध्यातच पुन्हा यष्टिरक्षक बदलावा लागेल अशी स्थिती आम्हाला ओढवून घ्यायची नाही. आम्ही पंतला अधिकाधिक वेळ देण्याचा प्रयत्न करत आहोत. मँचेस्टर येथे होणाऱ्या पहिल्या सराव सत्रात तो सहभागी होईल अशी आम्हाला आशा आहे,'' असे नमूद केले.

## दुसऱ्या संधीतही अपयश; करुणला डच्चू निश्चित?

काही वर्षांपूर्वी कसोटी संघातून बाहेर गेल्यानंतर देशांतर्गत स्पर्धेतही संधी न मिळाल्याने निराश झालेल्या करुण नायरने 'प्रिय क्रिकेट, मला आणखी एक संधी दे,' असे 'ट्वीट' केले होते. क्रिकेटने करुणला दुसरी संधी दिली, पण त्याचा योग्य वापर करून घेण्यात तो अपयशी ठरला. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील पहिल्या तीन सामन्यांत मिळून एकही अर्धशतक करू न शकलेल्या ३३ वर्षीय करुणला आता चौथ्या सामन्यासाठी भारतीय संघातून डच्चू मिळण्याची दाट शक्यता आहे.

इंग्लंडविरुद्धच्या सहाही डावांत चांगल्या सुरुवातीचे मोठ्या खेळीत रूपांतर करण्यात करुण चुकला. त्याला अनुक्रमे ०, २०, ३१, २६, ४०, १४ धावाच करता आल्या. त्याने 'ड्राइव्ह'चे काही नेत्रदीपक फटके मारले, पण खेळपट्टीच्या मध्यावरून अतिरिक्त उसळी घेणाऱ्या चेंडूंविरुद्ध तो वारंवार अडचणीत सापडताना दिसला.




## यशस्वी जैस्वालमुळे भारताचा पराभव झाला?

**नवी दिल्ली: दि. १८ प्रतिनिधी**

भारताचा संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेत इंग्लंडचा संघ २-१ ने आघाडीवर आहे. मालिकेतील तिसरा सामना लॉर्ड्सच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात भारतीय संघाला विजयासाठी १९३ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाचा डाव १७० धावांवर आटोपला. या पराभवानंतर इंग्लंडचा माजी वेगवान गोलंदाज स्टुअर्ट ब्रॉडने यशस्वी जैस्वालबाबत मोठं वक्तव्य केलं आहे.

हा सामना जिंकण्यासाठी भारतीय संघाला १९३ धावा करायच्या होत्या. भारतीय संघाची बॅटिंग लाईनअप पाहता, हे आव्हान फार मोठं नव्हतं. पण भारतीय संघाला हवी तशी सुरुवात मिळाली नाही. सलामीला आलेल्या यशस्वी जैस्वालने जोफ्रा आर्चरच्या गोलंदाजीवर पुल शॉट मारण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा प्रयत्न फसला. तो ७ चेंडूंचा सामना करत शून्यावर बाद झाला. त्यामुळे भारताला ५ धावांवर पहिला धक्का बसला.

स्टुअर्ट ब्रॉडने फॉर द लव्ह ऑफ क्रिकेट या पॉडकास्टमध्ये बोलताना म्हटले की, '' यशस्वी जैस्वाल खराब शॉट मारून आऊट झाला. मला आश्चर्य होतंय की त्याने त्या चेंडूवर ऑफ साईडला कट शॉट का नाही मारला. त्यामुळे इंग्लंडला सामन्यात कमबॅक करण्याची संधी मिळाली. यशस्वी असा खेळाडू आहे जो, स्ट्राइकवर असला की धावा सुरू असतात. कमी धावा करून जेव्हा धावांचा बचाव करण्यासाठी मैदानात येतो तेव्हा गोलंदाजांवर दबाव असतो.'' तसेच तो पुढे म्हणाला, '' करुण नायर फलंदाजीला आला त्यावेळी इंग्लंडने आक्रमक क्षेत्ररक्षण सजवलं. करुण नायर असा फलंदाज आहे जो प्रत्येक चेंडू योग्यरित्या खेळून काढतो. पण इंग्लंडला सुरुवातीलाच मोठं यश मिळालं. त्यामुळे यशस्वी जैस्वाल बाद होताच इंग्लंडने भारतीय फलंदाजांवर दबाव टाकायला सुरूवात केली.

## प्रज्ञानंदची कार्लसनवर मात; 'फ्रीस्टाइल' बुद्धिबळ स्पर्धेच्या लास वेगास टप्प्यात उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**लास वेगास: दि. १८ प्रतिनिधी**

जगज्जेत्या दोम्माराजू गुकेशकडून पारंपरिक आणि जलद प्रकारात पराभूत होणाऱ्या मॅग्नस कार्लसनवर आता भारताचा आणखी एक ग्रँडमास्टर बुद्धिबळपटू आर. प्रज्ञानंदकडून पराभव पत्करण्याची नामुष्की ओढवली आहे. 'फ्री-स्टाइल ग्रँडस्लॅम टूर'च्या लास वेगास टप्प्यात प्रज्ञानंदने विश्वातील सर्वोत्तम बुद्धिबळपटू अशी ख्याती असलेल्या कार्लसनवर अवघ्या ३९ चालींत सरशी साधत उपांत्यपूर्व फेरी गाठली.

या स्पर्धेच्या पहिल्या दिवशी प्रज्ञानंदने अप्रतिम कामगिरी करताना 'विजेत्या' खेळाडूंच्या गटात संयुक्त अग्रस्थान मिळवले. सात फेऱ्यांअंती प्रज्ञानंद, नोदिरबेक अब्दुसत्तोरोव आणि जावोखिर सिंदारोव यांचे समान ४.५ गुण होते. लेवॉन अरोनियन चार गुणांसह चौथ्या स्थानी राहिला.

कार्लसनने स्पर्धेची सुरुवात सलग विजयांसह केली होती. मात्र, तिसऱ्या फेरीत प्रज्ञानंदविरुद्ध झालेल्या पराभवातून सावरणे कार्लसनला अवघड गेले. पुढील फेरीत त्याला अमेरिकेच्या वेस्ली सोकडूनही हार पत्करावी लागली. त्यानंतर त्याला सलग दोन लढतींत बरोबरीवर समाधान मानावे लागले. अखेरच्या फेरीत विजय अनिवार्य असताना त्याने बिबिसारा असाउबायेवाला पराभूत केले. मात्र, त्यानंतरही त्याला 'प्ले-ऑफ'मध्ये खेळावे लागले. यात कार्लसनने अरोनियन याच्याविरुद्ध दोनही डावांत हार पत्करली. त्यामुळे पहिल्या दिवसअखेरीस त्याला 'पराभूत' खेळाडूंच्या गटात स्थान मिळाले आणि तो जेतेपदाच्या शर्यतीतून पूर्णपणे बाहेर गेला.

दुसऱ्या गटातून ग्रँडमास्टर अर्जुन एरिगेसीनेही उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवले. अडखळत्या सुरुवातीनंतर एरिगेसीला सूर गवसला. त्याचे आणि अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाचे समान चार गुण झाले. हिकारू नाकामुराने उत्कृष्ट खेळ करताना सात फेऱ्यांत सहा गुण मिळवत गटात अग्रस्थान पटकावले. हान्स निमन (४.५ गुण) दुसऱ्या स्थानी राहिला. ग्रँडमास्टर विदित गुजराथीची कामगिरी निराशाजनक ठरली. तो केवळ १.५ गुणांसह अखेरच्या स्थानी राहिला. आता उपांत्य फेरीत प्रज्ञानंदसमोर कारुआना, तर एरिगेसीसमोर अब्दुसत्तोरोवचे आव्हान असेल. अन्य दोन लढतींत अरोनियन आणि नाकामुरा, तर निमन आणि सिंदारोव आमनेसामने येतील.



कार्लसनविरुद्धच्या विजयाने नक्कीच आनंदीत आहे. मला आता पारंपरिक डावापेक्षा फ्री-स्टाइल बुद्धिबळ खेळायला जास्त आवडते. आता सातत्य राखणे आवश्यक आहे.

**आर. प्रज्ञानंद**

### प्रज्ञानंदची चमक

पाच वेळच्या जगज्जेत्या कार्लसनला १९ वर्षीय प्रज्ञानंद कायमच कडवी झुंज देतो. त्याने २०२३च्या नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत सर्वांत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या पारंपरिक प्रकारातही कार्लसनला नमवले होते. त्याआधी त्याने ऑनलाइन बुद्धिबळातही कार्लसनवर मात केली होती. आता फ्री-स्टाइल बुद्धिबळातही प्रज्ञानंदने अशीच किमया साधली आहे. पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना प्रज्ञानंदने सुरुवातीलाच पटावर वर्चस्व प्रस्थापित केले. अपेक्षेनुसार कार्लसनने त्याला चोख प्रत्युत्तर दिले. मात्र, प्रज्ञानंदने वैविध्यपूर्ण चाली रचत कार्लसनला गोंधळात टाकले. अखेर ३९व्या चालीअंती कार्लसनने हार मान्य केली.

## मँचेस्टर कसोटीआधी टीम इंडियाला धक्का; संघातील वेगवान गोलंदाज दुखापतग्रस्त

**नवी दिल्ली: दि. १८ प्रतिनिधी**

भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामना मँचेस्टरमध्ये रंगणार आहे. हा सामना मालिकेच्या दृष्टीने भारतीय संघासाठी अतिशय महत्वाचा असणार आहे. कारण २ सामने जिंकून इंग्लंडचा संघ मालिकेत २-१ ने आघाडीवर आहे. त्यामुळे मालिका जिंकायची असेल तर चौथा सामना जिंकणं अतिशय महत्वाचं असणार आहे. या सामन्याआधी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. संघातील वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग दुखापतग्रस्त झाला आहे.




अर्शदीप सिंगला इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघात संधी देण्यात आली आहे. पण त्याला पदार्पणाची संधी दिली गेलेली नाही. आता चौथ्या कसोटीपूर्वी सरावादरम्यान गोलंदाजी करत असताना साई सुदर्शनने मारलेला चेंडू त्याच्या हाताला लागल्याने दुखापत झाली आहे. मात्र, मेडिकल टीमने त्वरित त्याच्यावर उपचार केले.

लॉर्ड्स कसोटी सामन्यातील पराभवानंतर भारतीय संघाने मँचेस्टर कसोटी जिंकण्यासाठी जोरदार सराव सुरू केला आहे. या सामन्यासाठी जर कुठल्याही गोलंदाजाला विश्रांती दिली जाणार असेल, तर २६ वर्षीय अर्शदीप सिंगला पदार्पणाची संधी दिली जाऊ शकते. पण त्याला संधी मिळणार की नाही, हे त्याची दुखापत किती गंभीर आहे यावर अवलंबून असणार आहे.

भारतीय संघाचे सहाय्यक प्रशिक्षक रायन डे डोशेट म्हणाले, '' साई सुदर्शन फलंदाजी करत असताना अर्शदिप सिंग गोलंदाजीला आला. साई सुदर्शनने मारलेला शॉट अडवण्यासाठी अर्शदीप सिंगने हात टाकला. पण त्याच्या हाताला दुखापत झाली. मेडिकल टीम त्याला डॉक्टरकडे घेऊन गेली आहे. त्याला टाके मारावे लागतील की नाही हे लवकरच कळेल.

जसप्रीत बुमराह या मालिकेतील ५ पैकी ३ सामने खेळणार हे आधीपासून ठरलं होतं. त्यामुळे दुसऱ्या सामन्यात त्याला विश्रांती दिली गेली होती. आता तो शेवटच्या २ पैकी एका सामन्यात खेळताना दिसेल. पण मँचेस्टर कसोटी ही भारतीय संघासाठी महत्वाची असणार आहे. त्यामुळे तो या सामन्यात खेळताना दिसेल. त्यानंतर शेवटच्या कसोटीत तो खेळणार की नाही, याबाबत निर्णय घेतला जाईल.

## इंग्लंडमध्ये वैभव सूर्यवंशीची क्रेझ; थेट सचिन-विराटशी होतेय तुलना

**नवी दिल्ली: दि. १८ प्रतिनिधी**

भारताचा युवा खेळाडू वैभव सूर्यवंशी सध्या इंग्लंडमध्ये आहे. इंग्लंड दौऱ्यावर गेलेल्या १९ वर्षांखालील भारतीय संघात त्याला स्थान देण्यात आलं आहे. १४ वर्षीय वैभव पहिल्यांदाच इंग्लंडमध्ये गेला आहे. पहिल्याच दौऱ्यावर त्याचा दरारा पाहायला मिळाला आहे. त्याने इंग्लंडच्या १९ वर्षाखालील संघाविरूद्ध झालेल्या युथ वनडे मालिकेत भारतीय संघाला ३-२ ने विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली. या मालिकेत त्याने वेगवान शतक झळकावलं. दरम्यान वैभवचा चाहतावर्ग हा दिवसेंदिवस वाढत आहे. इंग्लंडमध्ये त्याला सचिन तेंडुलकर आणि विराट कोहली किंवा त्यापेक्षा मोठ्या लेव्हलचा खेळाडू असल्याचंही म्हटलं जात आहे.




वैभवने भारताच्या १९ वर्षांखालील संघाकडून खेळताना दमदार कामगिरी केली होती. त्याची ही कामगिरी पाहता राजस्थान रॉयल्सने त्याला ट्रायल्ससाठी बोलवलं. आयपीएल २०२५ स्पर्धेसाठी झालेल्या लिलावात राजस्थान रॉयल्सने त्याला १.१० कोटींची बोली लावत आपल्या संघात स्थान दिलं. यादरम्यान त्याने षटकार मारून आपल्या आयपीएल कारकिर्दीची सुरूवात केली.

गुजरात टायटन्स संघाविरूद्ध झालेल्या सामन्यात त्याने ३५ चेंडूत शतकी खेळी केली होती. यासह तो आयपीएल स्पर्धेत सर्वात वेगवान शतक झळकावणारा युवा फलंदाज ठरला होता. तसेच सर्वात जलद शतक झळकावणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत त्याने युसूफ पठाणलाही मागे सोडलं होतं. या खेळीनंतर वैभव सूर्यवंशी तुफान चर्चेत आला.

इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डचे स्टेटिस्टियन आणि क्रिकेट विश्लेषकांनी टाईम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत म्हटले की, ''मी दुसऱ्या वनडे सामन्यादरम्यान त्याला पहिल्यांदा खेळताना पाहिलं. खूप फोटो काढले गेले.

पत्रकारांनी गर्दी केली होती. इतकेच नव्हे, तर बीबीसीमधूनही काही लोकं त्याला खेळताना पाहण्यासाठी उपस्थित होते.''तसेच ते पुढे म्हणाले,''मला माहीत होतं, मी एका स्टार खेळाडूला खेळताना पाहत आहे. त्याने ४० षटकांच्या सामन्यात ३१ चेंडूंचा सामना करून ८६ धावांची खेळी केली होती. या खेळीदरम्यान त्याने ६ चौकार आणि ९ षटकार मारले होते. त्याने बॅकवर्ड स्केअर लेगला पुल शॉट मारल्यानंतर सर्वांनी टाळ्या वाजवून त्याचं कौतुक केलं होतं.

## पतंजली फूड्सकडून शेअरधारकांना बोनस




**मुंबई :** पतंजली फूड्स लिमिटेडच्या संचालक मंडळाच्या गुरुवारी पार पडलेल्या कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत भागधारकांना बक्षीस (बोनस) समभाग देण्याला मंजूरी दिली. बक्षीस समभाग २:१ या प्रमाणात म्हणजेच ज्या भागधारकांकडे एक समभाग असेल त्यांना दोन रुपये दर्शनी मूल्य असलेले दोन समभाग बक्षीसरूपात विनामूल्य प्राप्त होतील.

कंपनीकडून अद्याप बक्षीस समभागासाठी पात्र होण्यासाठी रेकॉर्ड तारखेची घोषणा झालेली नाही. तथापि या बक्षीस समभाग योजनेत अंदाजे ७२.५० कोटी नवीन समभागांचे वाटप कंपनी करणार आहे. बक्षीस समभागाचे वाटप झाल्यानंतर, कंपनीचे एकूण भागभांडवल सध्याच्या १४५ कोटी रुपयांवरून २१७.५० कोटी रुपयांपर्यंत वाढेल.कंपनीच्या ३१ मार्च २०२५ अखेर लेखापरीक्षित कामगिरीनुसार, पतंजली फूड्सकडे हे बक्षीस समभाग देण्यासाठी पुरेसा राखीव निधी आहे. संचालक मंडळाच्या बैठकीत बक्षीस समभाग योजनेवर शिक्कामोर्तब झाल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत, म्हणजेच १६ सप्टेंबर २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी पात्र भागधारकांना हे बक्षीस समभाग मिळविता येतील, अशी अपेक्षा आहे. विद्यमान भागधारकांना मूल्यवृद्धीचा फायदा मिळवून देण्यासह भांडवली बाजारात कंपनीच्या समभागांची तरलता वाढवणे हे या निर्णयामागे कंपनीचे उद्दिष्ट आहे.मुंबई शेअर बाजारात पतंजली फूड्सचा समभाग गुरुवारच्या व्यवहाराअंती २.५५ टक्क्यांनी म्हणजे प्रत्येकी ४७.५० रुपयांनी वाढून १,९०९.७५ रुपयांवर बंद झाला. गत दिवसांतील व्यवहारात भाव तब्बल २५० रुपयांनी वधारला आहे. सध्याच्या शेअरच्या बाजार भावानुसार कंपनीचे ६८,४७० कोटी रुपयांचे बाजार भांडवल आहे.

# चीनने भारतावर अनेक अनौपचारिक व्यापार निर्बंध लादले

## ३२ अब्ज डॉलर्सचे होणार नुकसान!

**नवी दिल्ली: दि. १८ प्रतिनिधी**

चीनने भारतावर अनेक अनौपचारिक व्यापार निर्बंध लादले आहेत, ज्यामुळे भारताचा इलेक्ट्रॉनिक उद्योग धोक्यात आला आहे. भारताच्या इलेक्ट्रॉनिक उद्योगाने याबद्दल चिंता व्यक्त केली आहे आणि म्हटले आहे की याचा देशाच्या निर्यातीवर परिणाम होऊ शकतो. भारताचा अंदाज आहे की ते आर्थिक वर्ष २०२६ च्या अखेरीस ३२ अब्ज डॉलर्सची स्मार्टफोन निर्यात साध्य करेल, परंतु चीनच्या कृतींमुळे हे लक्ष्य शक्य दिसत नाही. त्याच वेळी, आर्थिक वर्ष २०२५ मध्ये, भारताने ६४ अब्ज डॉलर्स किमतीची उत्पादने तयार केली आहेत.



उद्योग संघटना इंडिया सेल्युलर अँड इलेक्ट्रॉनिक्स असोसिएशन () ने भारत सरकारला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, चीनच्या कृतीचा एकमेव उद्देश भारताच्या पुरवठा साखळीवर परिणाम करणे आणि जागतिक उत्पादन केंद्र म्हणून उदयास येणाऱ्या भारताला कमकुवत करणे आहे.२०२० पासून भारतात स्मार्टफोन उत्पादनात झपाट्याने वाढ झाली आहे आणि २०२५ च्या आर्थिक वर्षात देशाने ६४ अब्ज डॉलर्स किमतीच्या उत्पादनांचे उत्पादन केले, त्यापैकी २४.१ अब्ज डॉलर्सची निर्यात झाली. २०१५ च्या आर्थिक वर्षात, भारत स्मार्टफोन निर्यातीत १६७ व्या क्रमांकावर होता, परंतु आता तो एक प्रमुख निर्यातदार बनला आहे. त्याच वेळी, २०२६ पर्यंत निर्यात ३२ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

ॲपल आपले उत्पादन प्रकल्प चीनमधून भारतात हलवत आहे आणि येथून जगाला आयफोन निर्यात करू इच्छित आहे, ज्यामुळे ड्रॅगन आणखी संतापला आहे. सुमारे ५ वर्षांपूर्वीपर्यंत, ॲपल आपले सर्व आयफोन चीनमध्ये बनवत असे. तथापि, २०२० मध्ये सुरू झालेल्या स्मार्टफोन उत्पादनासाठी भारताच्या पीएलआय योजनेचा फायदा घेत, अमेरिकन कंपनी फॉक्सकॉन आणि टाटा इलेक्ट्रॉनिक्सद्वारे भारतात उत्पादन वेगाने वाढवत आहे. जागतिक आयफोन उत्पादनात त्याचा वाटा २० टक्के आहे.

चीनचे हे पाऊल भारतासाठी अडचणी निर्माण करत आहे. आयसीईएचे म्हणणे आहे की चीनच्या या ताज्या पावलामुळे भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन वाढीच्या इंजिनला धोका निर्माण होत आहे.

### चीनने भारतावर कोणते निर्बंध लादले?

सर्वात मोठा मुद्दा दुर्मिळ पृथ्वी खनिजांबाबत आहे. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या भारतातील दुर्मिळ पृथ्वीची निर्यात चीनने थांबवली आहे. याशिवाय, चीनने भांडवली उपकरणे आणि इतर खनिजांची निर्यात देखील थांबवली आहे. तंत्रज्ञान हस्तांतरण थांबवता यावे म्हणून चीनने कर्मचाऱ्यांना घरी परतण्याचे आदेश दिले आहेत. इतकेच नाही तर चीनने आपल्या काही कंपन्यांना भारतात कामकाज थांबवण्याचे आदेशही दिले आहेत. चीनच्या या कृतींमुळे इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाला धोका वाढत आहे.

## हिंदुस्तान झिंकच्या निव्वळ नफ्यात मोठी घट

**नवी दिल्ली: दि. १८ प्रतिनिधी**

धातू क्षेत्रातील कंपनी हिंदुस्तान झिंकने शुक्रवारी शेअर बाजारातील व्यवहारादरम्यान आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले. निकालांनंतर हिंदुस्तान झिंकचे शेअर्स घसरले. शुक्रवारी हिंदुस्तान झिंक लिमिटेडचे शेअर्स ४३५.४० रुपयांवर बंद झाले. कंपनीचे मार्केट कॅप १.८४ लाख कोटी रुपये आहे. हा उच्च लाभांश स्टॉक आहे, ज्याचा लाभांश उत्पन्न ५.५७% आहे.

वेदांत लिमिटेडच्या मालकीच्या हिंदुस्तान झिंकने शुक्रवारी जून २०२५ मध्ये संपलेल्या पहिल्या तिमाहीत २,२३४ कोटी रुपयांचा एकत्रित निव्वळ नफा नोंदवला, जो गेल्या वर्षी याच तिमाहीत २,३४५ कोटी रुपयांच्या नफ्याच्या तुलनेत ४.७% घट नोंदवला आहे. कमकुवत तिमाही निकालांमुळे बाजार कोसळला, सेन्सेक्स ५०० पेक्षा जास्त अंकांनी घसरला; निफ्टी २४९६८ वर बंद हिंदुस्तान झिंकने सांगितले की, आर्थिक वर्ष २६ च्या जून तिमाहीत त्यांचे एकूण कामकाजातील उत्पन्न ७,७७१ कोटी रुपये होते, जे आर्थिक वर्ष २५ च्या जून तिमाहीत नोंदवलेल्या ८,१३० कोटी रुपयांच्या महसुलाच्या तुलनेत ४.४% घट नोंदवली गेली आहे. कंपनीने मार्च २०२५ च्या तिमाहीच्या तुलनेत १४.५% ची तीव्र घट पाहिली, जेव्हा कंपनीने ९,०८७ कोटी रुपयांचा सर्वोत्तम तिमाही महसूल नोंदवला होता.




## कमकुवत तिमाही निकालांमुळे बाजार कोसळला, सेन्सेक्स ५०० पेक्षा जास्त अंकांनी घसरला; निफ्टी २४९६८ वर बंद

**नवी दिल्ली: दि. १८ प्रतिनिधी**

आशियाई बाजारांकडून मिळालेल्या संमिश्र संकेतांमध्ये, भारतीय शेअर बाजार शुक्रवारी (१८ जुलै) आठवड्यातील शेवटचा ट्रेडिंग सत्र घसरणीसह बंद झाला. रिलायन्स इंडस्ट्रीजसारख्या मोठ्या कंपन्यांच्या निकालांपूर्वी गुंतवणूकदार सावध भूमिका घेत आहेत. कंपन्यांच्या कमकुवत तिमाही निकालांमुळे बाजारात घसरण दिसून आली.याशिवाय, खाजगी बँक आणि वित्तीय शेअर्समधील घसरणीमुळे शेअर बाजार कोसळला. एफआयआयची विक्री, यूएस फेड धोरणावरील जागतिक अनिश्चितता आणि वाढत्या तेलाच्या किमती यामुळे गुंतवणूकदारांची भावना आणखी कमकुवत झाली.आज बीएसईचा ३० शेअर्सचा सेन्सेक्स ८२,१९३.६२ वर उघडला आणि सुमारे ७० अंकांनी घसरला. निर्देशांक उघडताच त्यात चढ-उतार दिसून आले. व्यवहारादरम्यान तो ८१,६०८.१३ अंकांवर घसरला. शेवटी, तो ५०१.५१ अंकांनी किंवा ०.६१% ने घसरून ८१,७५७.७३ वर बंद झाला.

त्याचप्रमाणे, राष्ट्रीय शेअर बाजार (एनएसई) चा निफ्टी-५० देखील २५,१०८.५५ वर घसरणीसह उघडला. उघडल्यानंतर काही वेळातच तो २५००० च्या आधार पातळीच्या खाली गेला. शेवटी, तो १४३.०५ अंकांनी किंवा ०.५७ टक्क्यांनी घसरून २४,९६८.४० वर बंद झाला.

सर्वाधिक नफा कमावणारे आणि सर्वाधिक तोट्यात असलेले शेअर्स सेन्सेक्स कंपन्यांमध्ये ॲक्सिस बँक सर्वाधिक ५.२५ टक्क्यांनी घसरली. कोटक महिंद्रा, एचडीएफसी बँक, भारत इलेक्ट्रॉनिक्स, कोटक बँक, भारती एअरटेल, टायटन, इटरनल, पॉवर ग्रिड आणि टेक महिंद्रा हे प्रमुख नुकसान झाले. दुसरीकडे, बजाज फायनान्स, टाटा स्टील, आयसीआयसीआय बँक, एचसीएल टेक, इन्फोसिस आणि एम अँड एम हे सर्वात जास्त वधारले.

क्षेत्रीय आघाडीवर, निफ्टी प्रायव्हेट बँक सर्वात जास्त तोटा सहन करत होती, १.४६ टक्क्यांनी घसरली. निर्देशांकाचा भाग असलेल्या ॲक्सिस बँक, आरबीएल बँक, कोटक बँक आणि एचडीएफसी बँक यांचे शेअर्स ५ टक्क्यांहून अधिक घसरले.

याशिवाय, निफ्टी बँक, फायनान्शियल सर्व्हिसेस, कंझ्युमर ड्युरेबल्स, एनर्जी, ऑटो, एफएमसीजी, रिअल्टी, ऑइल अँड गॅस आणि फार्मा हे सर्व लाल रंगात बंद झाले. दुसरीकडे, निफ्टी मेटल, मीडिया आणि आयटी यांनी वाढ नोंदवली.

# रस्त्यांवरील अडथळे: ७९ लाखांची वसुली

## 'उपद्रव शोध पथका' ची मोठी कारवाई; ७ हजारांहून अधिक नागरिकांना ठोठावला दंड

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १८ : खाजगी कामासाठी घरासमोरील रस्त्यावर मंडप, शामियाना, कमानी उभारून सार्वजनिक वाहतुकीला अडथळा आणण्याचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी महानगरपालिकेचे उपद्रव शोधपथक सातत्याने प्रयत्न करीत आहे. मनपा नियमांचा भंग केल्यास संबंधितांवर आर्थिक कारवाई करण्यात येते. १ जानेवारी ते ३० जून २०२५ या सहा महिन्यात ७ हजार ११८ जणांवर कारवाई करून ७९ लाख २३ हजार ६५० रुपयांचा दंड वसूल केला आहे.**



नागपूर महानगरपालिकाच्या वतीने स्वच्छ नागपूर, सुंदर व स्वस्थ साकारण्यासाठी विविध अभियान राबविले जात आहेत. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी,अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, वैष्णवी बी., अजय चारठाणकर यांच्या नेतृत्वात स्वच्छ नागपूर अभियान राबविण्याला प्राधान्य दिले जात आहे. शहर स्वच्छ राहावे तसेच शहरातील वाहतुकीला कुठेही अडथळा येऊ नये यासाठी उपद्र्व शोधपथकाद्वारे सातत्याने निगराणी राखली जात आहे. यासाठी विविध पथके तयार करून महानगरपालिकेच्या नियमांचा तसेच सार्वजनिक स्वच्छतेमध्ये अडथळा आणणा०यावर कारवाई करण्यात येते. धरमपेठ झोनमध्ये सर्वाधिक प्रकरणे उघडकीस आली असून, या विभागात मागील सहा महिन्यात १ हजार २१२ जणांवर उपद्र्व पथकाने कारवाई केली. यातून शहरात सर्वाधिक १७ लाख ८९ हजार २०० रुपयांचा दंड वसूल केला. या खालोखाल हनुमाननगर झोनमध्ये रस्ते अडविण्याच्या नियमबाह्य घटना घडल्या आहेत. या झोनमध्ये १ हजार १७४ जणांनी महानगरपालिकेच्या नियमांचे उल्लंघन केले या कारवाईतून ११ लाख ५९ हजार १०० रुपये दंड वसूल केला. नेहरूनगर झोनमध्ये ५६३ जणांवर कारवाई करून ८ लाख ८९ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला.

### हे करू नका...

**खासगी किंवा सार्वजनिक कार्यक्रमांसाठी रस्त्यावर मंडप, स्टेज, शामियाने तसेच कमानी उभारून रस्ता बंद करण्याचे प्रकार सातत्याने होत असतात. नागरिकांनी या सर्व टाळाव्यात् यात सार्वजनिक वाहतुकीला अडथळा निर्माण होत असतो. नाहक वाद निर्माण होऊन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असतो् यासंदर्भात सजग नागरिकांनी उपद्र्व पथकाकडे तक्रार केल्यास तत्काळ कारवाई करण्यात येते.**

### जागृती निर्माण व्हावी

**'स्वच्छ नागपूर व सुंदर नागपूर' या संकल्पनेच्या संदर्भात लोकांमध्ये अधिकाधिक जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने अभियान राबविण्यात येत आहे. यात लोकांना अधिकाधिक सुविधा मिळाव्या व नागपूर शहर स्वच्छ ठेवण्याच्या दृष्टीने नवे पाऊल टाकण्याचा प्रयत्न होत आहे.**

---

## थोडक्यात

### सात लाखांची फसवणूक

**नागपूर:** प्लॉटचे पैसे घेऊन रजिस्ट्री करून न देता एकूण ७ लाख १५ हजारांची फसवणूक केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी ईश्वर नानूजी सरोदे (महादुला, कोराडी कॉलनी, ता. कामठी, जि. नागपूर, ह.मु. विवेकानंद कॉलनी, छिंदवाडा, म.प्र.) यांनी १६ आगस्ट २०११ रोजी आरोपी क्र. एक नारायण लहानूजी भोंगडे (रा. प्रेमनगर, नागपूर) यांच्याकडून कोराडी ठाण्याच्या हद्दीत दर्शना सहकारी गृहनिर्माण संस्था नागपूर येथील खसरा नं. १०१/१, वार्ड क्र. ५७, प्लॉट नं. २८ व २९, प्रत्येकी क्षेत्रफळ १५०० स्क्वेअर फीट ७ लाख १५ हजार रुपयांत विकत घेतले. फिर्यादीने प्लॉटचे पैसे वेळोवेळी पूर्ण देऊन आरोपीने विक्रीचा करारनामा करून दिला. आरोपीला दोन्ही प्लॉटची रजिस्ट्री करून मागितली असता उडवाउडवीची उत्तरे देऊन टाळाटाळ केली. यानंतर फिर्यादी नमूद प्लॉटवर ताबा घेण्यासाठी गेले असता आरोपी क्र. दोन अब्दुल नासिर (पेन्शन नगर, नागपूर) यांनी नमूद जागा त्यांची असल्याचे सांगत ताबा घेऊ दिला नाही. यानंतर पोलिसांत तक्रार नोंदविण्यात आली.

### आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

**उमरेड :** उमरेड पोलिसांनी अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहन चालक आणि मालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. १६ जुलै २०२५ रोजी अवैध वाळू वाहतुकीबद्दल मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी उमरेड येथील बायपास चौकात नाकाबंदी केली असता, MH-३६, AA-४१०४ क्रमांकाचा एक संशयित टिप्पर ट्रक थांबवण्यात आला. तपासणी केली असता, त्यामध्ये वाळू आढळून आली. वाहन चालक मंगेश सुनील शेंडे (गोपीवाडा, पो. शहापूर, ता. भंडारा, जि. भंडारा) याला परवान्याबाबत विचारणा केली असता, त्याच्याकडे कोणताही वैध परवाना नसल्याचे त्याने सांगितले. पुढील चौकशीत, वाहनाचा मालक प्रशांत जयदेव आक्रे ( चिखली, ता. भंडारा, जि. भंडारा) असल्याचे निष्पन्न झाले. उमरेड पोलिसांनी पंचसमक्ष, अंदाजे ९ ब्रास वाळू, किंमत ४५ हजार आणि टिप्पर ट्रक (MH-३६, AA-४१०४), किंमत २५ लाख असा एकूण २५,४५,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी उमरेड पोलीस स्टेशनमध्ये आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३७९ (चोरी), ४२७ (नुकसान पोहोचवणे) आणि ४८४ (खोट्या मालमत्तेची नोंद करणे), तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४८(७), ४८(८), खाण व खनिज (विकास व नियमन) अधिनियम कलम ४, २१, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधिनियम कलम ३ आणि पर्यावरण (संरक्षण) अधिनियम कलम १५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

# मेडिकल, मेयोमधील परिचारिकांचा बेमुदत संप सुरू

## मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार




दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १८ :** शासकीय रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय अर्थात मेडिकल आणि मेयोमधील परिचारिकांनी (नर्सेस) आपल्या विविध मागण्यांसाठी आजपासून (१८ जुलै) बेमुदत संप पुकारला आहे. महाराष्ट्र राज्य नर्सेस असोसिएशनच्या नेतृत्वाखाली संप सुरू झाला असून, वरिष्ठांसोबतची बैठक निष्फळ ठरल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

परिचारिकांच्या संघटनांनी काही प्रमुख मागण्या पुढे केल्या आहेत् वेतन त्रुटी, उच्च ग्रेड पे, गणवेश भत्ता आदींचा समावेश आहे सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार हेड नर्सेस, स्टाफ नर्सेस आणि प्रशिक्षण अधिकारी यांच्या वेतनश्रेणीतील त्रुटी दूर कराव्यात् केंद्रीय कर्मचा०यांप्रमाणे ग्रेड पे, गणवेश भत्ता मिळावा, पदोन्नती धोरणांमध्ये सुधारणा करून योग्यवेळी पदोन्नती मिळावी, पदांची समान नावे, परिचारिकांची रिक्तपदे तातडीने भरावीत, मंजूर झालेल्या शासकीय निर्णयांची त्वरित अंमलबजावणी करावी आदी मागण्यांचा समावेश आहेयाशिवाय नर्सिंग सेवांचे खाजगीकरण थांबवणे, कायमस्वरूपी भरती निश्चित करणे, शैक्षणिक वेतन वाढविण्यासह अन्य भत्ते लागू करणे समाविष्ट आहे दरम्यान, सरकारने आपल्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळेच हा संप पुकारण्यास भाग पडल्याचे परिचारिकांनी 'अजिंक्य भारत'ला सांगितले महाराष्ट्र राज्य नर्सेस असोसिएशनने आपल्या मागण्या त्वरित मान्य न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा सुद्धा दिला आहे.

### आरोग्य सेवांवर परिणाम

**परिचारिकांच्या या संपामुळे शासकीय रुग्णालयांमधील आरोग्य सेवांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे् नागपुरातील शेकडो परिचारिका संपावर असल्याने औषधे देणे, जखमांवर उपचार आणि रुग्णांची काळजी यासारख्या थेट रुग्णसेवांवर गंभीर परिणाम होऊ शकतो. तसेच, डॉक्टर आणि उपलब्ध असलेल्या इतर आरोग्य कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही् नियोजित शस्त्रक्रिया आणि तपासण्या सुद्धा पुढे ढकलण्याची स्थिती निर्माण होऊ शकत्े त्यामुळे रुग्णांना उपचारांसाठी जास्त काळ वाट पाहावी लागू शकते. तसेच, आपत्कालीन विभागांमध्ये प्रतीक्षा वेळ वाढल्याचे गंभीर रुग्णांवर परिणाम होऊ शकतो.**

---

### गुन्हेगाराला शस्त्रासह अटक

**नागपूर, दि. १८ :** नागपूर शहरातून हद्दपार केलेला आरोपी घातक शस्त्रासह फिरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर, गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून त्याला अटक केली. त्याच्याकडून एक लोखंडी चाकू जप्त करण्यात आला आहे.ही कारवाई गुरुवारी सायंकाळी अंबाझरी तलावाजवळ झाली. अक्षय किशोर मडावी (रा. न्यू फुटाळा वस्ती) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. गुन्हे शाखेचे पथक गस्तीवर असताना, हद्दपार आरोपी फिरत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला असता तो पळून जाऊ लागला. पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले असता, त्याच्याकडे चाकू आढळला. त्याला एक वर्षासाठी हद्दपार केले असतानाही, तो शहरात विनापरवाना फिरत होता. त्याच्यावर भारतीय हत्यार कायदा व महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

### CAPTION 'ट्राफिक इन्टरचेंज'...



**नागपूर : नागपुरात आरमोरी महामार्गावरील अशोक चौकात पाच रस्ते एकत्र येत असून, याठिकाणी कमाल चौक ते दिघोरी नाका इतक्या नऊ किलोमीटर अंतराचा सर्वांत मोठा उड्डाणपुल तयार होत आहे. अशोक चौकात वाहतूक वळविण्यासाठी शहरातील सर्वांत मोठ्या 'ट्राफिक इन्टरचेंज' चे काम सुरू आहे.**

---

# ताजुद्दीन बाबांच्या वार्षिक उर्सची ध्वजारोहणाने सुरुवात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर, दि. १८ :** हजरत बाबा ताजुद्दीन यांच्या १०३ व्या वार्षिक उर्सला शुक्रवारी ध्वजारोहणाने सुरुवात झाली. ताजबाग दर्गा शरीफ येथे झालेल्या या सोहळ्याला हजारो भाविकांनी हजेरी लावत मजार-ए-पाकचे दर्शन घेतले.

ताजबाग शाही मशिदीचे इमाम खुर्शीद आलम यांनी कुराण पठण केले. यानंतर बाबा ताजुद्दीन रहमतुल्ला अलैह यांच्या दर्ग्याचे सज्जादा नशीन सय्यद युसूफ इक्बाल ताजी यांच्या सरपरस्ती मध्ये आणि अमीरे शरीयत मुफ्ती अब्दुल कादीर खान, मुस्लिम धर्मगुरू मौलाना तन्वीर हाश्मी (कर्नाटक), हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टचे अध्यक्ष प्यारे झिया खान, सचिव ताज अहमद राजा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र जिचकार, ट्रस्टी फारूकभाई बावला, गजेंद्र पालसिंग लोहिया, मुस्तफाभाई टोपीवाला, हाजी इम्रान खान ताझी यांच्यासह सय्यद जरबीर बाबा ताजी, सय्यद तालेब बाबा ताजी, दर्गा खुद्दम कमिटीचे अध्यक्ष सय्यद मोबीन ताजी प्रमुखांच्या उपस्थितीत श्रीमंत राजे रघुजीराव यांच्या हस्ते वार्षिक उर्स ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर स्वागत कार्यक्रमाला अतिरिक्त पोलिस आयुक्त डॉ. शिवाजी राठोड, डीसीपी रश्मिता राव, माजी कॅबिनेट मंत्री अनिस अहमद, मौलाना अझीझ खान उपस्थित होते. मुश्ताक मन्सूरी यांनी नाते पाक सादर केला. यानंतर पाहुण्यांना पगडी घालण्यात आली. व्यासपीठ गयासुद्दीन अशरफी यांनी संचालन केले. बाबा ताजुद्दीन रहमतुल्ला अलैह यांचा वार्षिक उर्स २९ जुलैपर्यंत साजरा होणार आहे.

---

# 'बांधकाम' योजनेत बोगस लाभार्थी

## ऑनलाईन सेंटरवर छापेमारी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १८ :** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनेत शेकडो बोगस मजुरांची नोंद केल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. जिल्ह्यातील काही ऑनलाईन सेंटरवर असे प्रकार करण्यात येत असून, गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

बांधकाम कामगारांना बांधकामासाठी आवश्यक असलेली अवजारे खरेदी करण्याकरिता मंडळाकडून पाच हजारांपर्यंत अर्थसाहाय्य देण्याची योजना आहे. पात्र बांधकाम कामगाराने मंडळाकडे विहित नमुन्यातील अर्ज सादर करणे आवश्यक आहे. मात्र, काहीजणांकडून योजनेचा गैरफायदा घेतला जात आहे. नागपूरसह शेजारच्या भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, वर्धा आणि गडचिरोली जिल्ह्यात हा प्रकार राजरोसपणे सुरू आहे. नागपूर अपर कामगार आयुक्त कार्यालयाकडून याकरिता वेगवेगळे दक्षता पथक तयार करण्यात आले. दरम्यान, कळमेश्वर आणि हिंगणा तालुक्यातील काही ग्रामपंचायतीच्या लेटरहेडचा वापर करून अनुभवाचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. सध्या अनेक ठिकाणी काही लोकांनी या योजनेचे अर्ज भरून देण्याची दुकानेच मांडली आहे. योजनेत पैसे व अवजारे मिळत असल्याने नागरिकांकडून अर्ज भरण्यासाठी गर्दी केली जात आहे. एका अर्ज भरण्याचे ३०० ते ५०० रुपये घेतले जात असल्याचे चित्र आहे. दरम्यान, दक्षता पथकाने घातलेल्या छाप्यात कळमेश्वर तालुक्यातील मोहगाव(सा.) ग्रामपंचायतीने निर्गमित केलेले ९० दिवसांचे काम केल्याचे ४६ प्रमाणपत्र आढळून आल आहेत. तसेच हिंगणा तालुक्यातील वडगाव (गुजर) ग्रामपंचायतीने निर्गमित केलेले तीन प्रमाणपत्र आढळले आहेत.



**" या संदर्भात नागपूर विभागीय अपर कामगार आयुक्तकिशोर दहीफळकर यांनी सांगितले, की बांधकाम मजुरांना योजनेचा लाभ देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली. मात्र, बोगस मजुरांची नोंद असल्याचे उजेडात आल्याने दक्षता पथकाची नियुक्ती करण्यात आली. ही पथके अन्य जिल्ह्यात छापामारी करत आहेत. अनेक ऑनलाईन सेंटरवर छापे टाकण्यात येत आहेत. यापुढे कुणाचीही गय गेली जाणार नाही.**

---

# स्मार्ट मीटरसंबंधी वीजबिलांच्या तक्रारींवर दिलासा

## वाढीव वीजबिलांच्या तक्रारींवर महावितरणचा दिलासा; मोर्चातील ग्राहकांच्या शंकांचे केले निरसन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १८ : महावितरणच्या केळवद कार्यालयात स्मार्ट मीटरमुळे वीजबिलांत वाढ झाल्याच्या तक्रारी घेऊन आलेल्या ग्राहकांना महावितरणने तत्काळ दिलासा दिला आहे. सर्व मोर्चेकरी ग्राहकांच्या मीटरवरील वीज वापराच्या नोंदी तपासून त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.**



महावितरणच्या सावनेर विभागातील केळवद परिसरात महावितरणने सुमारे ४५० सदोष मीटर बदलून त्याऐवजी स्मार्ट मीटर लावले आहेत. मीटर बदलल्यानंतर काही ग्राहकांना अवास्तव वीजबिले आल्याच्या तक्रारीवरून ग्राहकांनी महावितरण कार्यालयावर मोर्चा काढला होता. यापैकी बहुतांश ग्राहकांना उन्हाळ्यातील सरासरी वीज वापराचे बिल मिळाले होत्े कारण जुन्या मीटरचे रिडिंग घेतल्यानंतर नवीन मीटर बसवण्यात आले होते. यामुळे त्यांना वाढीव रकमेची बिले दिसली. केवळ दोन ग्राहकांनाच असामान्य बिले मिळाल्याचे निदर्शनास आले, जी तकाळ दुरुस्त करून त्यांना देण्यात आली. मीटर बदलण्यात आलेल्या सर्वच ग्राहकांना वाढीव बिल आलेले नाही. काही मीटरचा डेटा महावितरणच्या बिलिंग सिस्टिममध्ये गेला नसल्यामुळे त्या ग्राहकांना सरासरी वीज वापराचे बिल मिळाले आहे. अशा सर्व ग्राहकांचे मीटर तपासणी करून त्यांना सुधारित बिले दिली जातील, असे आश्वासन महावितरणने दिले आहे.

स्मार्ट मीटरमुळे अवाढव्य वीजबिल आले,असे म्हणणे चुकीचे असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. सावनेर तालुक्यात आतापर्यंत जवळपास चार हजार स्मार्ट मीटर लावण्यात आले आहेत. जिथे रीडिंग रिप्लेसमेंट डेटा सिस्टिममध्ये आला नाही, तिथे सरासरी वीज वापराची वाढीव बिले आली आहेत. ज्या ग्राहकांचे बिल वाढीव आलेले आहे, त्यांनी चिंता करण्याची गरज नाही. त्यांच्याकडील मीटरची तपासणी केल्यानंतर त्यांना सुधारित बिल देण्यात येईल. वाढीव बिलाची समस्या असल्यास ग्राहकांनी तत्काळ महावितरणच्या उपविभागीय कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### नोंदी तपासणार

**महावितरणचे उपकार्यकारी अभियंता दिलीप राऊत यांनी मोर्चेकरी ग्राहकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या आणि त्यांच्या शंकांचे समाधान केले. तसेच, मीटर बदलताना वीज वापराच्या नोंदींचे वाचन करून गरज भासल्यास समांतर मीटर लावून नोंदी तपासण्याच्या सूचना देखील दिलीप राऊत यांनी जनमित्रांना दिल्या आहेत.**